म. ग्रं. सं. ठाणें
विषय निवेद्य
सं. क्र. २८२४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

8 FEB 1981
27 MAY 1981
17 JAN 1982
5 JAN 1983
2 MAR 1983
27 MAR 1983
21 MAR 1984
21 MAR 1984
21 MAR 1984
9 MAY 1984
4 MAR 1985
20 MAR 1985
20 MAR 1985
20 MAR 1985
7 JUL 1985
1985
21 1985

(कु. मा. प.)
५०००-४-८०

निबंध
२८२८
२३०९०

मर्ढेकरांची कविता : एक अभ्यास

धोंडो विठ्ठल देशपांडे

साहित्य प्रसार केन्द्र, नागपूर

प्रकाशक :
भा. ल. कुलकर्णी
साहित्य प्रसार केन्द्र
सीताबर्डी
नागपूर १२

© सौ. लक्ष्मी देशपांडे

ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी
शिवराज्याभिषेक दिन
२६ जून १९८०

मुद्रक :
दि. भि. धाक्रस
नाग मुद्रणालय
रुईकर मार्ग
नागपूर ४४०००२

२८२४
निबंध
२३०१०
E १७२ । ८८
संदर्भ सेवा

कै. सदाशिव (भाऊ) केशव नेऊरगावकर यांस

दोन शब्द

मर्ढेकरांची कविता या विषयावर तीन लेख मी सत्यकथेत लिहिले होते, ही गोष्ट १९५४ सालातील. त्या काळी त्यांचे साहित्यक्षेत्रात थोडे कौतुक झाले. पण त्यांना काही साहित्यिक मूल्य आहे, किंवा ते एकत्र करून प्रसिद्ध करण्याच्या लायकीचे आहेत ही कल्पना माझ्या मनाला शिवलीही नाही. म्हणून ते इतके दिवस पडून होते. आता श्री. भा. ल. कुलकर्णी यांची दृष्टी त्या लेखांवर गेली आणि त्यांच्या विनंतीवरूनच ते मी त्यांना प्रकाशनासाठी दिले. प्रसिद्ध करण्यापूर्वी त्यांच्यावर पुन्हा हात फिरवावा, वाटल्यास दुरुस्त करावे, काही भर घालावी, असा सल्ला मला अनेक मित्रांनी दिला. त्यांचा सल्ला योग्य होता, पण तो स्वीकारणे मला जमले नाही. ते लेख लिहिले गेले तेव्हा मर्ढेकरांचा एकसंध विचार माझ्या मनात होता. आणि त्या एकसंधातूनच हे तीन लेख एकौघ लिहिले गेले. आता इतक्या वर्षांनंतर त्यांच्यावर पुन्हा हात फिरवणे म्हणजे ठिगळकाम. त्यामुळे एखादी वाकळ तयार होईल पण तिला भरड का होईना पण ठेवणीतील सवंगाचे रूप येणार नाही. व्हीनस्-द-मिलो घडवायचा तर ती कल्पना मनात ठेवूनच दगडावर छिन्नी ठोकायची असते. मारवत तयार आहेच. आता थोडी माती थापून तिचा आपण व्हीनस बनवू असे म्हणून व्हीनस तयार होत नाही. कारण मारवतीला कुणीही, कसलीही, कितीही आणि कुठेही माती थापली तरी मारवत ती मारवतच राहते. निदान मला तरी तिचा व्हीनस बनविण्याची किमया साधलेली नाही. माझ्या या मर्यादा मला माहीत आहेत. म्हणूनच हे जसेच्या तसे प्रसिद्ध होत आहेत. वाचकांना ते आवडले तर ठीकच. न आवडले तर त्याबद्दल माझी तक्रार नाही.

वर श्री. भा. ल. कुलकर्णी यांचा उल्लेख केला. त्यांच्याबरोबर ग्रेसचाही उल्लेख केला पाहिजे. कदाचित श्री. भा. ल. कुलकर्णींना मी नकार देऊ शकलो असतो पण त्यांच्या भरीला ग्रेसनीही आग्रह केला आणि त्यांना नकार

देणे मला अवघड गेले. होकार दिल्यानंतर त्यांना मी सहज प्रश्न केला, 'प्रस्तावना लिहाल काय?' त्या प्रश्नाला काय उत्तर मिळाले हे या पुस्तकातील पुढची पाने सांगतील. त्यांचे आभार मानलेले त्यांना रुचणार नाही म्हणून ते मानीत नाही. उरली इतर मंडळी. प्रकाशक, मुद्रक इत्यादी त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार. राहता राहतात ते वाचक. त्यांना मात्र एक उद्धट पण तरीही नम्र विनंती.

यद्रोचते तद्ग्राह्यम् ।
यन्न रोचते तत्त्याज्यम्

दत्ताश्रम,
शिवाजी पार्क रोड नं. ४
दादर, मुंबई
४०० ०२८

धोंडो विठ्ठल देशपांडे

ऐशा टापूंत चौफेर । नाही माहेर-सासर;

भाषेला ' द्रौपदीचे सत्त्व ' मागून घेणाऱ्या कवितेला कैवारी शोधावा लागत नाही. कैवार हा तिचा अधिकार असतो; उपकार नव्हे. आत्मबळावर पाय रोवून उभी असलेली मर्ढेकरांची कविता; व तितक्याच आत्मविश्वासपूर्वक करण्यात आलेला धोंडो विठ्ठल देशपांडे यांचा हा ' अभ्यास '–आपापल्या शक्तीने गेली पंचवीस-तीस वर्षे स्वतःचे स्थान बळकटपणे सांभाळून आहेत. या अपूर्व मणि-कांचनयोगाला खरे तर आता माझ्या कारागिरीची गरजच नाही. पण देशपांड्यांच्या समीक्षेत असे काय विशेष आहे की मर्ढेकरांच्या कवितेच्या आकलनासाठी मला पुनःपुन्हा तिच्याकडे वळावेसे वाटावे ? आज तर मर्ढेकरांची कविता मराठी कवितेच्या क्षेत्रात रुजली आहे; तरीही तिचे नवखेपण जाणण्यासाठी मला वारंवार देशपांड्यांचेच लेख का आकर्षित करतात ? देशपांड्यांच्या समीक्षाशैलीत असा कोणता सहजगुण आहे की ज्यामुळे एरवी पांडित्याला बिचकणारा मी तिचा अजिबात धसका घेऊ नये ? या प्रश्नांचा पाठलाग करताना फुटलेले हे काही हुंकार; आणि त्यांना प्रस्तावनेच्या वेटीला धरणे हा फक्त उपचार !

संस्कृतिसंघर्षाच्या आकांतमय पाताळघरात आपले हरवलेले नीरांजन शोधणारी मर्ढेकरांची कविता जेव्हा अवतरली; तेव्हा तिचे वेगळेपण जाणवले, विक्षिप्तपणही जाणवले, पण मोल मात्र जाणवले नाही. ही कविता कणखर तर खरी पण ओबडधोबड वाटत होती. त्याकाळी तिच्या खडबडीत रंगरूपाची टवाळीही कमी झाली नाही. अर्थात याच वेळी काही सुजाण अभ्यासकांना तिची अंतःशक्तीही जाणवत होती पण ते मर्ढेकरांच्या ' लय ' सिद्धांताने जास्त झपाटले होते. त्यामुळे एका पातळीवर मर्ढेकरी कवितेची टिंगलटवाळी व दुसऱ्या पातळीवर मर्ढेकरांच्या समीक्षासिद्धांताचे बोट धरून त्यांच्या कवितेची निष्ठूर उलटतपासणी अशा पार्श्वभूमीवर १९५४ साली धोंडो विठ्ठल देशपांडे यांचे हे लेख ' सत्यकथे 'त क्रमशः प्रसिद्ध झाले. या घटनेचे महत्त्व व मोल अनेक पदरी

आहे. पहिली गोष्ट म्हणजे या लेखांचा प्रसिद्धि-काळ एखादी कविता जनमनात रुजून गेल्यावर तिची शक्तिकेंद्रे जाणणे वेगळे आणि तेच प्रचलित वळणापासून अगदी वेगळी ठसणारी स्वयंसिद्ध कविता जेव्हा प्रथम निर्माण होते तेव्हाच्या प्रथम दृष्टिक्षेपात तिचे सामर्थ्य जाणणे व ते निर्भीडपणे मांडणे हे वेगळे. धोंडो विट्ठल देशपांडे यांनी मर्ढेकरांच्या आगळ्या, विक्षिप्त वाटणाऱ्या कवितेचे सामर्थ्य प्रामाणिकपणे ओळखले व या कवितेला वाचकांचे व समीक्षकांचे फारसे पाठबळ नव्हते; अशा वेळी स्वतःचे प्रतिपादन मुद्देसूदपणे पटवून या कवितेचा सरळ कैवार घेतला. मराठीच्या वाङ्मयसमीक्षेत या वस्तुस्थितीला ऐतिहासिक महत्त्व आहे. दुसरे म्हणजे मर्ढेकरांच्या कवितेच्या आकलनासाठी केवळ त्यांच्या कवितेलाच गवसणी घालणारी व मर्ढेकरांच्या समीक्षेच्या भयगंडाने अजिबात न पछाडलेली देशपांड्यांची वस्तुनिष्ठ भूमिका. या भूमिकेमुळेच या लेखांचे मोल कालबद्ध न राहता त्यांना कालातीत परिमाणे लाभली. मर्ढेकरांवर आजपर्यंत पुष्कळ लेखन झाले; पण देशपांड्यांइतके प्रांजळ काव्यनिष्ठ आकलन नजरेस पडत नाही. या लेखांची मराठीच्या समीक्षावाङ्मयातील ऐतिहासिक व मौलिक इयत्ता आजपर्यंत दिवसेंदिवस वाढतच आली आहे, ती याच कारणांमुळे. लेखांच्या अगदी सुरुवातीलाच धोंडो विट्ठल देशपांडे कवितापरांतातील ' नव्याजुन्याचा सवतासुभा ' नाकारतात आणि मर्ढेकरांच्या कवितेची वेगळी व स्वतंत्र शक्तिकेंद्रे नेमकी टिपतात. अर्थात हे करत असतानाच या कवितेचे तथाकथित नवेपणही त्यांनी अप्रत्यक्षपणे सिद्ध करून टाकले आहे; ही इष्टापत्ती होय. नाही नाही म्हटले तरी नवे टप्पे प्रचलित मळवाटेवर स्वतःचे काही ठसे उमटवून जातातच, आणि त्यांचे तेच सामर्थ्य ' नवे ' पण म्हणून स्वीकारावेही लागतेच. मर्ढेकरांना ' नवकवी ' म्हटले अगर न म्हटले किंवा त्यांच्या कवितेला ' नवकविता ' म्हटले अगर न म्हटले तर त्याने काहीही फरक पडत नाही; पण त्यांच्या कवितेने मराठी कवितेच्या वाटेला काही नवीन वळणे पाडली आहेत आणि मर्ढेकरोत्तर पिढीमध्ये ही वळणे स्पष्टपणे रुळलेली आढळतात, इतके कबूल करावे लागते. उणीपुरी सव्वाशे वर्षे उलटून गेली तरीही अजून पाश्चात्य साहित्यातील नवकविता म्हटली की अपरिहार्यपणे बॉदलेयर या फ्रेंच कवीच्या कारकिर्दीपर्यंत जावेच लागते ! मराठी नवकाव्याचे मूलसूत्रही असेच कळत नकळत मर्ढेकरांच्या कवितेपाशीच जाऊन थडकते. धोंडो विट्ठल देशपांडे यांच्या या लेखांमध्ये मर्ढेकरी कवितेने मराठी कवितेला दिलेल्या नव्या वळणांची नोंद आहे—निष्कर्षांचा हव्यास व अट्टाहास नाही, हेच या लेखांचे बळ होय.

मर्ढेकर हे 'सवझूटवादी' आहेत आणि 'सवझूटवादी' हा संस्कारहीन असतो या तत्कालीन प्रचलित अनुमानात्मक विधानांचे खंडन करण्याच्या भूमिकेतून धोंडो विठ्ठल देशपांडे यांनी मर्ढेकरांचे समृद्ध संस्कारविश्व सोदाहरण सिद्ध केले आहे. त्यांनी सिद्ध केलेल्या या संस्कारसमृद्धतेचे दोन प्रमुख भाग आहेत. भाषेतील संस्कारसमृद्धता व आशयातील संस्कारसमृद्धता. संतवाङ्मयातील कळकळ, लोकवाङ्मयातील आवेश व पाश्चात्य वाङ्मयातील प्रतिमानिर्मितीचे बळ या तीन जबरदस्त संस्कारांनी अनवट झालेली मर्ढेकरांची भाषा; आणि गीता, बायबल व आधुनिक विज्ञान–संस्कृती इत्यादी तात्त्विक विचारधनाने गहन झालेला मर्ढेकरांच्या कवितेतील आशय यांच्या जोडीला धोंडो विठ्ठल देशपांडे मर्ढेकरांच्या प्रवृत्तीतील दुर्दम्य आशावादाची व मांगल्यपूजकतेची महिरप जोडतात आणि त्यामुळे मर्ढेकरांचे मराठी कवितेतील स्थान काय हा प्रश्न निर्माणही न करता सोडवून टाकतात. विफलता आणि आशावाद, श्रद्धा आणि विवेक, उपहास आणि विश्वास, विडंबन आणि कळकळ, मूल्यऱ्हास आणि मांगल्य अशा परस्परविरोधी टोकांवर सतत आंदोलत राहणारा मर्ढेकरी कवितेचा लंबक वाचकाला दुर्बोधतेच्या आवर्तात खेचतोच पण धोंडो विठ्ठल देशपांड्यांनी नेमकी या लंबकाची गतिशीलताच त्याचे प्राणतत्त्व म्हणून हेरली आणि या गतिशीलतेतील अनुभवगत प्रामाणिकपणा ठामपणे वाचकांसमोर मांडला, ही फार महत्त्वाची कामगिरी आहे. पूर्वसंस्कार आणि यंत्रयुग यांच्या कैचीत सापडलेल्या मर्ढेकरांसारख्या एका मनस्वी संवेदनाशील कवीची ही भावनिक, वैचारिक व अभिव्यक्तिगत आंदोलने त्यांच्या वेगासकट टिपणे, हे फार कठीण काम होते. धोंडो विठ्ठल देशपांडे यांनी हे केले व तेही मर्ढेकरांच्या कवितेला कुणी कधीही न दिलेले अनुभवगत इमानाचे परिमाण देऊन.

एरवी या शतकाच्या पाचव्या व सहाव्या दशकात जेव्हा ही अशी कविता प्रथम प्रकट झाली त्या वेळी तिचा पहिला परिणाम धक्का देणारा होता, हे स्वाभाविकच आहे. प्रतिमेचे बळ नसूनही केवळ वाचकाला काही तरी नवे दाखवून चकविण्यासाठी व धक्का देण्यासाठीच तर 'इरेस पडलो तर बच्चमजी' ही घोषणा नाही ना, असा भ्रम निर्माण होणेही गैरवाजवी नव्हतेच. धों. वि. देशपांड्यांनी या बाबतीत वाचकांचा भ्रमनिरास केला आहे व 'मर्ढेकरी काव्य हेय असेल पण ते अनुल्लेखनीय नाही' अशी ठाम भूमिका घेतली आहे. मर्ढेकरांच्या जिवाला त्रस्त करणारी पानगळीची व्यथा दुहेरी होती : मराठी काव्यप्रांतातील काव्यदारिद्र्य आणि भोवतालच्या यंत्रयुगीन संस्कृतिसंघर्षातील मूल्य-

ऱ्हास 'शिशिरागम' या पहिल्याच कवितेत ही दुहेरी पानगळीची व्यथा जाणवते. याच व्यथेपोटी जन्मलेली चीड, उपरोध व विडंबन आणि याच व्यथेपोटी लागलेली करुणा, सौंदर्य व प्रेम या अनुभवांची ओढ; हे मर्ढेकरांच्या कवितेच्या प्रवासातील प्रमुख टप्पे होत. चीड, उपरोध व विडंबन या मार्गाने जाणाऱ्या कवितांना 'समाजाभिमुखता' आणि करुणा, सौंदर्य व प्रेम या अनुभूतीच्या शोधात प्रतिभाबळावर अवगाहन करणाऱ्या कवितांना 'विशुद्ध कविता' ही विरुदे लावली तरी मर्ढेकर एकदम बदलले असे वाटत नाही. ते त्यांच्या अंतर्मनातील व्यथेच्या अखंड मूलस्रोतामुळेच. 'शिशिरागम' मधील भावविवश मर्ढेकर, 'कांही कवितां' मधील बंडखोर मर्ढेकर आणि 'आणखी कांही कवितां' मधील विशुद्ध कवी मर्ढेकर ही तीन्ही रूपे असंगत वाटत नाहीत, कारण ती मुळातील पानगळीच्या व्यथेशी इमान राखणारी आहेत. या तीन्ही भूमिकांमधील कवितांच्या आविष्कारात जी बेफाम भाषाविषयक परिवर्तने झाली तीदेखील आश्चर्यकारक आहेत. या प्रचंड गुंतावळीतून धोंडो विठ्ठल देशपांडे यांनी एका अनुभवाशी इमान राखण्याचा प्रामाणिक कवीच्या एकसंध व्यक्तिमत्त्वाचा शोध घेतलेला आहे.

कवी, तत्त्वज्ञ आणि माकड या तीन प्रवृत्तीचा मनोज्ञ संगम मर्ढेकरांच्या व्यक्तिमत्त्वात आढळतो आणि त्यामुळेच लालित्य, गांभीर्य व मिस्कीलपणा या प्रवृत्तींचेही एकत्रित दर्शन मर्ढेकरांच्या कवितेत आढळते। हे धोंडो विठ्ठल देशपांडे यांचे विधान मर्ढेकरांच्या नवेपणाला नेमके टिपते. 'विदूषक' पण हे तडकलेल्या सांस्कृतिक जीवनातील कलावंताच्या वाट्याला येणारे अटळ विरुद आहे. हे पात्र जितके शहाणे, जितके मिस्कील तितकेच गंभीरगंभीर असते. मर्ढेकरांच्या गतिशील कवितेची ही भूमिका जाणून देशपांडयांनी संपूर्ण मर्ढेकरांच्या आकलनाला एकसंधपणा व घनता आणली आहे. एका संस्कारसमृद्ध कलावंताची आंतरिक कळकळ, विक्षिप्तपणा, सौंदर्यशोध, तडफड–सहानुभूतिपूर्वक उलगडून दाखविली आहे. आणि "खऱ्या संन्यासाची परिणती कर्मयोगात, महानैराश्याची परिणती आशामय जीवनात आणि परमेशावलंबी आत्मजीवनाची परिणती स्वावलंबी समाजजीवनात होणे हेच क्रमप्राप्त आहे." असे विधान करून मर्ढेकरांच्या कवितेतील दृश्य विसंगती व वैफल्य ही त्यांच्या संस्कारसमृद्ध मनाशी विसंगत नसून पूरकच आहेत असा विचार सुचविला आहे. मतभेद होऊ शकतील, पण मर्ढेकरांच्या कवितेकडे बघण्याची ही दृष्टी प्रथम धोंडो विठ्ठल देशपांडे यांनी मराठी वाचकाला दिली व ती आज पंचवीस वर्षे उलटल्यानंतरही

तितकीच विचारार्ह वाटते, हे महत्त्वाचे श्रेय.

या लेखांचे सर्व श्रेय मान्य करूनही मला एक बारीकशी उणीव खटकत राहिली. मर्ढेकरांच्या कवितेतील दुर्बोधता हे एक स्वतंत्र प्रकरण आहे आणि धोंडो विठ्ठल देशपांड्यांनीही हे प्रकरण स्वतंत्रपणे हाताळायला हवे होते. इतर विषयांच्या संदर्भात सहज खपून जाईल असे हे प्रकरण नाही. देशपांड्यांनी या विषयाला हात घातला आहे. " विचारांचे व भाषेचे असे स्पर्शरेषेतील उड्डाण (Flight at a tangent) गृहीत धरूनच या तऱ्हेचे काव्य वाचले पाहिजे. त्याच्याकडून तर्कसंगतीची अपेक्षा करण्यातच मुळी मुळात चूक आहे "— अशा उचित शब्दांत मर्ढेकरांच्या विशुद्ध कवितेतील तर्कातीततेची झळकही त्यांनी दाखविली आहे पण या विधानाच्या पुष्टीसाठी दिलेले उदाहरण (धवल धुक्याच्या संथ बटांची ... ... किती मवाली इमलेवाले) दिशाभूल करणारे आहे. " भावसंगती कळली की आपोआपच तिचा तर्कसंगत अर्थ लागतो " असे विधान अगोदरच्या विधानाला घोटाळ्यात टाकते. भावसंगती ही तर्कसंगतीच्या नियंत्रणाखाली चिरडण्यापूर्वीचा क्षण त्याच्या गतिशीलतेसकट पकडणे ही ' इंप्रेशनिस्ट ' कलेची करामत. मर्ढेकरांची या जातकुळीची दुर्बोधता ज्या अखेरच्या कवितांमध्ये जाणवते त्या कविता नुसत्या वाचल्या तरी त्यातील तर्कनिरपेक्ष भावसंपादनाची थरथर बेचैन करते. रोमँटिक प्रेमकाव्य, सामाजिक अन्यायांबद्दल आवेशपूर्ण चीड, प्रखर विक्षोभ—अशा मार्गाने चालत गेलेली मर्ढेकरांची कविता या तर्कातीत भावस्पंदनांच्या टप्प्यावर कशी आली असेल— या प्रश्नाची अधिक तलस्पर्शी उकल व्हायला हवी होती. माझ्या मते विशुद्ध कविता ही विश्वव्यापी करुणेतून निर्माण होत असते. आवेश, चीड, क्षोभ, विद्रोह हे सगळे करुणेच्या अगोदरचे टप्पे आहेत. विश्वरचनेत मानवी असाहाय्यतेचा स्वीकार हा किती अपरिहार्य आहे हे एकदा पक्के जाणवले की मानवी असाहाय्यतेबद्दल आपोआप करुणा निर्माण होते. या सूत्राने मर्ढेकरांच्या अनुभवविश्वाचा शोध कदाचित काव्यगत दुर्बोधतेच्या मूळप्रकृतीलाच हात घालू शकला असता. माझ्याच शब्दांत मांडायचा झाल्यास विशुद्ध कवितेतील तर्कातीततेचा मूलमंत्र मी असा मांडेन—

हे कराल वास्तव प्याया
स्वप्नांना स्तोत्रे स्फुरती;
पाण्याला अडवावे का
करुणेच्या वळणावरती...

मर्ढेकरांच्या कवितेतील भाषागत व आशयगत आंदोलने आजही मराठी कवितेच्या मूलस्रोताची शक्तिकेंद्रे आहेत. ज्या वेळी ही कविता जन्मली तेव्हा तर ही आंदोलने अतिशय अपरिचित व अनुवंशहीन वाटली होती. कांडताना आवाजही होऊ नये म्हणून हातात एकच शंखकंकण घालणाऱ्या व्रतस्थ वैष्णवी-सारखी ही कवितादेखील उलटसुलट टीकेच्या व बदनामीच्या अग्निदिव्याला तोंड देत होती. स्वतःचे 'सत्त्व' दाखविण्यासाठी तिला निरनिराळे साज ल्यावे लागले; पण या सर्व साजांमधून तेजाळणारे तिचे उजळ मूळरूप धोंडो विठ्ठल देशपांडे यांनी या पुस्तकाच्या रूपाने साकार केले आहे. बंडखोरीकडून विशुद्धतेकडे जाणारी, वास्तवाचा घोट पचवत करुणेची स्तोत्रे गाणारी, काटेरी सुळावर चढताचढता खऱ्या अर्थाने स्वायत्त व निरंकुश होत जाणारी मर्ढेकरांची काव्य-समृद्धता देशपांड्यांनी रसिक कैवाऱ्याच्या भूमिकेतून मांडली आहे. देशपांड्यांची विश्लेषणशैलीही संशोधक व मर्मग्राही; पण तितकीच सुगम आणि प्रवाही आहे. त्यांच्या विद्वत्तेमुळे विचकायला होत नाही; उलट मोकळेपणी दाद देता येते, निःसंकोचपणे समीक्षेचा हा गुणदेखील कवितेच्या आकलनाला पूरक ठरतो. मर्ढेकरांच्याच शब्दांत आवरायचे तर त्यांची कविता "ऐशा टापूत चौफेर। नाही माहेर–सासर;" अशी. धोंडो विठ्ठल देशपांड्यांनी अशा अवखळ पण इमानी कवितेला मराठी समीक्षाप्रांतात पहिली आश्वासनपूर्ण हाक दिली ही वस्तुस्थिती महत्त्वाची–हेच या पुस्तकाचे खरे श्रेय.

ग्रेस

शुद्धिपत्रक

पृष्ठ क्रमांक	ओळ क्रमांक	अशुद्ध	शुद्ध
दोन शब्द : १	१३	सवंगाचे	सणंगाचे
१	२०	तस्मिल्लोकाः	तस्मिल्लोकाः
२	२	गोस्तु	गुरोस्तु
३	२४	इहामूत्र	इहामुत्र
४	१	वापलाळ ।	वापलळा ।
४	११	उद्रेखून	उद्मेखून
५	२५	भासर्तु	मासर्तु
६	७	प्राणि	प्राणी
८	१६	संपूणपणे	संपूर्णपणे
८	१८	वाटामुळे	चाटामुळे
८	२७	भराभरा फळवूं दे !	रेस भराभर फळवूं दे ।
१५	२९	हलक्य	हलक्या
१७	९	पाटातले	पाटीतले
१७	२२	या	त्या
१७	२३	द ग्रीक्स दे रोमन्स	द ग्रीक्स द रोमन्स
२७	२५	कायां ?	काय ?
२८	२	पिळून	पिळुनी
२९	१८	धर्य	धैर्य
३२	१३	व्योमत्सो	व्योमन्सो
३३	७	त्यात	यात

३३	२८	तेवढ्यावरच	एवढ्यावरच
३५	१३	यःपलायन	यःपलाय
३७	८	ढम्म	ढिम्म
३९	२८	तर्कगत	तर्कागत
४३	८	तोंडवळा	तोंडावळा
४६	१	व्यंगचित्रोमुळे	व्यंगचित्रामुळे
४९	१५	थरथर कांपत दुसऱ्या दिवशी;	थरथर कांपत यावी तशी·
४९	२२	अभविष्यत	अभविष्यत्
५६	२	तंबू	तुंब
५८	११	ओढा ताणीय	ओढाताणीत
६३	२०	ट्रैकोत्रा	ट्रैकोत्राही
७०	१३	प्रयत्न	प्रत्यय

मर्ढेकरांची कविता : एक अभ्यास

मर्ढेकर म्हणजे नवकाव्य व नवकाव्य म्हणजे मर्ढेकर, हे आजचे सर्वमान्य समीकरण आहे. म्हणून मर्ढेकरांसंबंधी काही लिहिण्यापूर्वी नवकाव्य म्हणजे काय, हे तपासून पाहावयास हवे. नवकाव्य हा शब्द थोडा तर्कदुष्ट वाटतो. काव्यांतील प्रवृत्ती नव्या वा जुन्या असू शकतात. कवितांचा घाट अर्वाचीन व प्राचीन असू शकेल. पण खुद्द काव्यांतही हा नव्याजुन्याचा सवता सुभा असतो, ही गोष्ट रसिक अंतःकरणाला पटत नाही.

नव्या संकेतांचा उपयोग नव्या कल्पना मांडण्याकडे केला गेला की नवकाव्य निर्माण होते, अशी एक नवकाव्याची व्याख्या सांगितली जाते. ही व्याख्या गृहीत धरली, तर अनवस्था प्रसंग उद्भवण्याचा संभव आहे. प्रत्येक थोर कवीला काही तरी नवे सांगावयाचे असते आणि ते सांगण्यासाठी तो काही नवे संकेतही निर्माण करतो. म्हणून काही आपण त्याला नवकवी म्हणत नाही. मग नवकाव्य म्हणजे काय ? जरा विचार केला, तर असे दिसून येईल की साधारण माणसाच्या मते संकेतांचा विक्षिप्तपणा हे नवकाव्याचे व्यवच्छेदक लक्षण होय. हेही लक्षण तेवढेसे तर्कशुद्ध नाही. प्रचलित विचारप्रणालीला विक्षिप्त वाटणाऱ्या संकेतांचा उपयोग यापूर्वीही थेट उपनिषद कालापासून केला गेला आहे :

यस्य ब्रह्म च क्षत्रं च उभे भवत ओदनः ।
मृत्युर्यस्योपसेचनं क इत्था वेद यत्र सः ॥
ऊर्ध्वमूलोऽवाक्शाख एषोऽश्वत्थः सनातनः ।
तदेव शुक्रं तद्ब्रह्म तदेवामृतमुच्यते
तस्मिल्लोकाः श्रिताः सर्वे तदुनात्येति कश्चन ॥ एतद्वै तत् ।
ओम्पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात् पूर्णमुदच्यते ।
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥

चित्रं वटतरोर्मूले वृद्धाः शिष्या गुरुर्युवा
गुरोस्तु मौनं व्याख्यानं शिष्यास्तु च्छिन्नसंशयाः ॥

हे सर्व उतारे औपनिषदिक वाङ्मयांतील आहेत. ही आज सर्वमान्य झालेली वर्णनपद्धती एके काळी विक्षिप्तच वाटली असली पाहिजे. मग उपनिषदांचा असला भाग नवकाव्याच्या चौकटीत 'फिट्ट' का बसू नये ? मराठीपुरतेच बोलावयाचे तर एकनाथाची भारुडे, जुन्या कवींची कूटकाव्ये इत्यादींवरही नवकाव्याचा छाप मारावा लागेल. 'चिंचेच्या पानावर देऊळ बांधिलें, आधीं कळस मग पाया रे।' येथे नवा संकेत आहेच आहे. कल्पनाही जुनी नाही. मग हे नवकाव्य आहे काय ?

रसिकांच्या मते हा प्रश्न बाष्कळ आहे. प्रत्येक नवा पायंडा पाडणारा कवी आपल्या वडिलांच्या दृष्टीने नवा व पुढीलांच्या दृष्टीने जुना ठरतो. म्हणूनच नवकाव्य, जीर्णकाव्य इत्यादी भानगडीत न शिरता एखाद्या कलाकृतीत काव्य आहे की नाही हे पाहणे एवढेच अगत्याचे असते. नवकाव्य असो वा जीर्णकाव्य असो, प्राचीन असो वा अर्वाचीन असो, त्यांतील 'काव्या'ची जात एकच असते. आणि रसिकाला आनंद होतो तो या 'काव्या' पासून. त्याला घातलेली नवसंकेतांची अंगडी टोपडी हा त्याचा गौण भाग होय. खुद्द मर्ढेकरांची 'नवीन भावनानिष्ठ समतानता'—न्यू इमोशनल इक्विव्हॅलन्सेस—म्हणजे काव्यांतील नावीन्य, ही व्याख्या जरी गृहीत धरली तरीही एक प्रश्न उभा राहतो : निव्वळ नवी भावनानिष्ठ समतानता रसिकाला आनंद देऊ शकेल काय ? 'क्ष = य' या चौकटीत दोन नव्या समतानता बसविल्या, तर काही तरी नवे उत्पन्न होईल, हे खरे; पण ते नवे काव्य असेल, याची खात्री देता येत नाही. भावनानिष्ठ समतानता निर्माण झाली की तेथे काव्य निर्माण झालेच पाहिजे, असाही काही लोकांचा आग्रह असण्याचा संभव आहे. त्यांच्या मते काव्य ह्या समतानतेचा तर्कशुद्ध परिणाम होय. पण नवकाव्याच्या प्रांतातील मर्ढेकरांच्या अनुचरांनी केलेले नवे प्रयोग पाहिले की ह्या आग्रहाचा फोलपणा प्रत्ययास येतो, आणि निव्वळ भावनानिष्ठ समतानता म्हणजे काव्य नव्हे, हे पटते. रसोत्पत्ती हेच काव्याचे व्यवच्छेदक लक्षण होय. नवसंकेत, नव्या कल्पना, नव्या भावनानिष्ठ समतानता या सर्व फापटपसाऱ्यातून जर काही रसनिष्पत्ती होत असेल, तरच त्याला काव्य म्हणता येईल. संकेत, कल्पना, समतानता इत्यादी

काव्याची साधने होत. मर्ढेकरांची ही साधने नवीन आहेत, म्हणूनच त्यांना नवकवी म्हणावयाचे, हाच ज्यांचा हट्ट असेल त्यांना खूष करण्यासाठी पाहिजे तर आपण मर्ढेकरांना नवकवी म्हणू. पण ही पद्धती म्हणजे नरोटी पाहून आतील गराबर अभिप्राय देण्यासारखा प्रकार आहे, हे येथे आवर्जून सांगितले पाहिजे.

मर्ढेकरांनी नवकाव्य लिहिले आहे खरे, पण तरीही ते जुन्या पिढीतील काव्याइतकेच आत्मनिष्ठ आहे, हे तेवढेच खरे. म्हणून त्यांचे काव्य वाचून त्यांच्या व्यक्तित्वाचे कोणते चित्र आपल्यासमोर उभे राहत, हे आपण प्रथम पाहू. 'शिशिरागम', 'काही कविता' आणि 'आणखी काही कविता' वाचून पाहिल्यावर पहिल्या प्रथम मनावर ठसणारी गोष्ट म्हणजे मर्ढेकरांची भाषा. 'शिशिरागम' हा त्यांचा पहिलाच कवितासंग्रह. त्यातील कवितांवर रविकिरण मंडळाची गडद छाया आहे. मर्ढेकर या संग्रहात काव्याचे कित्ते गिरवीत आहेत. म्हणून या पुस्तकाचा विचार प्रस्तुत भाषाप्रकरणी न केला तरी चालेल. अर्थात तेथेही एकदोन कवितांत भावी मर्ढेकरांची झळक दिसते हेही नमूद करावयास हवे. आता राहता राहिले 'कांहीं कविता' आणि 'आणखी कांहीं कविता' हे दोन संग्रह. यांची भाषा मर्ढेकरांच्या व्यक्तित्वाचा एक वेगळाच साक्षात्कार आपणांस घडविते. मर्ढेकर सबझूटवादी आहेत, हे त्यांच्याबद्दलचे सर्वप्रचलित मत. आणि सबझूटवादी म्हटला की तो संस्कारहीन असलाच पाहिजे हे ओघाने आलेच. पण मर्ढेकरांच्या बाबतीत हे खरे नाही. त्यांची भाषा क्लिष्ट आहे, पण ती संस्कारहीन नाही. सर्व जुन्या मराठी वाङ्मयाचा संस्कार त्यांच्या भाषेवर झालेला दिसतो. ती अंशतः ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास यांच्या पठडीतील भाषा आहे. जुन्या संस्कृत साहित्याचे प्रतिध्वनी त्यांच्या भाषेत वाचकांच्या कानांवर वारंवार आदळत राहतात. 'इथें तिथेंचें फुटलें खापर' या ओळीच्या अनुषंगाने गीतेतील 'इहामुत्र' शब्दप्रयोग लक्षात ठेवून 'फिरविला घट फोडिला चरणीं, महावाक्यध्वनी बोंब झाली' ही तुकोबाची ओळ वाचून पाहावी, म्हणजे वरील विधानाची सार्थता प्रत्ययास येईल. मर्ढेकरांचे 'गा' हे संबोधन जुन्या काव्याच्या परिणामांचा दृश्य पुरावा म्हणून पुढे करता येईल.

आई गोंजारते मुला । कासया हा बापलाळ ।
बाईल प्रीतीच्याहि कळा । कशास्तव ॥
जातां मायेची माउली । केली बापानें सांवली ।
आतां बहिण–बाइलीं । धीर दिला ॥
हीही जातील गा देवा । मग सर्वांचा सुगावा ।
कैसा कैसा रे लागावा । आंधळ्याला ॥
झाली इच्छा ऐशी पुष्ट । आतां ओढवे अरिष्ट ।
कैसें निवडावें इष्ट । उद्दिष्ट तें ॥

या ओव्या मर्ढेकरांच्या पुस्तकातून काढून ज्ञानेश्वरीत योग्य ठिकाणी टाकल्या, तर सहज खपून जातील. चवथ्या ओळीतील ' बहिण–बाइलीं ' हे तृतीयांत रूप तज्ज्ञांच्या सहज लक्षात येईल, म्हणून त्याचा उद्रेखून उल्लेख न केलेला बरा. (' गा ' या संबोधनासंबंधी वर जे सांगावयाचे, ते सांगितलेच आहे.) खुद्द मर्ढेकरांनाही या परिणामांची जाणीव आहे. आणि म्हणूनच की काय, त्यांनी ' कांहीं कवितां ' च्या नमनात या संतांचा उल्लेख केलेला आहे :

कुठें ज्ञानेश्वर श्रेष्ट । कुठें तुकाराम पवित्र ।
कुठें समर्थ धीरोदात्त । संत सर्व ॥

हा तो उल्लेख होय. ज्ञानेश्वर, तुकाराम आणि समर्थ यांचा आवर्जून केलेला हा उल्लेख यदृच्छायोग नाही. मर्ढेकर घराण्याचा समर्थ संप्रदायाशी फार जवळचा संबंध आहे, असे कळते. त्या पार्श्वभूमीवर ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदासांच्या ह्या उल्लेखाला एक निराळीच धार असावी, असे वाटते. अर्थात सगळीकडे हे उल्लेख असे आदरार्थीच आहेत, असे नाही. काही ठिकाणी या संतांच्या काही प्रख्यात ओळींच्या साच्यांचा उपयोग मूस म्हणून आपले स्वतःचे विचार ओतण्यासाठी केलेला आहे. आणि ह्या मुशीतून बाहेर पडलेल्या नगाचा सूर मिस्किल चेष्टेचा आहे. मर्ढेकरांची खालील कविता या प्रकारचे एक उत्कृष्ट उदाहरण होय :

जे न जन्मले वा मेले । त्यांसी म्हणे जो आपुले ।
तोचि मुत्सद्दी जाणावा । देव तेथें ओळखावा ॥

मोलें धाडी जो मराया । नाहीं आंसू आणि माया ।
त्यासि नेता बनवावें । आम्हां मेंढरांसी ठावें ॥

(ही कविता ४७ सालापूर्वीची आहे, हे तीतील विचारसरणीच्या अनुबंधात लक्षात ठेवावयास हवे. या कालवैशिष्ट्याच्या महत्त्वाचा विचार आपण यथावकाश करू) तुकोबांची आठवण करून देईल, अशा 'तुकारामी' घाटात आपले खवट विचार मर्ढेकरांनी या कवितेत मांडले आहेत. जेथे जातो तेथे । मी माझा सांगाती । डोळ्यांच्याच भिंती । झाल्या ऐशा ॥ हाही तुकारामी मुशीत ओतून घडविलेला मर्ढेकरी नग होय. तुकोबारायांचा मर्ढेकरांवर परिणाम झाला आहे, एवढे ह्यावरून सहज सिद्ध होईल.

संत-काव्यांतील काही कल्पनादेखील मर्ढेकरांनी जशाच्या तशा उचललेल्या दिसतात. 'आणखी कांही कवितां'तील 'भंगुं दे काठिन्य माझें आम्ल जाऊं दे मनींचें' (कविता क्र. १) ही कविता आणि 'ज्ञानेश्वरी'च्या बाराव्या अध्यायातील गुरुमाउलीच्या नमनाच्या अनुषंगाने श्रीज्ञानेशांनी सांगितलेली साहित्याची लक्षणे या दृष्टीने अभ्यसनीय आहेत. हा संतवाङ्मयाचा परिणाम येथेच थांबत नाही. मर्ढेकरी ओवीची वृत्तानुषंगी लयही थेट ज्ञानेशाच्या औटचरणी ओवीच्या घाटाची आहे. दोन्ही ओव्या जोराने तालावर वाचून पाहिल्यास हे साम्य रसिकांच्या चटकन लक्षात येईल.

जुन्या संस्कृत साहित्याचा उल्लेख वर केलेला आहेच; त्याचा पुरावा म्हणून खालील उताऱ्यातील कल्पनासाम्य पडताळून पाहण्यासारखे आहे :

(१) शब्द अर्थाआधीं यावा, हें तो ईश्वराचें देणें;
(ऋषीणां पुनराद्यानां वाचमर्थोऽनुधावति)

(२) ह्या दुःखाच्या कढईची गा । अशीच देवा घडण असूं दे;
... ...
शिजत्या मांसामधून कोणी स्वर्ग हुंगतो बुलंद बहिरा ।
(अस्मिन्महामोहमये कटाहे । सूर्याग्निना रात्रिंदिनेंधनेन ॥
भासर्तु दर्वीपरिघट्टनेन । भूतानि कालः पचतीति वार्ता ॥)

(३) न्हालेल्या जणुं गर्भवतीच्या सोज्ज्वळ मोहकतेनें बंदर मुंबापुरिचें उजळित येई माघामधली प्रभात सुंदर.
(द्रुमाः पांडुप्रायाः धृतनिबिडगर्भाः स्त्रिय इव)

'सर्वे जन्तु रुटिनाः', 'सह नौ टरक्तु', 'कुत्रापि पतितं तोयं', 'तमहं वन्दे', इत्यादी पंक्तींचा उल्लेख ह्या अनुबंधात करता येईल. पण त्यांतील मिस्किलपणामुळे तो येथे न केलेला बरा.

जुन्या संतवाङ्मयावरोवरच मर्ढेकरांची भाषा लोकवाङ्मयाचेही देणे लागते. 'अंवोणीच्या मागें का ग तुझा माझा चंद्र गेला ?' "सरणावरती सरण लागलें, जिवंत आशा पडे उताणी, गयागोपिचा उतरे राजा, 'सुटला'—म्हणती सारे—'प्राणि'", "देवाजीनें करुणा केली भातें पिकून पिवळीं झाली", "पोपटपंची चतुर किजान पढो पार्वती शिरि भगवान", "शुभं करोति कल्याणं," इत्यादी ओळी या ऋणाची साक्ष देतील. जुन्या मराठी पाठ्य पुस्तकांतील पिवळ्या भातावर आज लोकवाङ्मयाचा रंग चढलेला आहे, असे म्हटले तर काही फारशी चूक होणार नाही.

मर्ढेकरांचा इंग्रजी वाङ्मयाचा व्यासंग दांडगा आहे, ही गोष्ट जगजाहीर आहे. अर्थात मायमाउली इंग्रजीच्या परिणामापासून ते कसे अलिप्त राहू शकतील ? जेथे पालग्रेव्हच्या हैमकोशाने—आणि तोही ह्या भारतात वाचलेला —मराठी काव्यात क्रांती करून सोडली, तेथे खुद्द लंडनमध्ये केलेल्या इंग्रजी वाङ्मयाच्या परिशीलनाचा परिणाम मर्ढेकरांवर झाला असला पाहिजे, हे काय सांगावयास हवे ? जागोजाग विखुरलेले इंग्रजी शब्द या परिणामाची साक्ष देत आहेत. पिस्टन्, बेकलाइटी, पायलन्स, रोबो, इंजेक्शन्, थ्रू, सिलिंडर इत्यादी शब्द आपापल्या संदर्भात अनिवार्य असले, तरी ते एखाद्या यज्ञमंडपात उद्गात्याच्या जागी बसलेल्या मौलानासारखेच परके वाटतात; आणि म्हणूनच हे काही अंशी मर्ढेकरांच्या वाङ्मयीन अपकीर्तीला कारणीभूत झाले आहेत. नाही तरी दत्तक बाळे बापाला कधी तरी सुख देतात का ? इंग्रजी शब्दांचा हा सर्रास उपयोग सर्वसाधारण वाचकांनी विक्षिप्तपणाच्या खाती जमेस धरला आणि मग टीकाकारांनी नवकाव्य आणि मर्ढेकर या दोघांवर टीकेची राळ उडवली.

हे झाले निव्वळ इंग्रजी शब्दांबद्दल. इंग्रजी धाटणीचे मराठी शब्दप्रयोग, हे मर्ढेकरांचे आणखी एक वैशिष्ट्य होय. 'अपंग आरोळी', 'घंटानाद जाई आंबुनी', 'आळसली नव जिवंतता ही', 'अंमळशापोटीं' इत्यादी शब्दप्रयोगांना काही इंग्रजी अलंकारांचा वास येतो. क्वचित इंग्रजी वाक्प्रचारांचे व्रात्यस्तोमविधीने मराठीकरण केलेलेही आढळते :

" राव, सांगतां देव कुणाला
शहाजोग जो शहामृगासम; "

... ...

" कोरडी ठेवावी । दारू सर्व काळ । "

हे त्या प्रकारच्या व्रात्यस्तोमविधीचे नमुने होत. अवतरणांचा इंग्रजी प्रयोगसुद्धा मर्ढेकरी भाषेचा एक विशेष होय.

" गयागोपिचा उतरे राजा,
' सुटला–', म्हणती सारे, '–प्राणी ' "

यांतील अवतरणाची विभागणी मर्ढेकरांनी इंग्रजीतून उचलली आहे. इंग्रजी-मराठीचे नमुनेही त्यांच्या काव्यात आढळतात.

" मम उडती शब्द-पिसें । हृत्पंखांतले जें ससे
ज्यां ज्ञात गोफणीसरसें । खाली आणी ॥ "

ह्या ओवींतील जाड टाईपातील संबंधी सर्वनामांचा प्रयोग इंग्रजी-मराठीचाच प्रकार आहे. एकंदर मर्ढेकरी कवितेच्या घाटाबद्दल तर बोलावयाचेच कारण नाही. ती मुळी इंग्रजी वळणाची आणि तीही आधुनिक घाटाच्या इंग्रजी वळणाची कविता आहे. चित्रकलेत इंप्रेशनिझम् म्हणून एक प्रकार आहे. त्याच्या तंत्राचा शब्दांच्या माध्यमावर केलेला प्रयोग म्हणजे मर्ढेकरांचे काव्य (खुद्द मर्ढेकरांना शब्दांचे माध्यम हा शब्दप्रयोग आवडणार नाही.) एवढे कबूल केले की इंग्रजी भाषेच्या परिणामांचे आणखी चर्वितचर्वण करण्याचे कारण नाही.[१]

---

१ *'मराठी काव्य एवढे परपुष्ट आहे की ते पुरेसे परपुष्ट नाही, हे मर्ढेकरांचे मराठी काव्याबद्दलचे मत प्रख्यातच आहे. यावरून निदान त्यांनी स्वतःच्या कवितेला तरी पुरेशी परपुष्ट केली असावी, असा कयास बांधावयास हरकत नसावी. पुन्हा त्यांना इंग्रजी सोडून आणखी एक दोन युरोपियन भाषा चांगल्या येतात, यावरूनही या कयासाला दुजोरा मिळतो. पण हे परिणाम कोणते व कोणत्या भाषेचे, हे शोधून काढण्याचे काम बहुभाषाभिज्ञ पंडितांचे होय; आणि म्हणूनच प्रस्तुत लेखात यासंबंधी काहीही विवरण करता येत नाही.*

वरील वेगवेगळ्या परिणामांचे विवेचन करीत असताना सुबोधता व सोय या दोन्ही दृष्टींनी त्यांचे विश्लेषण करून त्यांचे क्रमवार विवेचन केले आहे. यावरून वाचकांचा असा गैरसमज व्हावयाचा संभव आहे की, मर्ढेकरी काव्यांत या सर्वांची भेसळ आढळते, वस्तुस्थिती मात्र तशी नाही. मर्ढेकरांच्या मनाची ग्रहणशक्ती अतिशय तीव्र आहे, पण त्यावरोबरच त्यांचे व्यक्तित्वही तेवढेच दमदार आहे, आणि यामुळेच ग्रहण केलेल्या गोष्टी आणि त्यांचे स्वतःचे व्यक्तित्व या दोहोंच्या परस्परांवर क्रियाप्रक्रिया होऊन त्यांचे जणू काय एक नवीन रसायन तयार झालेले आहे. त्यांनी ज्ञानेश्वर-तुकारामांची निव्वळ नक्कल कोठेही केलेली नाही किंवा इंग्रजीचेही भाषांतर त्यांच्या काव्यांत आढळणार नाही. इंग्रजी शब्द वापरताना त्यांनी ते अशा तऱ्हेने वापरलेले आहेत की ते आपापल्या जागी स्वतःच्या अभिधा–व्यंजना–लक्षणेसह अगदी ताशीव चिऱ्यासारखे चपखल बसतात. हे शब्द काव्य-विषयाशी व तद्ग्राहक भाषेशी इतके एकरूप झालेले आहेत की क्षण-भर वाचकाला त्यांच्या परकीयत्वाचा विसर पडतो. मर्ढेकरप्रणीत इंग्रजी शब्द आपआपल्या विशिष्ट संदर्भात अनिवार्य आहेत, ते ह्यामुळेच. त्यांनी लोक-वाङ्मय, संस्कृत साहित्य इत्यादींचा असाच उपयोग केला आहे. ह्या काव्यवाहक मुशी जुन्या असतील पण त्यात ओतलेला विचाररस संपूर्णपणे अद्यतन आहे, जुन्या घाटात व्यक्त झालेल्या ह्या नवविचारांचे सामर्थ्य दुहेरी आहे. ह्या विचारांना स्वतःची धार आहेच, पण त्यांच्या बाह्य वाटामुळे जुन्या वाङ्मयातील ओळी आठवतात. ह्या आठवणीमुळे जुन्या आणि नव्या ओळींतील विरोध मनावर ठसतो, आणि ह्या प्रक्रियेमुळे नव्या मर्ढेकरी ओळी आणि त्यांतील विचार ह्या दोहोंना अधिकच उठाव मिळतो. वरवर पाहिले असता माकडचेष्टा वाटणाऱ्या ह्या मर्ढेकरी क्लृप्तीचे सामर्थ्य विलक्षण आहे. मर्ढेकरी ' भूपाळी ' आणि ' शुभं करोति ' ह्या दृष्टीने उल्लेखनीय होत. ' सहनाववतु सह नौभुनक्तु 'ची मर्ढेकरी आवृत्ती अशीच विषाक्त आहे. ' सर्वेऽत्र सुखिनः सन्तु ' आणि ' सर्वे जन्तु रुटिनाः ' ह्यांतील विरोधांतर्गत खोच दर्दी वाचकांच्या सहज लक्षात येईल. ह्या बाबतीत मर्ढेकरांनी आधुनिक काव्यालादेखील वेटीस धरले आहे :

" सालोसाल मरूं दे मेला ! भराभरा फळवूं दे ! "

... ...

" डोळे हे फिल्मि गडे, खोकुनि मज पाहुं नका !
काढूं मी दळणा कशि, निवडुं सख्या, आणि मका ! "

हे आधुनिक काव्याच्या अशा कुतरओढीचे नमुने होत. लावणी, नाटकांतील पदे इत्यादींनादेखील मर्ढेकरांनी अशाच तऱ्हेने रावविले आहे. रसिक वाचकाला मर्ढेकरी काव्यांतील हे ओळखीचे चेहरे सहज हुडकून काढता येतील.

हे झाले मर्ढेकरी भाषेवरील वाह्य परिणाम. याशिवाय त्यांच्या स्वतःच्या म्हणून काही लकबी आहेतच. यतिभंग त्यांच्या खिजगणतीत नाही. वाक्यरचनेच्या सर्वसाधारण नियमांना ते कधी कधी धाब्यावर बसवितात. '—' या विराम-चिन्हांचा उपयोग तर ते लागेल तेव्हा व लागेल तेथे बेधडक करतात. कवितेच्या ओळी भलत्याच टिकाणी तोडण्याची त्यांची करामत अजब आहे. या सर्व गोष्टी-मुळेही मर्ढेकरी भाषेला आपला स्वतःचा असा एक आकार आला आहे. ' शिशिरागम ' वाचल्यावर मर्ढेकरांना पारंपरिक वाक्यरचनेस अनुसरून कविता लिहिता येतात, हे कोणीही मान्य करील. एवढे असूनही त्यांनी आपल्या पुढील दोन संग्रहांत मात्र वाक्यरचनेचे अभिनव प्रयोग केले आहेत. वा अभिनवते-मुळेही थोडीबहुत बदनामी मर्ढेकरांच्या वाट्यास आली आहे. त्यांच्या सर्वांत जास्त बदनाम कवितेची पहिलीच ओळ या तऱ्हेवाईक वाक्यरचनेचा एक उत्कृष्ट मासला आहे—' पिपांत मेले ओल्या उंदिर—' हीच ती ओळ होय. अशा वाक्यरचनेचे कारण मर्ढेकरांचे मर्ढेकरांसच माहीत.

" विशाल पट्टे सतेज तांबुस,
जरा सैल अन् मऊ, कातडी
सिलिंडरावर गरगर फिरती
किति वेगानें !—जणूं सालडी
काळाचीं, जीं प्रकाश कातित
गिरगिरती ह्या पृथ्वीभंवतीं."

हाही विक्षिप्त वाक्यरचनेचा आणखी एक नमुना होय. भावाभिव्यक्तीच्या दृष्टीने ह्या अभिनव वाक्यरचनेला काही तरी महत्त्व असावेच असावे, नाही तर मर्ढेकरां-सारखा फर्डा पंडित भाषेशी अशा माकडचेष्टा करता ना. पण ह्या महत्त्वाचे गूढ उकलता उकलत नाही, एवढे मात्र खरे. येथे ओघातच आले म्हणून मर्ढेकरांच्या

काव्यांतील तालबद्ध लयीचा उल्लेख करावयास हवा. काव्यार्थाशी संवादी असणाऱ्या ताल लयींचा उपयोग करण्याकडे मर्ढेकरांनी विशेष लक्ष दिले आहे. त्यांच्या भाषेत संगीतप्रधान माधुर्य नाही; मृदुव्यंजनांच्या सानुस्वार आवृत्या त्यांत मिळणार नाहीत; यमक, अनुप्रास इत्यादी शब्दालंकार क्वचित कोठे आढळले तरच. तरीही त्यांच्या भाषेची भावसूचक भव्यता उल्लेखनीय आहे.

" आलों होतों, आलों होतों
होतों जाणार जाणार;
कां रे अंमळशा-पोटीं
तरी सांटवीसी जार "

आणि

" ह्या दुःखाच्या कढईची गा
अशींच देवा घडण असूं दे;
जळून गेल्या लोखंडांतहि
जळण्याची, पण पुन्हा, ठसूं दे
कणखर शक्ती, ताकद जळकट."

ह्या दोन कवितांच्या लयीतील फरक ह्या दृष्टीने चिंत्य आहे. पहिल्या उताऱ्यातील विपण्णता आणि दुसऱ्यातील जोम ह्या दोघांचे ध्वनिगम्य पडसाद ह्या लयीत उमटलेले दिसतात. ह्या दोन्ही उताऱ्यांच्या पाठोपाठ

" अडलिस आणिक पुढें जराशी
पुढें जराशी हसलिस;
—मागे
वळुनि पाहणें विसरलीस का ?
विसरलीस का हिरवे धागे ? "

ह्या ओळी वाचून पाहिल्या की त्यांच्या द्रुत लयीचा थिल्लर गोडवा चटकन लक्षात येईल. असो.

मर्ढेकरांवर जसा प्राचीन संतवाङ्मयाचा परिणाम झाला आहे, तसाच बायबल व तत्संबंधी वाङ्मयाचाही त्यांच्या विचारसरणीवर फार मोठा परिणाम झाला असावा, हे स्पष्ट दिसते. ' इलस्ट्रेटेड वीकली ' च्या नाताळच्या अंकात आणि

इतरत्रही प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या कविता या समजुतीस पुष्टी देतात. पापाचार आणि 'मी पापी आहें' या जाणिवेचा उल्लेख वारंवार त्यांच्या काव्यांत येतो. हा बायबलचा अध्याहृत परिणाम असावा, असे वाटते.

" ओल्या पापांचीं वाळून । झालीं वातड खापरें "
" पापांतून पापाकडे । जाई पाप्याचा विचार
आणि पुण्याचीं किरणें । लोळतात भुईवर ॥ "
" मनांतल्या पातकांचे । होती क्रिस्टल तयार; "
" काळ्यावरतीं जरा पांढरें । ह्या पाप्याच्या हातुन व्हावें—"
" चपापला पापी जीव, फक्त एथल्या घाईनें ! "
" अन् चिखली ये बिचकत वास
जणुं पाप्याचा पश्चात्ताप "
" तेल पाण्यांत जिरावें
पाप बुडावें संज्ञेंत;
हें तों अशक्य अशक्य,
विज्ञानाच्याहि भाषेंत ! "

इत्यादी पापाचे प्रत्यक्ष उल्लेख आणि

" आम्ही ज्ञानवंत भागलों ।
ना पश्चात्तापें पोळलों ।
नाहीं कधीं हळहळलों ।
परदुःखें । "

यात अप्रत्यक्षपणे व्यक्त झालेली आत्मभर्त्सना बायबलच्या संस्कारांचा परिणाम असावी. " पापोऽहं पापकर्माहं पापात्मा पापसंभवः ' ही कल्पना हिंदुतत्त्वज्ञानातही अपरिचित नाही. पंतांची 'केकावली' तर याच भावनेचा वाङ्मयीन आविष्कार आहे. संतवाङ्मयांतूनही असे उतारे काढून दाखविता येतील हे खरें पण तिचे प्राबल्य हिंदुतत्त्वज्ञानात तवढे जबर नाही. सर्वसाधारणपणे 'उद्धरेदात्मनात्मानम्' हाच हिंदुतत्त्वज्ञानाचा संदेश आहे. या उलट 'ओरिजिनल सिन' हाच ख्रिस्तीधर्माचा पाया होय. त्यांच्या प्रेषितासंबंधीच्या 'रिडीमर'च्या कल्पनेचे अधिष्ठान 'ओरिजिनल सिन्' हेच आहे. म्हणूनच पाप व तत्संबंधी

उल्लेख हे बायबलचे परिणाम असावेत, असे वाटते. ' देवाघरचा शाप देवळी ' या ओळीला ॲडमला आज्ञाभंगाबद्दल मिळालेल्या शापाचा वास येतो. ' आणखी कांही कविता 'तील उपसंहारावरही ख्रिस्ती धर्मकल्पनेची छाया पडली आहे, असे वाटते.

" कधीं लागेल का नख
तुझें माझिया गळ्याला,
आणि सामर्थ्याचा स्वर
माझिया गा व्यंजनाला ! "

ह्या त्या उपसंहारातील प्रख्यात ओळी होत. ह्या ओळींची यथास्थित चीरफाड अगोदरच झाली आहे. एक वेळ आणखी कोणी त्यांचे धिंडवडे काढले म्हणून काही बिघडत नाही.

जेहोवाने अगोदर ॲडमचे शरीर निर्माण केले आणि नंतर त्यात चैतन्य ओतले, अशी एक कथा आहे. हा कथाभाग बायबलच्या जुन्या करारातील होय. मायकेल ॲंजेलोने ' सिस्टीन चॅपल 'च्या छतावर ' क्रिएशन ' नावाच्या चित्र-समूहात याच कल्पनेवर आधारलेले चित्र चितारले आहे. या चैतन्यदानाला चित्रगम्य रूप देता यावे, म्हणून ॲंजेलोने तीत थोडा बदल केला आहे. या चित्रात जेहोवा ॲडमला तर्जनीने स्पर्श करून त्याच्या शरीरात चैतन्य ओतीत आहे, असे दाखविले आहे. अर्थातच ह्या चित्राप्रमाणे जेहोवाच्या तर्जनीचे नख चैतन्यदायक आहे, हे ओघानेच आले. ह्याच कल्पनेचा उपयोग मर्ढेकरांनी वर उद्धृत केलेल्या ओळींत केला असावा, असे वाटते. शेवटच्या दोन ओळींत स्वर व व्यंजनाचा सामर्थ्यासह उल्लेख आहे. व्याकरण-शास्त्राप्रमाणे स्वरविरहित व्यंजनाचा उच्चार करता येत नाही, हे लक्षात घेतले की, ' गळ्याला लागलेले नख ' आणि व्यंजनाला लागणारा सामर्थ्याचा स्वर ह्या दोन्ही कल्पना स्पष्ट होतात. मर्ढेकरांचा ईश्वरावर व त्याच्या सामर्थ्यावर विश्वास आहे, हे त्यांच्याच कवितांवरून वाटेल तेव्हा सिद्ध करता येईल. या विषयाकडे आपण यथाक्रम वळूच. प्रस्तुत संदर्भात गळ्याला लागणारे नख हे परमेश्वराचे चैतन्यदायक नख आहे आणि ते गळ्यास लागले असता कवीच्या व्यंजनाला सामर्थ्याचा स्वर लागेल, एवढे लक्षात ठेवले म्हणजे पुरे. ही नखाची कल्पना

आणि त्या नखाची जीवनशक्ती बायबलचा—निदान मायकेल अँजेलोच्या-चित्राचा परिणाम आहे असे म्हणण्यास प्रत्यवाय असू नये. ईश्वराच्या या चैतन्यदायक शक्तीचा उल्लेख मर्ढेकरांनी इतरत्रही केलेला आहे.

" होतें—आहे—होइल यांतुन
बीज वाहते होण्याचीच;
त्या स्नायूंच्या तारांचा रे,
तुझ्याच हाताखालीं स्वीच."

ह्या ओळींतील स्विच म्हणजे जेहोवाच्या नखाचे दुसरे रूप आहे. ईश्वराच्या नियंतृत्वावर मर्ढेकरांचा गाढ विश्वास आहे हेच खरे.

मर्ढेकरांची विषयप्रतिपादनाची शैलीही थोडी विचित्रच आहे. आपल्या परिचित काव्यप्रणालीप्रमाणे काव्यांत भाषा जरी भाववाहक असली, तरी तिची मांडणी तर्काधिष्ठित असते. भावनेचे वा भावसत्याचे तर्कसंगत वर्णन करणे, यावरच कवी आपले कौशल्य खर्च करतो. नव्या मर्ढेकरी पटडीप्रमाणे भाषेच्या मांडणीत तर्कसंगतीला प्राधान्य नाही. तिच्यात भाषिक मांडणीलादेखील भाव-क्रमाचे बंधन आहे आणि म्हणूनच मर्ढेकरांच्या पुष्कळशा कविता दुर्बोध वाटतात. नवा भावानुबंध सहजासहजी आपल्या लक्षात येत नाही, हेच या दुर्बोधतेचे कारण होय.

" कणा मोडिला निश्चलतेचा
ह्या पालीच्या आवाजानें;
' धम्मम् सरणम् ' कुणी बोललें
पाषाणांतिल बुद्ध-मिषानें "

ह्यांत पालीचा आवाज आणि ' धम्मम् सरणम् ' हे बौद्ध घोषवाक्य यांत अर्था-अर्थी काही संबंध दिसत नाही. तर्कानुबंधाच्याच दृष्टीने विचार केल्यास ह्या ओळीं-वर असंबद्धतेचाच छाप मारावा लागेल; पण भावकल्पांच्या (impression) दृष्टीने विचार केला असता त्या ओळी तेवढ्या असंबद्ध वाटत नाहीत. ' पालीच्या ' ह्या शब्दामुळे ध्वनिसाम्याने पाली भाषेची कल्पना मनात येते आणि पालीमुळे बौद्ध वाङ्मय आणि ह्या वाङ्मयामुळे सौगतांचे ' धम्मम् सरणम् ' हे घोषवाक्य आठवते. ह्या परिपाठीने विचार केला असता पालीचा आवाज

आणि ' धम्मम् सरणम् ' हे घोषवाक्य यांत काहीही विसंगत राहत नाही. विचारांचे व भाषेचे असे स्पर्शरेषेतील उड्डाण (flight at a tangent) गृहीत धरूनच ह्या तऱ्हेचे काव्य वाचले पाहिजे. त्याच्याकडून तर्कसंगतीची अपेक्षा करण्यातच मुळी मुळात चूक आहे. भावसंगतीच्या दृष्टीने मात्र सादर काव्य कोठेही थिटे पडल्याचे दिसत नाही. पिकास्सोची चित्रे आणि एप्स्टाइन्चे शिल्प यांकडून आपण आकृतीसारख्या आकृती दिसाव्यात ही अपेक्षा कधी तरी करतो का ? अर्थात कवितेची भावसंगती कळली की आपोआप तिचा तर्कसंगत अर्थ लागतो, हा भाग वेगळा.

" धवल धुक्याच्या संथ वटांची
त्यालीं मलमल किती घरें हीं;
अहंपणाच्या उद्दामाची
व्यालीं दलदल किती मनें हीं !
लाज घराची गवंड्यास ना;
इमारतींचा ईश्वर वाली !
लाज मनाची ईश्वरास ना;
दलदल राखी फक्त मवाली !
धुक्यांत मलमल काळी व्याले
किती मवाली इमलेवाले."

या कवितेतील कल्पना भावक्रमाच्या अनुबंधात बांधलेल्या आहेत आणि म्हणूनच येथे वरवर असंबद्ध दिसणाऱ्या तुलनात एक भावानुबंधी सुसूत्रता प्रत्ययास येते. गवंड्याने घर तयार केले आहे, पण त्याबद्दल तो बेदरकार आहे; परमेश्वराने माणसास मन दिले आहे, पण त्यातील फक्त दलदलीचीच मवाली माणूस राखण करीत आहे—हे विचार विरळ धुक्यात झाकलेली घरे आणि त्या उंच घरांमुळे प्रत्ययास येणारा मानवाचा उद्दाम अहंभाव यांनी स्फुरविलेले आहेत. घराचा आणि मनाचा तर्कानुबंधी संबंध नसेल, पण भावानुबंधी संबंध आहेच आहे. मवाली इमलेवाल्यांच्या अनुषंगात कवीला यंत्रांचे मालक आठवले असावेत आणि कारखान्यांत तयार होणाऱ्या मालाचे प्रतीक म्हणून कवीने मलमलीचा उल्लेख केला असावा. विरळ धुक्याला मलमलीची उपमा अगोदर दिली होती,

यामुळेच ह्याही अनुबंधात कवीला मलमलीची आठवण झाली असावी. ही नवी मलमल मात्र काळी आहे. कदाचित हा रंग तिला मनातील अहंपणाच्या उद्दाम दलदलीमुळेही मिळाला असेल; कारण तिचीच राखण आजपर्यंत ह्या मवाली इमलेवाल्यांनी केली आहे. कदाचित कवीला 'काळी मलमल' ह्या शब्दांत मानवी मनात निर्माण होणारी पापेही अभिप्रेत असतील. मर्ढेकरांना वेळी-अवेळी पापाची आठवण होते, हे मागे सांगितलेच आहे. यंत्रावर आणि यंत्रयुगावर त्यांचा रोष आहे, हे जगजाहीर आहे. ह्याच यंत्रयुगाचे शास्ते जे मवाली इमलेवाले (गिरणीमालक) त्यांच्या विविध पातकांचा उल्लेख भोंगाकुत्रीला नमस्कार घालताना मर्ढेकरांनी इतरत्र केलेला आहे. म्हणून कोणताही अर्थ घेतला, तरी 'काळ्या मलमलीं'त पापाचा अर्थ अभिप्रेत आहे, हे निश्चित. या दोहोंतील कोणता अर्थ खरा, हे वाचकांवरच अवलंबून आहे. आपापल्या प्रकृतीप्रमाणे वाचकाने ह्या ओळीचा त्याला हवा असेल, तो अर्थ करावा. मर्ढेकरांची कविता लिओनार्दो दविन्चीच्या 'मोनालिसा'सारखी आहे.

'वन बांबूचे पिवळ्या गातें' आणि ह्या गंगेमधिं गगन वितळलें' ह्या दोन कवितांचें रसग्रहण प्रा. गंगाधर गाडगीळ आणि श्री. भा. कृ. देसाई ह्यांनी केलेलेच आहे. म्हणून त्यांचा भावानुबंध येथे दाखवीत बसावयाचे कारण नाही. बांबूच्या पिवळ्या वनासंबंधी मात्र एक गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. आकाशातील अधोरेखिते गाणारे वन (एरिअल्सचा समूह) पिवळ्या बांबूचे म्हणजेच निर्जीव आहे, आणि म्हणूनच ही आकाशातील अधोरेखिते विकृत स्वरूपात बाहेर पडतात. गारठल्याशिवाय गारा गळतात, हे रेडिओतील विकृत 'राधे क्रिश्न'चे एक कारण असेल, पण निर्जीव बांबू आकाशातील अधोरेखिते गोळा करायला लागले की त्यांच्या हाती विकृत 'राधे क्रिश्न'च येणार, हेही कवीला सूचित करावयाचे आहे. भावानुबंधाचे धागे एवढे लांब असतात. येथे टीकाकाराच्या कल्पनेची प्रत्यंचा फार ताणली गेली आहे, असे कोणाला वाटेल, पण त्याला इलाज नाही. नाही तरी सारेच काव्य कल्पनेचा खेळ असते. तिला असा तीन दित्यांशिवाय केशवसुतांची 'झपूर्झा' ही जेथे कळत नाही, तेथे मर्ढेकर कळले नाहीत, म्हणून फारसे वाईट वाटावयाचे कारण नाही.

गिरणीच्या तांबट पितळी सृष्टीचे वर्णन करीत असताना मर्ढेकरांना चकाकणारे अबुलख पिस्टन दिसतात. आणि त्यानंतर त्यांना साम्यामुळे सहजच हलक्य

संज्ञाहीन संभोगाची कसरत आठवते. हाही भावानुबंधाचाच एक प्रकार आहे. रात्री काळ्या वेंधाळ अंधारात इंजिन धपापत होते आणि पिवळ्या पहाटी भोंगा आरवायला लागला (भोंगा आणि आरवणे या शब्दांतील नवी समतानता उल्लेखनीय आहे.); म्हणजे पहाट आणि आरवणे ह्या दोन शब्दांच्या समन्वयाने भूपाळीचे स्वर कानांवर येतात आणि मग मर्ढेकरांच्या लेखणीतून ' घनःशाम सुंदरा श्रीधरा गिरणोदय झाला, उठि लवकरि दिनपाळी...' ही भूपाळी बाहेर पडते. गिरणीच्या चक्रप्रधान पार्श्वभूमीवर घनश्यामनंतर चक्रपाणी न आठवला, तरच नवल. तदनंतर वाहणारे कोंबट पाणी दृष्टीस पडले की चक्रपाणीच्या अनुषंगाने केशवाची आठवण होते आणि मग ' कुत्रापि पतितं तोयं ' आणि केशवप्रत जाणारे नमस्कार आठवतात. या संविद (कॉग्निशन्) मधून " कुत्रापि पतितं तोयं यथागच्छति सागरम्, सर्वचक्रभ्रमस्कारं मालकम् प्रतिगच्छति " या ओळी बाहेर पडतात. भूपाळीतल्या दिनपाळीतच संध्याकाळ सूचित करण्याचे सामर्थ्य आहे आणि शेवटच्या कडव्यात ती लालजर्द संध्याकाळ काळे पुच्छ पायांत लपवून, म्हणजेच आपल्या अनुचर अंधारासह, गर्द गलिच्छ वस्तीत भुंकावयास लागते. (' कुत्रापि 'तील ' कुत्रा ' आणि भुंकणे यांचा भावानुबंधी संबंध ध्वनिसाम्यातून निर्माण झाला असावा असे वाटते.) संध्याकाळ झाल्यानंतर ' शुभं करोति ' आठवणे क्रमप्राप्तच होय आणि मग नमस्कारच करावयाचे तर अर्थातच ते भोंगा-कुत्रीस करावयास हवेत; कारण हीच वया गिरणीत दिसून येणाऱ्या सर्व चक्रभ्रमस्कारांचे प्रतीक आहे. (भुंकणे आणि भोंगा कुत्री) आणि ते भ्रमस्कार मालकाप्रत जात असल्यामुळे दारिद्र्य, ऋण आणि संप होतात. शुद्ध बुद्धीचा विनाश झाल्याशिवाय ह्या सामाजिक आपत्ती निर्माणच होत नाहीत, म्हणून ' शुद्ध बुद्धिविनाशा 'चाही उल्लेख मर्ढेकरांनी केला आहे. असा हा भावानुबंधाचा मामला आहे. काही काही वेळा हे सर्व भावानुबंध कळत नाहीत आणि म्हणून मर्ढेकरांच्या कविता दुर्बोध वाटतात.

येथे कोणी असेही विचारण्याचा संभव आहे की, एवढे उपद्व्याप करून ही कविता वाचण्यापेक्षा त्या कागदांचा उपयोग चिवडा बांधण्यासाठी का करू नये ? हे बोलणे सोपे आहे; पण मर्ढेकरांची कविता अशी टाळू म्हणून टळत नाही. एक वेळ ती वाचली रे वाचली की ती कळो वा न कळो, ती वाचकाला आनंद तरी देते, नाही तर छळते तरी. तिला अनुल्लेखाने मारता येत नाही. यामुळेच

मर्ढेकरांवर उलट सुलट टीकांचा एवढा मारा झाला आहे. कोठले ५९ कवितांचे लिवलिवीत चोपडे आणि त्यावर एवढी वादळे का ? लिंग आणि रिंग, पिस्टन् आणि संभोग, ओल्या पिंपांत मरणारे उंदीर, सर्व गोष्टी जर पूर्णपणे टाकाऊ होत्या, तर मराठी साहित्यातील अतिरथी–महारथींनी त्यांच्या खंडनमंडनार्थ शस्त्रे का परजली ? मराठीत दरवर्षी एवढी भिकार पुस्तके पैदा होतात, त्यांपैकी हे एक, असे म्हणून टीकाकारांनी या पुस्तकाची उपेक्षा का केली नाही ? ह्या पुस्तकांवर ही रणे का ? ही वादळे का ? मर्ढेकरांच्या गळ्याला लागलेल्या नखावर एवढा मोठा पत्रव्यवहार का ? आणि या सर्वांवर कडी म्हणजे पारंपरिक परिपाठातले ख्यातनाम कविराट हल्ली आपल्या कवितांत मर्ढेकरी लचक आणण्याचा प्रयत्न तरी का करतात ? मर्ढेकरी काव्य हेय असेल, पण ते अनुल्लेखनीय नाही, हेच ह्या सर्व रणधुमाळीचे कारण होय.

ह्या काव्यातील काही भाग दुर्बोध आहे, हे खरे आहे. त्याचीच टीकाकारांनी विटंबना केली आहे. मर्ढेकरी अबोधाच्या ह्या विटंबनेची थोडीबहुत जबाबदारी खुद्द मर्ढेकरांवर आहे. त्यांची भाषा भाववाहक असली, तरी ओबडधोबड आहे. त्यांच्याच शब्दांत सांगावयाचे, म्हणजे त्यांच्या 'आशयास शब्दांची विजार तंग' होते. मग मध्येच ही 'तुमान' फाटून आशयाच्या 'मांसल ढुंगणा'च्या जागी असलेलें 'थोडें सफेत काही' वाचकास दिसले, तर आश्चर्य वाटावयाचे कारण नाही. मर्ढेकरी काव्याचे नाही ते अर्थ केले जातात, त्याचे कारण हेच होय. आपला आशय कदाचित अधिक स्पष्ट होईल, ह्या भीतीनेच जणू काय 'विज्ञानाच्या वैभवाला' उत्तम शीर्षक देण्याची इशीम बाळगणाऱ्या ह्या कवीने आपल्या कवितांना मथळे दिलेले नाहीत. मग काय ? ज्याच्या मनास जे येईल, तोच या कवितेचा मथळा. अनामिक नाही तरी सहस्रनामाचा मालक असतोच. ह्यामुळेही मर्ढेकरी कवितांच्या अर्थाची कुतरओढ होते. 'द ग्रीक्स दे रोमन्स शाल् कॉकर'—ह्या धाटणीची दृष्यर्थी वाक्ये ह्या गोंधळात भरच टाकतात. 'गहिंवर येई काळा' ह्या ओळीचे वस्त्रहरण तर भर न्यायालयात झालेले आहे. काव्यातील भाषेसंबंधी परंपरागत शिष्टसंमत कल्पनांचा विनयभंग करणारे कमरेखालचे शब्द मर्ढेकरांनी आपल्या कवितांत वापरले आहेत. असे हेच का, आणखी अगणित दोष मर्ढेकरांच्या माथी मारता येतील. पण ह्या दोषांमुळे त्यांच्या काव्याचे गुण मात्र लपत नाहीत. आणि ते लपत नाहीत म्हणूनच कुचेष्टा व स्तुती ह्या दोहोंचे भरपूर माप त्यांच्या पदरात पडलेले आहे.

मर्ढेकरांच्या काव्याचे काही गुण त्यांच्या वावदूक टीकाकारांनासुद्धा अमान्य करता येणार नाहीत. कसाही वाचक असो, मर्ढेकरांचे काव्य वाचल्यावरोबर ह्या गुणांची छाप त्याच्या अंतःकरणावर पडतेच पडते. आणि म्हणूनच शिव्या देत देत का होईना, वाचक मर्ढेकरांची कविता पुन्हा पुन्हा वाचतो. त्यांच्या काव्यांतील जो भाग कळतो, त्याच्या खुमारीमुळे न कळणाऱ्या भागाविषयी उत्सुकता वाढते आणि वाचक ह्या अबोधाच्या अर्थापाटीमागे लागतो. ज्याने 'फलाट-दादा', 'मुंबापुरी', 'मी एक मुंगी' ह्या कविता लिहिल्या त्यानेच 'पिंपांतले उंदीर' आणि 'पंक्चरली रात्र' ह्या कविता लिहिल्या आहेत, ह्याची जाणीव त्याला होते; आणि मग साहजिकच एक प्रश्न त्याच्यासमोर उभा राहतो : ज्याला पहिल्या साच्यातल्या भावरम्य सुंदर कविता लिहिता येतात, त्यानेच दुसऱ्या वाटाच्या वरवर वाष्कळ दिसणाऱ्या कविता का लिहाव्या? त्यात कवीचा हेतू काय? अर्थात ही सरळ मनाच्या वाचकाची प्रतिक्रिया आहे. मध्येच 'इरेस पडलो जर बच्चमजीं'त दिलेली धमकी तर मर्ढेकरांनी पुरी केलेली नाही ना, अशीही शंका त्याच्या मनाला चाटून जाते. पण ती क्षणभरच. आणि तो पुन्हा ह्या अबोध कवितांच्या मागे लागतो. मर्ढेकरांच्या अबोध भागाला जे सुबोध कोदण आहे, त्यात मर्ढेकरांचे सामर्थ्य सामावलेले आहे. वाचकाने सुबोधाचा गळ गिळला की मर्ढेकरांच्या हातून त्याची सुटका होत नाही.

राहता राहिले वावदूक वाचक. त्यांना सुबोध भाग तर चटका लावतो. दुर्बोध भाग कळत नाही. कळून घ्यावयाची इच्छा नसते, हे म्हणणे अन्यायाचे होईल; पण कळून घेण्याकरिता ते श्रम करावयास तयार नसतात. बरे, ह्या दुर्बोध कविता ठाण्याहून पळून आलेल्या माणसाने खरडलेला शब्दसमुच्चय आहे, असे स्वतः त्यांचे त्यांना वाटत नाही, किंवा वाटत असल्यास तसे म्हणावयाची त्यांना छाती नाही. कारण ते मत सर्वमान्य होण्याचा सुतराम संभव नाही. म्हणून ते मर्ढेकरांवर एकजात तुटून कडकडून हल्ला करतात. मर्ढेकरांवर झालेले हे वाङ्मयीन घणाघाती हल्ले त्यांच्या सामर्थ्याचेच द्योतक आहेत. ढेकूण मारण्यासाठी काही कुणी घणाचा उपयोग करीत नाही. मर्ढेकरी कवितेत एक प्रकारचे सामर्थ्य वा जोम आहेच आहे. हा जोम, हे सामर्थ्य ह्या कवितेत कोठून आले?

○ ○ ○

मर्ढेकर आपल्या काव्यसृष्टीत संपूर्णपणे प्रामाणिक आहेत, हे त्यांच्या कवितेतील सामर्थ्याचे प्रथम कारण होय. 'काही कवितां'त देवावर उपरोधास्त्राचा भडिमार करून त्याची पूजा बांधल्यानंतर स्वतःविषयीच्या फाजील अभिमानाला बळी न पडता आणखी काही कवितांत त्याच देवाचा आदरपूर्वक उल्लेख करावयाची त्यांना लाज वाटत नाही. स्त्रीत्वाचा सर्वोत्तम आविष्कार मातृत्व हा होय ('गर्भवती' वरील दोन कविता), हे आजकालच्या विचारसरणीने बाराव्या शतकाला शोभणारे मत ते ठासून मांडू शकतात. काव्याला काव्यानंदाखेरीज इतर प्रयोजन नसते, ह्या मताचा जन्मभर पाठपुरावा केल्यानंतर उपरतीच्या एखाद्या क्षणी 'भंगुं दे काठिन्य माझें' सारखी कविता ते लिहू शकतात. ह्या वेधडक प्रामाणिकपणामुळे त्यांच्या कवितेला एक दाहक आणि तरीही आल्हादक अशी धार आलेली आहे.

सर्वसाधारण कवी आपले मानसिक अनुभव व तज्जन्य भाव व्यक्त करीत असताना भावांना प्राधान्य देऊन त्यांच्याच व्यक्तीकरणाची खटपट करतात. मर्ढेकर भावनांना प्राधान्य देत नाहीत, असे नाही; तरी पण त्यांचा भर मानसिक अनुभव व्यक्त करण्याकडे ज्यास्त आहे. त्यांच्या कविसंविदला (Poetic Cognition ला) अनुभव जसा आला आणि ज्या आवेगाने आला, तो तसाच्या तसा वाचकांसाठी तज्जन्य भावांसह शब्दांत वाढून ठेवणे, हे मर्ढेकरांचे वैशिष्ट्य होय. अर्थात सर्वच ठिकाणी त्यांना ह्या प्रयत्नात यश येत नाही. पण चिकित्सक वाचकाला त्यांच्या ह्या शक्तीची प्रचीती तावडतोब येते. अनुभव जर काव्यात पूर्णपणे व्यक्त व्हावयाचा असेल, तर तो कसदार असला, तरच होईल. मर्ढेकरांचे पुष्कळसे अनुभव असे व्यक्त झालेले आहेत, म्हणूनच त्यांच्या अनुभवाचा कस फार वरच्या दर्जाचा आहे, हे कबूल करावे लागते.

त्यांत आडगिन्हाइकी माल अजीबात नाही. एवढेच नव्हे, तर लोकरंजनासाठी त्यांनी आपल्या अनुभवाचे चुकूनसुद्धा कोटेही उदात्तीकरण केलेले नाही! त्यांची कविसंविद् अतितीव्र असल्यामुळे जे अनुभव इतरांच्या भावविश्वात डोकावूनही पाहत नाहीत, त्यांची जाणीव त्यांना होते आणि ह्या अनुभवांचे चित्रण काव्यात झाले की ते इतके सत्य आणि वस्तुस्थितीस धरून असते की कधी कधी त्याच्या ह्या गुणामुळेच त्याला हिडीस रूप मिळते.

सर्वसाधारणपणे त्यांचे स्त्रीपुरुषसंबंधाचे विचारच घेऊ. आज समाजावर होणारे सिनेमा आदींचे संस्कार लक्षात घेतल्यानंतर मंगल मान्मथाच्या मनोमय कल्पना आणि दैनंदिन जीवनातील स्त्रीपुरुषसंबंध ह्यांतील तफावत तावडतोब लक्षात यावयास हवी. ही सगळ्यांच्याच लक्षात येत नाही आणि मग काव्यात स्त्रीचे किंवा तत्संबंधाचे चित्र काढावयाची पाळी आली की ठराविक साच्याची चित्रे तयार होतात. माधवराव पटवर्धनांनी रंगविलेले स्त्रीचे हेच मनोज्ञ चित्र पाहा :

पदें पाण्यांत सोडूनी बसे तन्वी तटाकीं,
पडे घाटावरी तीची जनानी पायचाकी
तनूला शुभ्रकाठी ही निळी साडी सुशोभे,
गिरीच्या जांभळ्या रंगीं न ही भंगप्रभा कीं !
उषा ही भावि आशांची अधिष्टात्री कुमारी,
न वस्तू खेळ विक्रीची कुणी दासी वराकी,
नव्या मन्वंतरींची ही उमा का शैलबाला ?
जिची थोरीव जाणाया हवा साक्षात् पिनाकी.

माधवरावांसारख्या कवीने काढलेले हे स्त्रीचे पारंपरिक पठडीतील चित्र होय. ' शिशिरागम ' कालात मर्ढेकरांनी स्त्रीचे हे कल्पनारम्य पटवर्धनी रूप पाहिले होते. आता त्यांना तिचे दुसरे रूपही दिसते :

—अशीच होती नकटी एक,
उलटे केस नि तिरप्या भिंवया,
मुरकत दावी उरोज उन्नत
ढेपा जैशा तेल्याघरच्या

हे ते दुसरे रूप होय. दुर्दैवाने स्त्रीपुरुषसंबंधाची ही मनोमय कल्पना आणि तत्संबद्ध वस्तुस्थिती ह्यांतील भेसूर तफावत मर्ढेकरांच्या प्रतिभाचक्षूला फार तीव्रतेने जाणवते आणि मग ते पिस्टनरिंगच्या अनुषंगाने फटकन मैथुनाची उपमा देऊन मोकळे होतात.

—निवरट किरटीं
हाडवंडलें अशा बायका
उष्टींभांडीं उरकुन वसल्या
विणीत चिमणें जीवन

अशा नायिकांवरोवर ' हाडांच्या महालांत राहणाऱ्या हरीच्या लालाचा ' शृंगार आणि तोही विसाव्या शतकातील लोलुप जीवनाच्या झगझगीत पार्श्वभूमीवर. ह्याला ' पिस्टनरिंग 'पलीकडे आणखी कोणती उपमा साजेल ? एका चिकित्सक सौंदर्यशोधकाने स्वतःच्या विवाहोत्तर स्त्रीसंबंधावद्दल बोलत असताना श्रीमत्शंकराचार्यांच्या एका प्रख्यात ओळीची एक नवी पण फक्कड आणि टारगट आवृत्ती तयार केली होती.

नारीस्तनभरनाभिनिवेशं मिथ्यामायामोहावेशम्
एतन्मांसवसादिविकारं मनसि विचारय वारंवारम्
कुरु स्विच् ऑफम् । कुरु स्विच् ऑफम् ॥

ही ती नवी आवृत्ती होय. तीत व्यक्त झालेली आर्ती मर्ढेकरांच्या कविसंविदने अनुभविलेली दिसते आणि म्हणूनच त्यांना—

चकाकणारे अभ्रलख पिस्टन
हिसके घेती मारित मिटक्या;
संज्ञेवांचुन संभोगाची
अशीच कसरत असते हलक्या.

ह्या ओळी सुचतात. पूर्णोपमेचा हा उत्कृष्ट नमुना नव्हे काय ? मिटक्या ह्या शब्दाने ध्वनित होणारा पिस्टनचा मूळ आवाज आणि व्यंजनेने त्यांतून व्यक्त होणारे विषयलोलुप मानवाचे मन ह्यावर विशेष भाष्याची गरज आहे, असे नाही. ह्याच मान्मथाच्या अनुषंगाने त्यांच्या ' पिचे अंधार पोकळ ' कवितेतील

सोडवीतां सोडवेना
गेल्या रात्रींचा हा पाश;
जागा आहें तरी आतां
मेल्या इच्छा सावकाश.

ह्या ओळी सर्वसामान्य अनुभवाच्या कसोटीवर घासून पाहण्यासारख्या आहेत.

आजच्या यंत्रयुगात सकाळपासून संध्याकाळपर्यंत संसाराच्या रामरगाड्यामध्ये मरमर मरणारा माणूस कधीच जागा होत नाही. जागे होणे आणि झोपणे ह्या निव्वळ शारीरिक क्रिया होत, हे व्यक्त करण्यासाठी मर्ढेकर

उजाडतां जें उजाड झालें
झोपीं गेलें मावळतां तें;

ह्या ओळी लिहितात. जगण्याचा कर्तरी प्रयोग आज मानवाच्या आवाक्यातला नाही, हे सूचित करण्यासाठी कवितेची सुरुवातच मुळी ते

देवाजीने करुणा केली,
भातें पिकुनी पिवळीं झालीं.

अशी करतात. ह्यातील देवाजीची करुणा आणि पिवळी ह्या शब्दांतील खवट उपरोध ह्याच ओळींची शेवटची आवृत्ती पाहिली की अधिकच जाणवतो.

करील जर कां करुणा देव
विचकुनि होतिल हिरवीं भातें !

ही ती शेवटची विचित्र आवृत्ती. देवाजीने जर खरोखर करुणा केली, तर ही नीरस भातें 'विचकुनी हिरवीं' म्हणजे चैतन्यमय होतील. विचाऱ्यांचा भित्रेपणा केविलवाणा आहे. देवाजीच्या करुणेनेही विचकण्याइतके त्यांचे मन अधू आहे. देवाजीने करुणा केल्यानंतरची स्थिती ही; मग आजच्या परिस्थितीबद्दल तर बोलावयासच नको. आज ती अर्थातच पिवळी, नीरस म्हणजेच जीवन्मृत आहेत, हेच सत्य आहे.

आदल्या रात्री एक दोन चषक (पेग्) जास्त झोकल्यामुळे दुसऱ्या दिवशी सकाळीही टिकून राहणाऱ्या नशामिश्रित सुस्तीचें (हँगोव्हरचे) वर्णन मर्ढेकरांनी 'पंचगव्यशर अखिल जगाचे' ह्या कवितेत केले आहे. अनुभवाच्या कसाच्या दृष्टीने तदनुभवी रसिकांनी ते स्वतःच वाचून पाहावे. पंचगव्य हे पश्चात्ताप व

प्रायश्चित्त ह्यांचे प्रतीक होय, हे ह्या अनुबंधात सांगून ठेवलेले बरें. अनुभवाचा हा उच्च कस हे मर्ढेकरांच्या कवितेच्या जोमाचे दुसरे कारण आहे.

काही काही कवितांत मर्ढेकरांच्या दोन अनुभवांचा संकर आढळतो. संकर हा शब्दही तितकासा चांगला नाही. एका अनुभवास दुसऱ्या एखाद्या अनुभवाचे अस्तर असते, असे म्हटले तरी चालेल. मानवाचे मन नेहमीच एका मार्गाने निमूटपणे जात नाही, हे लक्षात घेतले म्हणजे ह्या गोष्टीबद्दल आश्चर्य वाटणार नाही. पण ह्याच अस्तरांमुळे मर्ढेकरांची कविता पुष्कळ वेळा दुर्बोध वाटते. एकाच कवितेत दोन अनुभव आणि तेही एकसमयावच्छेदेकरून व्यक्त होऊ लागले की वाचक थोडा गोंधळतो. त्यांचे विश्लेषण करणे वाचकास सहजासहजी जमत नाही. असे विश्लेषण करून कविता वाचली की ती थेट हृदयास जाऊन भिडते. आणि ह्या दोन अनुभवांच्या परस्परसन्निकर्षाने तीत एका नव्या सौंदर्याची प्रचीती येते.

ही अनुभवाला अस्तर लावण्याची पद्धती मर्ढेकरांनी पाश्चात्य संगीतातून उचलली असावी. त्यात हार्मनीसाठी मुख्य मेलडीला (शास्त्रीय परिभाषेत तिला ' कान्तो '—Canto—म्हणतात) एका दुय्यम मेलडीचे अस्तर (काउंटरपॉइंट) लावण्याचा प्रकार असतो. त्याचीच काव्यक्षेत्रातील आवृत्ती म्हणजे ही अस्तर लावलेली दुहेरी कविता. ' झोंपलीं ग खुळीं बाळें, झोप अंगाईला आली '—ही अशा प्रकारची अस्तर लावलेली दुहेरी कविता होय. ह्या कवितेतील ' शब्द अर्थाआधीं यावा ', ' मनाआड्चीं मनें ', ' चाळणीतील चाळणी ' वगैरे भाग काव्यांतर्गत काउंटरपॉइंट्चाच प्रकार आहे. मूळ कल्पना (म्हणजेच ह्या कवितेचा ' कान्तो ') ' अंगाईला आलेली झोप ' आणि चैत्र व तत्संबंधी ओळी ह्यांत ग्रथित आहे. ह्या कवितेतील मूळ कल्पना आणि त्याला लावलेले अस्तर ह्यांचा परस्पर संबंध मात्र निव्वळ साहचर्याचा नाही. ह्या दोहोंत एक प्रकारचा व्यंजनागर्भ संवाद (एकता नव्हे) आहे. तसे नसते तर ही कविता दोन वेगवेगळ्या कवितांची वाकळ वाटली असती. तशी ती वाटत नाही. ह्यातच ह्या कवितेचे वैशिष्ट्य आहे. अशा अभिनव काव्यवाहक युक्त्यांमुळेही मर्ढेकरांचे काव्य वाचकांच्या मनाची पकड घेते.

काही वेळा निव्वळ शब्दचित्रावरोबर एक वेगळीच अशी कल्पना मर्ढेकर आपल्या कवितांत गुंफतात.

अजून येतो वास फुलांना,
अजून माती लाल चमकते;
खुरट्या बुंधावरी चढून
अजून बकरी पाला खाते;
अस्मानावर भगवा रंग
आणि नागवें समोर पोर;
अजून डुलक्या घेत मोजतें
ह्या दोहोंतिल अंतर ढोर

हे चित्र रंगवीत असताना मध्येच मर्ढेकरातील तत्त्वज्ञ जागा होतो आणि मग भूकंपाचे धक्के बसतात, युद्धनगारे व गिल्ला ऐकू येतो. फत्तरांतला देव, त्याची फत्ते, माणसाच्या मनातील चिरंतनाचे किस्से, 'मानवतेची सटीक टिपणी' आणि 'आभाळाच्या पल्याड स्पंदन' इत्यादींत अनुस्यूत असलेले तत्त्वज्ञान ते आपणांस सुनावतात. ही उबळ ओसरली की पुन्हा त्यांच्यातला चित्रकार जागा होतो आणि पुन्हा 'तरीहि येतो वास फुलांना' म्हणत ते कुंचली हातात घेतात. पहिल्या दोन कडव्यांतील 'अजून' आणि शेवटच्या दोन कडव्यांतील 'तरीहि' हे दोन शब्द ह्या कवितेतील शब्दचित्र आणि तत्त्वज्ञान ह्या दोघांना सांधणारे दुवे होत.

हा काव्यांतर्गत कल्पना–प्रतिन्यासाचा नमुना होय. मर्ढेकरांना प्रतिन्यास (ॲंटिथेसिस) फार आवडत असावा, असे वाटते. त्यांच्या भावनानिष्ठ समतानतेच्या (इमोशनल इक्विव्हॅलन्सच्या) आवडत्या सिद्धांताप्रमाणे साम्य व विरोध ह्यांना काव्यात फार महत्त्व येते आणि प्रतिन्यास हा विरोधाचे अव्यक्त प्रदर्शन करण्याचा ठरीव राजमार्ग असल्यामुळे त्याला त्यांच्या काव्यात सार्हजिकच वैशिष्ट्यपूर्ण स्थान प्राप्त होते. त्यांची 'मी एक मुंगी, हा एक मुंगी' ही कविता ह्या कल्पना प्रतिन्यासाचा एक उत्कृष्ट नमुना होय. मुंग्या आणि माणसे ह्या दोघांतील समतानता ह्या प्रतिन्यासातून फार प्रभावी तऱ्हेने व्यक्त झालेली आहे.

अशा अलंकारांच्या वाटेस न जाता साध्या निरलंकार भाषेतून उत्कट रसाभिव्यक्ती करण्यातही मर्ढेकरांचा हातखंडा आहे. 'फलाटदादा' हे अशा प्रकारच्या रसाभिव्यक्तीचे उदाहरण होय. ह्या कवितेत प्लॅटफॉर्मवरच झोपून रात्र

काढणाऱ्या माणसाचे चित्र सूचित झालेले आहे. 'पाठ टेकितों' ह्या शब्दांमुळे त्या चित्रातील कारुण्याला एक स्फोटक तकाकी आली आहे. शेवटच्या ओळीतील 'फलाटदादा' पुढील टिंबें 'अव्यक्तोऽयमचिंत्योऽयम्' अशा मूक शब्द-ब्रह्माच्या सुप्त शक्तीचा आविष्कार करतात. पृच्छकाला हळूहळू घेरणाऱ्या निद्रादेवीचे ह्यापेक्षा सुंदर वर्णन करता येणार नाही. 'चालला हा बंदिवान्' ह्या कवितेतील जीवारण्याचे चित्र ह्याच थाटात रेखाटलेले आहे. ह्या कवितेवर उपरोधाची विषण्ण छाया पडली आहे, हे मात्र खरे. किंबहुना, उपरोधातच ह्या कवितेचे खरे सामर्थ्य आहे.

वर शब्दचित्रांचा उल्लेख आलेलाच आहे. ह्या प्रांतातील मर्ढेकरांचे कौशल्य विलक्षण आहे. कवी मर्ढेकर चित्रकलेचे देणेदार आहेत, हे त्यांनी काढलेली शब्दचित्रे वाचून कोणीही कबूल करील. 'विशाल पट्टे सतेल तांबुस' हे असेच शब्दचित्र आहे. पवळीच्या घराचे वर्णनही त्यांच्या ह्या शब्दमय चित्रकलेतील कौशल्याची साक्ष देईल. 'न्हालेल्या जणुं गर्भवतीच्या' ह्या कवितेत रेखाटलेल्या मुंबापुरी शब्दचित्राचे सौंदर्य तर शब्दातीतच होय. ह्या शब्दचित्रात आपणांस मर्ढेकरांच्या भाषेवरील हुकुमतीचा एक आगळाच प्रत्यय येतो. 'सृष्टीचें निवांत पोट', 'भास्कराला जिवंततेचें अर्घ्य', 'कंबर मोडून तारा चाटीत खडखडणारी वांकडी ट्रॅम', 'टिगळ्या उत्साहाची चोळी', 'शिळीं स्तनाग्रे', 'विस्कटलेल्या कौलारांतुन खुपणारी सकाळ', 'खिडक्यांच्या फटींतून चावणारी दुपार' इत्यादी शब्दप्रयोग अर्थगर्भ आटोपशीरपणाचा पुरावा म्हणून पुढे करता येतील. 'नव्या मनूंतील गिरिधर पुतळ्या' चे वर्णन असेच चित्रदर्शी आहे. ही शब्दांवरील हुकुमत आणि त्यांचे शब्दचित्रातून प्रत्ययास येणारे सूक्ष्म निरीक्षण ह्या दोन्ही गोष्टी आपापल्या परीने मर्ढेकरांच्या लेखणीला सामर्थ्य देतात.

कधी कधी जुन्या घाटाची कविता लिहावयाची मर्ढेकरांना हुक्की येते आणि मग ते 'गर्भवती'वरील दोन कवितांसारख्या कविता लिहितात. 'उद्याच्या माउली'ची ही दोन्ही वर्णने जुन्या घाटाच्या कवितेत मोडतील; पण फक्त घाटाच्याच बाबतीत त्यांत प्रत्ययास येणारा शास्त्र–काव्य–संगम हा मर्ढेकरी लेखणीचा व्यवच्छेदक विशेष होय. 'भावनेला येऊं दे गा शास्त्र कांट्याची कसोटी' हे मागणे मुरारीशी मर्ढेकरांनी मागितले आहे. त्यांच्या 'गर्भवती'-

वरील कविता त्यांना मिळालेल्या ' तथास्तु ' ह्या वराची साक्ष पटवितात. निसर्गाची ओढ असूनही त्याची भीती वाटणाऱ्या विसाव्या शतकातील माणसाचे चित्रही असेच भावरम्य आहे. ह्या चित्रातील पारव्या पाऱ्याचा दिवा आणि चंद्र, ' तोतऱ्या नळाची धार ' आणि ' गांवाकडची नदी ' ह्यांतील विदारक विरोध आणि त्यांत अभिप्रेत असलेले दीन कारुण्य ही भाष्याशिवायही समजण्यासारखी आहेत. शेवटच्या दोन ओळींतील आर्तता त्यांतील ' मुखीं ऋचा ' ह्या शब्दांनी ध्वनित होणाऱ्या जुन्याच जीवनमूल्यांविषयीच्या प्रेमाने अधिकच दाहक होते. ह्या प्रकारची आर्तता आपण रोज अनुभवतो. पुष्कळांना ती जाणवत नाही, हा भाग वेगळा. येथे ओघात आले म्हणून ' तोतऱ्या नळाची धार ' ह्या शब्दांतील अर्थगांभीर्य आणि त्यांतून स्पष्ट दिसून येणारे नळाचे चित्र ह्यांचा उल्लेख केला पाहिजे. मर्ढेकरांना न्हाणीघरातील संगीत न आठवता ऋचा आठवाव्यात, हा त्यांच्यावरील जुन्या सनातन संस्कारांचा परिणाम आहे, हे पुनरुक्तीचा दोष पत्करूनही सांगणे जरूर आहे.

संपूर्णपणे जुन्या पठडीतच वसणारे ' रविकिरण मंडळा 'च्या चौकटीतील काव्य एके काळी मर्ढेकरांनी लिहिले होते. ' शिशिरागम ' हा त्यांच्या तशा प्रकारच्या काव्याचा संग्रह होय. त्याच प्रकारच्या पण नव्या मर्ढेकरी पठडीच्या काही भावरम्य कविता मर्ढेकरांनी लिहिल्या आहेत. ' दवांत आलिस भल्या पहांटीं ', ' भटकत फिरलों भगंग आणिक ', ' रहा तिथें तूं जिथें आपुल्या हृदयामधली कांच तडकली ', ' येशिल तेव्हां जपून ये तूं ' ह्या नवीन घाटाच्या प्रेम कविताच होत. प्रेमकविता हा शब्द जरा व्यापक अर्थाने येथे वापरला आहे. ' सुहास 'ला उद्देशून लिहिलेल्या ' शिशिरागमां 'तील कविता आणि ह्या कविता ह्यांची जात एक आहे, एवढ्यापुरते त्यांना प्रेमकविता म्हणावयाचे. त्यांतील विचार व ते मांडण्याची पद्धती ह्या गोष्टींमुळे त्यांच्यावर एक वेगळी छटा दिसते, एवढे मात्र खरे. ' शिशिरागमा 'नंतर मर्ढेकरांच्या व्यक्तित्वाला जो आकार मिळाला आहे, त्याची प्रतिबिंबे ह्या कवितांत दिसतात. कविता संपूर्णपणे कळावयास थोड्या अवघड आहेत. (मर्ढेकरांच्या सर्वच्या सर्व कविता मला कळलेल्या आहेत, असे छातीवर हात ठेवून कोणीही सुज्ञ मनुष्य म्हणेल, असे वाटत नाही.) तरीही जो भाग कळतो, त्यांतील भावमाधुर्याने वाचक भारावतो. न कळता चटका लावण्याचे मर्ढेकरी सामर्थ्य ह्या कवितांतही प्रत्ययास येते. ह्या अबोधांतील सामर्थ्याचा

प्रत्यय या कविता वाचूनही ज्यांना येत नाही, असे वाचक विरळा.

नवीन संकेत, नव्या उपमा, नवी प्रतीके, चपखल शब्दांचा 'प्रसरणशील' प्रयोग, अभिनव कल्पना, प्रभावी प्रतिन्यास इत्यादी वापरण्यात मर्ढेकर सिद्धहस्त आहेत. त्यांच्या एतत्संबद्ध कौशल्याचे वर्णन करता येणार नाही. आणि त्याचे विवरण करावयाची गरजही नाही. ह्या सर्व गुणसंपदेमुळेच मर्ढेकरी काव्यांतील दोषांचा विसर पडतो. इतकेच नव्हे, तर त्यांपैकी काहींचे कौतुकही होते. 'काश्मीरजस्य कटुतापि नितांतरम्या' हेच खरे.

येथवर मर्ढेकरी काव्याच्या बहिरंगाचे दर्शन घेतले. आता त्याच्या अंतरंगात थोडे डोकावून पाहू.

संस्कृत भाषेत कवी ह्या शब्दाचे दोन अर्थ आहेत. कु = शब्दे ह्या व्युत्पत्तीतून ध्वनित होणारा अर्थ सर्वांच्या परिचयाचा आहे. दुसरा अर्थ विद्वान हा होय. कवयः = क्रांतदर्शिनः, अतीतानागत-वर्तमानाभिज्ञाः, योगिनः, विद्वांसः, वेदान्तपारंगताः, असे ह्या शब्दाचे अर्थ संस्कृत टीकाकार मान्य करतात.

विद्वान्विपश्चिद्दोषज्ञः सन् सुधीः कोविदो बुधः
धीरो मनीषी ज्ञः प्राज्ञो विदग्धः पण्डितः कविः
धीमान् सूरिः कृती कृष्टिर्लब्धवर्णो विचक्षणः
दूरदर्शी दीर्घदर्शी श्रोत्रियः छान्दसौ समौ

हे ह्या शब्दाचे अमरकोषांत अमरसिंहाने दिलेले अर्थ होत. जगातील सर्व थोर कवी काही अंशी ह्या दोन्ही अर्थांनी कवी असतात. प्रत्येक कवीची स्वतःची अशी एक विचारसरणी असते. आपल्याकडे तिलाच तत्त्वज्ञान हे सबंग नाव दिले जाते. मर्ढेकरांचीही स्वतःची अशी एक विचारसरणी वा तत्त्वज्ञान आहे. ते काय आहे, हे पाहण्याचा आता प्रयत्न करू. कवीच्या विचारसरणीचा आढावा घ्यावयाचा, म्हणजे त्याचे स्वतःचे काव्याचे हेतू तपासून पाहण्याशिवाय गत्यंतर नाही. मर्ढेकरांच्या दृष्टीने काव्याचे हेतू कोणते आहेत ? त्यांची स्वतःची काव्यासंबंधी काय कल्पना आहे ? त्यांच्या दृष्टीने जीवनाचे साध्य कायं ?

सुदैवाने त्यांनी आपल्या ह्या संबंधाच्या स्वतःच्या कल्पना 'आणखी कांही कवितां'त स्पष्टपणे मांडल्या आहेत. ह्या संग्रहाचे मंगलाचरण ह्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहे.

भरून येईल हृदय जेधवां
शरीर पिळून निघेल घाम;
अन् शब्दांच्या तोंडांमध्यें
बसेल तुझा गच्च लगाम;
काळ्यावरती जरा पांढरें
ह्या पाप्याच्या हातुन व्हावें—
फक्त तेधवां: आणि एरव्ही
हेंच पांढऱ्यावरतीं काळें !

हे ते मंगलाचरण होय. ह्यात जीवनहेतूसंबंधी आपल्या कल्पना त्यांनी मांडल्या आहेत. 'काळ्यावरतीं जरा पांढरें' करणे, हे खरे ध्येय. ते पुरे व्हावयाचे म्हणजे हृदय आणि शरीर ह्या दोहोंकडून काही अपेक्षा असतात. हृदय संवेदनाक्षम असले पाहिजे. शरीर कष्ट घेण्यास तयार असावयास हवे. ही दोन्ही मानस व शारीर तपे झाली. पण साधना म्हटली की वाङ्मयतपाचीही आवश्यकता असते आणि 'काळ्यावरतीं जरा पांढरे' करावयाची उमेद बाळगणे, हाही साधनेचाच एक प्रकार आहे. म्हणूनच वाङ्मयतपाचाही उल्लेख एका निराळ्या प्रकाराने मर्ढेकर करतात. शब्दांच्या तोंडामध्ये बसणाऱ्या 'गच्च लगामां'त हाच अर्थ अभिप्रेत आहे, असे वाटते. लगाम ह्या शब्दाने निव्वळ संयमच ध्वनित होतो, असे नाही, तर शब्दांना दिशा देण्याचे सामर्थ्यही त्यांत ध्वनित होते, हे येथे आवर्जून सांगितले पाहिजे.

'काळ्यावरतीं पांढरे करणे' हे जीवितध्येय झाले. ते साध्य होईल, तेव्हा होवो. तोपर्यंत हे 'पांढऱ्यावरती काळे' करीत आहे, ह्या शब्दांत मर्ढेकरांनी 'आणखी काही कवितां'ची नांदी म्हटली आहे. पांढऱ्यावर काळे करणे ह्याला दुय्यम स्थान आहे, ह्याची जाणीव त्यांना आहे. ह्या दुय्यम गोष्टीसंबंधी आपले विचार त्यांनी 'भंगुं दे काठिन्य माझे' ह्या कवितेत मांडले आहेत. कवीची अज्ञात स्फूर्तिकेंद्रे कार्यप्रवृत्त करण्याचे सामर्थ्य ईश्वरी शक्तीत असते, ह्याची जाणीव मर्ढेकरांना आहे. आपल्या ज्ञात हेतूतील मालीन्य जावे, लोभ-द्वेष नाहींसे व्हावेत, 'मी'चे कार्पण्य जावे, सर्वांस प्रेमाने पोटी धरण्याची प्रवृत्ती व्हावी, भावना आणि शास्त्र ह्यांचा संगम काव्यांत व्हावा, इत्यादी त्यांच्या अपेक्षा आहेत. स्वतःच्या अक्षरांना परमेश्वरी फुफ्फुसाचा आकार असावा, स्वतःच्य

वाणीतून त्याच्या आवडीचे सूर बाहेर यावेत, हा त्यांचा आग्रह आहे. आपल्या शब्दांतून परमेश्वरी स्पंदन व्यक्त व्हावे, ही त्यांची इच्छा आहे. वर तपाचा उल्लेख केलाच आहे. त्याचाच उल्लेख एका वेगळ्या प्रकाराने मर्ढेकरांनी

खांब दे ईर्ष्येस माझ्या
बाळगूं तुझ्या तपाचे;

ह्या ओळीत केलेला दिसून येईल. परमेश्वरी स्मृतीचे सुकाणू मर्ढेकरांना हवे आहे. स्वातंत्र्य त्यांना हवे, पण ते फक्त उच्चारापुरतेच. भाषेला द्रौपदीचे सत्त्व मिळावे, ती कधीही उघडी पडू नये, अशीही प्रार्थना त्यांनी केली आहे. ह्या सर्व गोष्टी प्राप्त झाल्या, तरी काव्योत्पत्तीसाठी अनुभूती स्वतः कवीची असावी लागते. म्हणूनच 'तुझ्या लालसेची', 'अभागी लोकांची' आणि 'माझ्या डोळियांची' आण वाहून पापणी जागी ठेवण्याचे वचन ते देतात. शपथ आपण पवित्र, मंगल आणि प्रिय गोष्टींची घेत असतो. शपथ घेत असताना परमेश्वरापाठोपाठ मर्ढेकरांना 'अभागी लोकांची' आठवण होते, ही गोष्ट त्यांना लोकपराङ्मुख बनविणाऱ्यांनी लक्षात ठेवावयास हवी. पापणी जागी ठेवल्यानंतर जे जे दिसेल, ते ते पाहण्याचे सामर्थ्य सर्वांनाच नसते. सत्य इतके भयंकर असते की त्याचे दर्शन घेण्यासही धैर्य असावे लागते. अर्जुनासारख्या नराची नारायणाचे सत्य स्वरूप दिसल्यानंतर बोबडी वळली, ती ह्यामुळेच. सत्यशोधनांत सर्वज्ञोऽस्मित्रा ताठा असूनही चालत नाही. म्हणूनच धर्य आणि नम्रता ह्या दोन्ही गोष्टी आपणांस मिळाव्यात, अशी प्रार्थना त्यांनी केली आहे. सत्यशोधक बुद्धी समर्थ आणि निर्मल असावी लागते. म्हणूनच तप्त पोलादाची उपमा देऊन ते बुद्धीसाठी सामर्थ्याची याचना करतात. (तप्त शब्दांत ध्वनित होणाऱ्या अग्नीच्या पावकत्वात निर्मलत्व अभिप्रेत असावे.) इंद्रियगम्य आघातावरच काव्याची भिस्त असावी, हे मर्ढेकरांना पटत नसावे. म्हणून त्यांनी 'अतींद्रियार्थ आंचे'चा उल्लेख केलेला आहे. अशा साधनेतून निर्माण झालेल्या कवितेच्या आशयावर परमेश्वराचे स्वामित्व आहे. कवी फक्त शब्दवाहक असतो, ह्याचीही जाणीव त्यांना आहे. ही जाणीव झाल्यानंतर तुकोबाराय म्हणाले होते, 'काय म्यां पामरें बोलावीं उत्तरें। परि त्या विश्वंभरें बोलविलें ॥' मर्ढेकर म्हणतात :

आशयाचा तूंच स्वामी !
शब्दवाही मी भिकारी,
मागण्याला अंत नाहीं,
आणि देणारा मुरारी !

फक्त भाषा वेगळी आहे. अर्थ तोच, जुना तुकोबारायांचा आहे. एका वेगळ्या अर्थाने ' तींच गिरमिटें, नवीन वळसे ! ' हेच खरे. शेवटचे कडवे

काय मागावें परी म्यां
तूंहि कैसें काय द्यावें
तूंच देणारा जिथें अन्
तूंच घेणारा स्वभावें ! !

' हरिर्दाता हरिर्भोक्ता ' ह्या परंपरागत सनातन कल्पनेचा हा आधुनिक अनुवाद आहे, ह्यापलीकडे त्याबद्दल आणखी काही लिहावयाचे कारण नाही. ह्या कवितेत आणि ज्ञानेश्वरीच्या बाराव्या अध्यायातील गुरुनमनांतर्गत साहित्य-लक्षणात बरेच साम्य आहे. ह्या साम्याचा उल्लेख संस्कारांच्या अनुबंधात मागे केलेलाच आहे, अर्थात ज्ञानेश्वर आणि मर्ढेकर ह्यांच्यात सात शतकांचे अंतर आहे; त्यामुळे थोडा फार फरक ह्या दोघांच्या काव्यविषयक कल्पनांत आहे आणि ते साहजिकच आहे. (श्रीज्ञानेश्वर आणि मर्ढेकर ह्या दोघांच्या ह्या एकत्र उल्लेखात वरील साम्य सोडून दुसरे काहीही अभिप्रेत नाही.) ज्ञानेश्वर आणि मर्ढेकर ह्यांच्या ह्या काव्यप्रयोजनविषयक कल्पनांची तुलना काल, समाज, परिस्थिती आणि मर्ढेकरांचे व्यक्तित्व ह्यांच्या मर्यादा लक्षात ठेवून विचक्षण वाचकांनी स्वतःच करून पाहावी.

ह्याच संग्रहाच्या उपसंहारात पुन्हा एकदा परमेश्वरी सामर्थ्याचा उल्लेख अशाच संदर्भात आलेला आहे. त्याचे विवरण ह्यापूर्वीच केले असल्यामुळे, येथे त्याची पुनरुक्ती नको. ' काय गा म्यां पामरानें खरडावी बाराखडी ' ह्या ओळीतही तुकोबांचा प्रतिध्वनी ऐकू येतो.

वरील विवेचनात परमेश्वर हा शब्द वारंवार आला आहे. मर्ढेकरांचा परमेश्वरावर, निदान तशाच एखाद्या पारभौतिक शक्तीवर विश्वास आहे, हे ह्या कवितेवरूनच सिद्ध होत. त्यांच्या ' गा ' ह्या संबोधनात परमेश्वरास

मारलेली हाकच अभिप्रेत आहे. पुष्कळशा कवितांत मर्ढेकर 'तूं' ह्या द्वितीय-पुरुषी एकवचनी सर्वनामाचा उपयोग करतात. त्यांपैकी काही कवितांत हे संबोधन प्रेयसीला उद्देशून असेल; पण इतर काही कवितांत ह्या 'तूं' ला नक्कीच काही-तरी पारभौतिक अर्थ आहे. नाही तर—

माथीं घेतलें गा ऊन कटीं खांदीं काळेंवेरें
तुझ्या आवडीचा क्षण डोळ्यांतून मागें फिरे
... ...
तुझ्याच आलों डोळ्यांदेखत,
असाच पडलों येथें खितपत;
जन्माचें जें माझें घेणें,
वसूल होईल केव्हां, कितपत !

इत्यादी ओळींचा अर्थ लावता येणार नाही. ह्याच पारभौतिक शक्तीला वा कल्पनेला देव किंवा परमेश्वर म्हटले, तर अद्यतन आधुनिकांना मिरच्या झोंबावयाचे काहीच कारण नाही. अर्थात मर्ढेकरांच्या ह्या ईश्वरावरील निष्ठेलाही तडे गेलेले आहेत :

राव, सांगतां देव कुणाला,
शहाजोग जो शहामृगासम;
बोंबिल तळलों सुके उन्हांत,
आणि होतसे हड्डी नरम,
छान शेकतें जगणें येथें
जगणारांच्या हें अंगाला;
निदान ढेकर करपट आणूं—
द्या तुमच्या त्या शहामृगाला !

ह्या कवितेत ह्या ईश्वरावरील निष्ठेला गेलेले तडे स्पष्ट दिसतील. पण हे नास्तिक पाखंड मर्ढेकरांच्या मनोवृत्तीचे स्थायी रूप नाही. 'आणखी कांही कवितां'त त्यांच्या ईश्वरावरील निष्ठेचे निर्विवाद्य पुरावे भरपूर सापडतात. त्यांपैकी काहींचे उल्लेख वर आलेले आहेतच. 'राव सांगतां देव कुणाला' ह्या कवितेत त्यांनी पायरीला पाय लावला होता. त्या पापाची निष्कृती म्हणूनच की काय त्यांनी

देवाची मनोभावाने क्षमाही मागितलेली आहे.

हांसडल्या तुज शिव्या तरीहि
तुझ्याच पायीं आलों लोळत;
मुठींत धरून नाक, लाविले—
तव डोळ्यांशीं डोळे पोळत.

क्षमायाचनेचा हा मर्ढेकरी मसुदा होय. मर्ढेकरांच्या मनात काही मूलभूत प्रश्न उभे राहिले आहेत. पृथ्वी कधी जन्मली ? निळ्या वायूच्या सलग लगडी कधी जमल्या ? त्या जडतेला मनामनाचे पोत कधी आले ? सपोत संज्ञेमधून अनुभूतींचा वाफा कधी फुलला ? ह्या तेजातून काय पाहावे ? आणि कोणाला शोधावे ? हे ते प्रश्न होत. जवळ जवळ असेच प्रश्न ऋग्वेदकालात नासदीय-सूक्ताचा द्रष्टा प्रजापती ह्याच्या मनात उभे राहिले होते. त्याला ज्या वेळी त्यांची समाधानकारक उत्तरे सुचेनात, त्या वेळी त्याला " यो अस्याध्यक्षः परमे व्योमन्सो अङ्ग वेद यदि वा न वेद " म्हणत मुकाट बसावे लागले. त्याला निदान कोणताही अभिनिवेश तरी नव्हता. त्यानंतर काही सहस्रके लोटली आहेत. मानव आता जास्त शाहणा झाला आहे. त्यामुळे मर्ढेकरांची स्थिती अधिकच केविलवाणी झाली आहे. त्यांच्या वाग्वतीत तर—

दळभद्र्याच्या आग लागली
पायाखालीं इथे अचेतन !

ही स्थिती आहे. म्हणूनच त्यांना ' त्वमेव शरणं मम ' म्हणण्याशिवाय गत्यंतर नाही. मर्ढेकरांनी खुल्या दिलाने आपल्या नेहमीच्या विक्षिप्त पठडीस अनुसरून ही कबुली दिली आहे :

खंत कशाला जिरेल कां रग—
आकाशाची ? जगेन पोळत;
फक्त तुझी जर दगडी भिंवयी
चळेल थोडी डोळ्यांदेखत !

हा झाला मर्ढेकरांच्या देवावरील विश्वासाचा काव्यनिष्ठ पुरावा. खासगी पत्र-व्यवहारात पत्राच्या शिरोभागी मर्ढेकर ' श्रीरामसमर्थ ' लिहितात, असे कळते.

हे खरे असल्यास त्यांचा परमेश्वरावर विश्वास आहे, हे सिद्ध करण्यासाठी आणखी पुरावा देण्याची यातायात करावयाचे कारण नाही.

असा हा परमेश्वरावर निष्ठा असलेला एक कवी आहे. जीवन आणि काव्य ह्या दोहोंसंबंधी त्याचा दृष्टिकोण अतिगंभीर आहे. आणि तरीही तो वैफल्यवादी आहे अशी टीका त्याच्यावर केली जाते, ती का ?

मर्ढेकरांविषयीचे हे मत ' कांहीं कविता ' ह्या संग्रहातील कवितांवर आधारलेले आहे. त्या कविता वरवर वाचल्या, तर त्यांच्यासंबंधी असे मत व्हावे, त्यात आश्चर्य वाटण्याजोगे काहीही नाही. त्या पुस्तकाचे मुखपृष्ठच कवितांसंबंधी काही कल्पना वाचकांच्या मनासमोर उभे करते. त्यांतील कवितांचा औपरोधिक सूर या कल्पनांना पुष्टी देतो. आणि म्हणून त्या सर्वांतून ध्वनित होणारी वृत्ती सबझूटवादी असावी, असे वाटते. वास्तवात तिचे रूप काय आहे, हे कळून येण्यासाठी जरा खोलवर विचार करावा लागेल. ' कांहीं कविता ' आणि ' आणखी कांहीं कविता ' ह्या दोन्ही पुस्तकांचा सूर एक नाही असे वाटते. ' आणखी कांहीं कवितां 'त कवीच्या अंतरंगाचे एक वेगळेच दर्शन झाल्याचा आभास होतो. मर्ढेकरांतील कवी अतिशय प्रामाणिक आहे, हे विधान मागे केलेले आहे. असे जर आहे, तर ह्या दोन संग्रहांतील काव्यांत ही तफावत का ? एक तर मर्ढेकरांत आमूलाग्र बदल झाला असला पाहिजे; नाही तर कवी म्हणून ते ह्यापैकी एका संग्रहात अप्रामाणिक असावेत. ह्या दोहोंपैकी खरे काय आहे, हे पाहावयाचे आहे.

मर्ढेकरांनी उत्साहवर्धक, चैतन्यदायक, धैर्योत्पादक, स्फोटक कविता लिहिलेल्या नाहीत. त्यांच्या दोन्ही संग्रहांत उद्‌बोधने नाहीत, की क्रांतिगीते नाहीत. तेवढ्यावरच त्यांना वैफल्यवादी ठरविणे अन्यायाचे होईल. अशा कविता लिहिणे हा मर्ढेकरांच्या प्रकृतीचा धर्म नाही हे एक; आणि त्यांना आजच्या समाजाचे जे दर्शन झालेले आहे, त्यात ह्या उत्साह, धैर्य, धृती इत्यादींस वाहिलेल्या काव्याला स्थान नाही, हे दुसरे. मर्ढेकरांना फार खोलवर दिसते, ही त्यांची शोकांतिका आहे. ज्याच्या प्रज्ञेला वरचा पापुद्रा दूर करता येतो, ज्याची दृष्टी पारदर्शी असते, ज्याला समाजातील व्यक्तींची अंतर्मने वाचता येतात, असा मनुष्य उसन्या उत्साहाचे क्लच् दाबू शकत नाही. हे उसने क्लच् दाबणारे पुष्कळ कवी मराठीत आहेत. उत्साह, धैर्य, धृती इत्यादींच्या चाकांत चिता, पलिता,

मशाल, स्थंडिल आदी शब्दांचे वंगण घातले की त्यांच्या काव्याचा रथ चौखूर उधळतो. आपल्याकडे असे उत्साहोत्पादक प्रज्वलित काव्य पुष्कळ प्रसिद्ध होते. काही कवितांचा सूर तर 'ला मार्सेय्येज्'वर ताण करील, असा असतो. पण हा उत्साह आपल्या समाजात खरोखर आहे का ? की क्रांती, उत्साह, चैतन्य या शब्दांचा निव्वळ चोथा चघळण्यातच आम्हाला मौज वाटते ?

'कांही कविता' १९४७ साली प्रसिद्ध झाल्या. म्हणजेच ह्या संग्रहातील कविता त्यापूर्वी फार तर चार पाच वर्षांत लिहिल्या गेल्या असाव्यात. हा युद्धाच्या ऐन धामधुमीचा काळ होता. भारताच्या बोकांडी फाळणी लादण्यात आली, ती ह्याच काळात. संहारभैरवाचे अनिर्बंध तांडव ह्याच काळात हैदोस घालीत होते. मानवसमाजाची मूल्ये आमूलाग्र बदलत होती. सर्व मूल्यांचे मूल्यांतरीकरण होत होते. सर्व जगाला हा संहारक रुद्राचा फटकारा भोवला. 'मुडद्यांच्या राशी' पडल्या; 'यंत्रांतून आग' बाहेर पडू लागली; 'गोळ्यांचे पराग' चौफेर उधळले गेले; 'विमानांचे हल्ले' होऊन 'जिल्हे बेचिराख' झाले; 'रक्ताची थारोळी' साचली; 'अपंग आरोळ्या' उठल्या; 'संगीन रोखतां मन बेभानलें'; 'काया विटली'; 'पडत्या फळाची आज्ञा होताच वीर' हाती शिर घेऊन धावले; 'आमुचे मरण आम्हीच या डोळां' पाहिले; 'एरवी फुलांच्या परडीसारख्या हलुवार असलेल्या पृथ्वीची तिरडी बांधली गेली'; 'ओल्या खंदकांत नारायण' कधी नव्हताच, तिथे लष्करी हुकुमडर ऑफिसरची सत्ता चालावयाची,—'पायाची वहाण पायांत' टेवणे, हाच त्यांचा धर्म; ही झाली युद्धक्षेत्राची स्थिती. समाजात ह्याच परिस्थितीचे पडसाद उठावयाचे. त्यांतील मांगल्याचीही धूळधाणच ! आमचे मुत्सद्दी नेते 'मोलें धाडी जो मराया । नाहीं आंसू आणि माया' ह्या घाटाचे. ह्या नेत्यांचे मर्ढेकरी वर्णन वस्तुस्थितीइतकेच उद्वेगजनक आहे.

जो जो उठे तो तो नेता । मारी लंब्या चवड्या बाता ।
परि हुल्लडीचा नियंता । कोणी नाहीं ॥
शब्दशूर वाचिवीर । ऐसे पुढारी थोर थोर ।
जथीं प्रेतांचा बाजार । बोलबीला ॥
केला धर्माचा लिलांव । बुरखेवाली सत्ता-हांव ।
येथें तुम्हां आम्हां राव । मात्र मौत ॥

जे जे म्हणविती पुढारी । वेळ येतां देती तुरी ।
सुरा पाटींत, छर्रा उरीं । तुम्हां आम्हां ॥

हे आमच्या पुढाऱ्यांचे चित्र होय. नौखालीतील हत्याकांडाच्या वेळी आमच्यातील एकमेव नर; चुकीची निष्कृती म्हणून का होईना, त्या जिल्ह्याचा पायी प्रवास करून रंजलेल्या गांजलेल्यांचे सांत्वन करीत होता, आणि त्याच वेळी आमचे इतर नरवीर सात कोटापाटीमागे शिपायांच्या लष्करी पहाऱ्यात बसून काय करीत होते ? ' वृद्धास्ते न विचारणीयचरिताः ' असे समजून मुकाट्याने बसणे बरे. आणि बोलून तरी उपयोग काय ? आपलेच दात आणि आपलेच ओठ ! कोळसा उगाळावा तेवढा काळाच ! उपर्युक्त घाटाच्या ह्या महामान्य महाभागांच्या मर्ढेकरी वर्णनात एक अक्षर खोटे नाही. पाकिस्तान इज ॲन इम्पॉसिबिलिटी. इट इज ॲन आयडिऑलॉजिकल मिराज. ' ह्या महावाक्यात ' आजची जखम दावून उद्याचा पू ' काढणाऱ्या एका महावीराने पाकिस्तान निर्माण झाल्याबरोबर तेथून कसे यःपलायन केले, ही गोष्ट आता जरी इतिहासजमा झाली असली, तरी ' तत्राप्यभिज्ञो जनः ' पुढाऱ्यांची दानत ही ! जसे पुढारी, तसे त्यांचे अनुयायी. ते ' स्वजनरक्ताने प्रत्यही स्वातंत्र्याची वही लळथळा माखीत ' होते. पण बहुजनसमाजाची ही उन्मादातील अवस्था होती. उन्माद ओसरल्यानंतरचे त्याच समाजाचे चित्र ह्यापेक्षाही केविलवाणे आहे. हिंसाभ्रष्ट उन्मादातील आगलाव्या जिवंतपणापेक्षाही शुद्धीवर आल्यानंतरची माणसाची अकर्मण्य अगतिक वळवळ अधिक किळसवाणी असते. ' सकाळी उठोनी चहाकॉफी ' घेऊन वीज–गाडी गाटणारे कारकून, त्यांच्या हपिसातील तापाचा परिहार ' हुजूर म्हणून दाती तृण ' घेतल्यानेच व्हावयाचा. ' सूटबुटीं ' फिरणाऱ्या ' ज्वान ' अधिकाऱ्याला लष्करी ऑफिसरचेच वर्णन लागू. ' वणिग् सहजगत्या वाकडी दांडी ' मारणार; आणि हो, गल्लोगल्ली फळ्या निवडुंगाप्रमाणे उमाप माजलेले, ' हिंसाधर्मावद्दल वीट ' असणारे ' शुभ्र खादीवंद ' गजोदर बुद्धावतार, त्यांच्या बुद्धपूजेसाठी लागणारी फुलेदेखील ' युद्धसाहित्यकंत्राटातून ' मिळवलेल्या नफ्यातून विकत घेतलेली. आणि ती मुंग्यांप्रमाणे स्टेशनवर भाऊगर्दी करणारी अनामिक मनाच्या दानवांची भुतावळ. तिचा महिमा काय वर्णावा ! ' सर्वे जन्तु निराशयाः ' हेच या भुतावळीचे यथायोग्य वर्णन. हिची मने तरी स्वच्छ असावयाची, तर तेही नाही. जरा या

भुतावळीच्या मनाचे मनोज्ञ वर्णन तर पाहा :

ह्या नच मुंग्या—हीच माणसें,
मनें अनामिक जरि साऱ्यांची,
लक्तरलेल्या मिनिटांचा वर
सदैव बुरखा; लाज स्वतःची
जशि पाण्याची नजर फिरावी
अनोळखीच्या उरांवरूनी,
ह्या साऱ्यांची भेकड वृत्ती
वावरते तशि जगण्यामधुनी.
करपट दुःखी इंगित शिथिल,
नांव सोनुली, वाळा कथली;
भरल्या घरिही भ्रष्ट भावना
फुटकळ आशा मोजित बसली.

ह्या नायकांच्या नायिकाही त्यांच्याच सारख्या ! त्यांचेही जीवन 'चिमणे'च.

मध्येच एक महापुरुष आमच्यात आला आणि गेला. फार मोठ्या अपेक्षा होत्या आमच्या त्याच्याकडून. त्याला निर्वाणप्राप्ती झाली. आणि मग उठल्या सुटल्या त्याच्या प्रभावळीतील यतींनी भविष्ये आणि भाष्ये केली. त्या महान् आत्म्याच्या तेजाच्या दीप्तीत न्हाऊन निघण्याची भविष्यवेत्त्यांची ही केविलवाणी धडपड. तिच्यातूनच आमच्या काही वेड्या आशा फोफावल्या.

फुटेल (होती वेडी आशा)
आभाळाचा कर्मट सांधा
पडेल किंवा तडा भयंकर
वसुंधरेच्या अर्ध्या अंगा.

पण असे काही घडले नाही. 'दो मिनिटांची सडी शांतता शहारली अन् मिटली.' आज दिल्लीला राजघाटावर ह्या महान आत्म्याची छत्री भारतात आलेल्या परस्थ पाहुण्यांना समारंभपूर्वक दाखविण्याची एक प्रदर्शनीय चीज म्हणून उन्हात वाळत आहे, आणि पावसात भिजत आहे. या छत्रीच्या

गाभाऱ्यात वेळोवेळी गोळा होणारा निर्माल्य आणि ह्या परस्थांचे वृत्तपत्रांत प्रसिद्ध होणारे हस्तिदंती फोटो हीच आमची कमाई. 'मुंग्यांची रांग' पूर्वीच्याच थाटात 'दहादहाच्या लोकल' साठी तोबा करते. 'वणिग्' वाकडी दांडी मारतोच आहे. 'गणपत वाण्याच्या काड्याच्या पेटींत' अजूनही भरपूर काड्या शिल्लक आहेत. रूपलेखेच्या अंगणांतले स्वस्तिक अजून पुरे झालेले नाही. 'शुभ्र खादीबंद' शेट आता कसली कंत्राटे घेतात, ते जगजाहीर आहे. 'तलम पारदर्शी वसनीं' ज्या डेरपोऱ्यांनी ताणून दिली होती त्यांना अजूनही ढम्म नाही. आणि आंधळा, 'तो लक्तराभरणी चांचपडे!' ही आमची स्थिती आहे.

आमच्या आकांक्षा थिट्या, आशा किरट्या आणि जीवन खुजे आहे. राणा भीमदेवाचा आव आम्ही आणतो, पण तो तात्पुरता. कैफ उतरला की पुन्हा मरगळलेले पुच्छ पायांत घालून गल्लीतून पळ काढणाऱ्या, लूत लागलेल्या श्वानराजाप्रमाणे आमची मने आमच्याच उसन्या अवसानाला भिऊन पळ काढतात. आमच्या विद्यार्थ्यांचा उत्साह उत्सवापर्यंत, पुढाऱ्यांचा व्यासपीठापर्यंत आणि सर्वसाधारण लोकांचा संकट पुढे येऊन उभे राहीपर्यंतच टिकतो. ह्या उत्साहाला कार्यप्रवण करणाऱ्या शक्तीचा आमच्यात अभाव आहे. सत्तेचाळीस साली ह्या राष्ट्राच्या इतिहासात रक्तरंजित का होईना, पण अत्यानंदाचा दिवस उगवला. पण त्या दिवसावद्दल आमचा उत्साह किती दिवस टिकला? शेवटी राष्ट्राची अब्रू राखण्यासाठी गेल्या वर्षी सरकारला पुढाकार घेऊन हा उत्सव करणे भाग पडले. हे काय आमच्या उत्साहाचे द्योतक आहे, की चैतन्याचे चिन्ह आहे?

कारकून फाइल्सच्या भाऱ्याखाली वाकलेले, पुढारी व पेंढारी ह्यांत फरक नाही, मजुरांची हाडे दिसत आहेत, शेतकरी लाचार, जागे होणे आणि झोपी जाणे या क्रियांना फक्त शारीरिक अर्थ उरलेला, अशी केविलवाणी दैना आहे आणि जरा कुठे मोकळी जागा पाहून संध्याकाळच्या वेळी आण्याच्या गंडेऱ्या किंवा दीड आण्याची कुजकी भेळ खात बसलेली प्रेमी जीवांची ती युगुले! ती तर 'डिस्पेप्शिया' आणि 'मेलॅन्कॉलिया' ह्या दोघांच्या संकरासारखी मनोज्ञ दिसतात. ह्या जीवारण्याच्या जीवनावर काव्य करीत असताना व्यास-वाल्मीकींनाही उत्साह, धैर्य, धृती आटवण्याची वानवा. मर्ढेकर तर बोलूनचालून नवकवी! त्यांना उपर्युक्त भीमदेवी शब्देश्वरांच्या चोथ्यावर स्वैर करणाऱ्या ह्या जीवा-

रण्याच्या मनात पलायनवाद आणि त्याच्या जीवनात वैफल्य दिसले, तर आश्चर्य वाटावयाचे कारण नाही. वरवर दिसणाऱ्या उत्साहाने ते फसत नाहीत आणि मग आपल्या नेहमीच्या खाक्यात ' परिस्थितीचे पिऊन ॲसिड लिबलिबलीं हीं मनें हडकुळीं ' असे चित्र रंगवतात. ह्यात वैफल्य असलेच तर त्यात कवीचा वाटा फार थोडा आहे. क्षयी जरत्कारू पुढे बसवून कॅमेऱ्याचा बल्ब दाबावयाचा आणि मग भीमसेनाचा फोटो आला नाही म्हणून हळहळायचे, हा एक अगम्य आणि और प्रकार आहे.

मर्ढेकरांना आजच्या मानवाचे मन दिसते आणि म्हणूनच त्यांनी निष्ठाशून्य विषयलोलुप अहंकारी माणसाची विदारक चेष्टा केली आहे. कार्यप्रवण पण मर्यादित अहंकाराचा त्यांना तिटकारा असावा असे वाटत नाही. पण ह्या अहंकाराच्याही मर्यादा माणसाला कळल्या पाहिजेत, हे त्यांचे म्हणणे आहे. ' जमीन म्हणते मीच धांवते, पळणारा पण दुजाच कोण ' ह्या कवितेत हाच भाव व्यक्त झाला आहे. स्वतः त्यांच्या आत्मविश्वासाला तर फाजील अहंकाराचा दर्प येतो. ' कांहीं कवितां 'ची प्रस्तावना ह्या अहंकाराचा जिवंत पुरावा आहे. ' सुहास ' प्रकरणात जगाने जी चेष्टा केली, तिचे वर्णन त्यांनी केलेले आहे, ते असे :

तो विश्वनाटकगृहांतुन या दिगंत
हास्यध्वनि दुमदुमून भरे हवेंत;
अन् रंगभूमिवरला जगतांत खास
गेलों विदूषक पुरा टरुनी सुहास !

' शिशिरागमां 'तील चौदाव्या कवितेचे हे भरतवाक्य. आता पंधराव्या कवितेची ही नांदी पाहा.

गेलों विदूषक जरी टरुनी सुहास,
दान्ते नि शेक्सपियर संगत आसपास
कोठें तरी स्वमरणोत्तर भाग्यकालीं—
हाही विचार न कमी मज शांतिदायी.

ज्या माणसाचा अहम् इतका दांडगा आहे, त्याला वैफल्याने ग्रासिले आहे, असे कसे म्हणता येईल ? पण हा अदम्य आत्मविश्वास सर्वांना नसतो. बहुतांश लोकांची मने अधू आहेत. त्यांच्या झेपेचा पल्ला फार तोकडा असतो. निष्ठा

त्यांना पारखी असते. जीवन जगणे त्यांना जमत नाही आणि म्हणूनच ही अधू मने पळपळ पळाली तरी वंईपर्यंत. मर्ढेकरांच्या डोळ्यांतून हे निसटत नाही. आणि म्हणूनच अशा मनांबद्दल लिहीत असताना ते 'अधू मनाची दुडकी कुटवर, जमेल तर ही जिथवर भाषा' ह्या थाटात लिहितात.

ह्या अधू मनामुळेच मानव भित्रा झाला आहे. बरे, ही भीती तरी भव्य असावयाची, तर तेही नाही. थिट्या-खुरट्या जीवनातील भीतीदेखील थिटी व खुरटी. 'भव्य भीतीचे ओझरतेही दर्शन' ह्या जीवांना घडत नाही. 'भयाण-तेच्या बुरुजावरून येणारी अनामिक शीळ' त्यांना ऐकू येत नाही. हेच त्यांच्या सदा भित्रेपणाचे कारण होय. हा अधूपणा, हा भित्रेपणा मनातील पापांतून जन्माला येत असतो, असा मर्ढेकरांचा विश्वास असावा. म्हणूनच त्यांनी ह्या पापांचा वेळी अवेळी उच्चार केला आहे. हे पाप नष्ट करण्याचे सामर्थ्य परमेश्वराचे. त्यालां आम्ही 'सांदीला पण सोवळ्यांत' (—कीं सोवळ्यांत पण सांदीला ?) नेऊन ठेवले आहे. त्याला 'ओवळ्यात ढकलावयास' हवे, ह्याची जाणीव तरी आम्हांस आहे की नाही रांम जाणे. मग आमच्या 'फांदीने' मुळ्या तरी कशा धराव्यात ?

म्हणूनच मानवी राज्यात अनागोंदी कारभार चालू आहे. कोणी मारीत आहे तर कोणी मरत आहे. एकाच्या आयुष्याला वितळवून भलताच सोन्याचे घड ओतीत आहे. 'कुणि पेरावा घाम आणखी झोडावी कुणि अखंड पंगत' असा प्रकार आहे. रडणारे रडत आहेत. रडवणारे रडवीत आहेत. तेवढ्यातल्या तेवढ्यात आजची परिस्थिती पाहून भाकड कुडमुड्या जोशाच्या थाटात भवि-ष्याची लंबीचवडी वर्णने करणाऱ्या तथाकथित द्रष्ट्यांची लांडी लुडबूड चालू आहेच. त्यांतल्या त्यात काळ टपलीवर टपली मारतो आहे. शेवटी ह्या सर्व फापटपसाऱ्याचा फलादेश काय ?

अखेर घेतां टक्कर जरि मग
युगायुगांचें फुटेल भाल;
अशाश्वताच्या समशेरीवर
शाश्वताचिही तुटेल ढाल ।

जगाच्या कुंडलीवरून तर्कगत पद्धतीने वर्तविलेले भविष्य हे असे आहे. एकं-

दरीत आज ह्या जगात विकृती म्हणजेच कृती, हे समीकरण सर्वमान्य होऊन बसले आहे. मधूनमधून ह्या जीवारण्यातील 'हरीच्या लालांना' देवाची आठवण होते, पण तीही यथातथाच. कुंतीची मलूल का होईना, पण मोलाची भक्ती[1] त्यांच्या वाट्याला आलेली नाही. मग भक्तीच्या अभावी आत्मविश्वास कोठून येईल ? म्हणूनच निष्ठाशून्य, लिबलिबलेली ही हडकुळी मने रडताहेत :

> तुझ्यासाठीं देवा । काय म्यां झुरावें
> झुरळानें कैसें । पतंगावें ।

आजच्या समाजाचा चुरखा जरा वर करून पाहिला, तर हेच दृश्य दिसेल. हा निराशावाद असो वा आशावाद असो, हे वस्तुस्थितीचे चित्र आहे, एवढे मात्र खरे. ह्या चित्रातील सत्य मर्ढेकरांच्या कविसंविदने अनुभविलेले आहे. म्हणूनच त्यांच्या काव्यांत राणाभीमदेवी अवसान नाही. गणपत वाण्याच्या वर्णनात कसचे अवसान नि कसचे काय ? येथे विंब-प्रतिविंबी न्यायाचा अंमल चालू आहे. ह्या संदर्भात साफल्य-वैफल्याचा प्रश्न उद्भवतच नाही.

अशा ह्या मांगल्यहीन जीवनाचे चित्र मर्ढेकरी काव्यांत आढळते. ही मांगल्यहीन बाजूच मर्ढेकरांनी आपल्या काव्याचा विषय म्हणून का निवडली ? त्यांना जीवनात काही मंगल दिसतच नाही का ? ज्या अर्थी मांगल्याचे वर्णन त्यांनी आपल्या काव्यांत केलेले नाही, त्या अर्थी त्यांना मंगलाबद्दल आस्थाच नाही, असेही आरोप त्यांच्यावर केले जातात. हे प्रश्न एक वेळ सुरू झाले, म्हणजे त्यांना अंत उरत नाही. असले दीर्घशंकी प्रश्न उभे करून कोणत्याही कवीचे वाभाडे काढता येतील. कुसुमाग्रजांनी माधवराव पटवर्धनांसारखे प्रणयरम्य भावमंथर गजल का लिहिले नाहीत ? शीळ घालणाऱ्या ना. घ. देशपांड्यांनी तुतारी का फुंकली नाही ? तुकोबारायांनी लावण्या का लिहिल्या नाहीत ? मग ही गाडी कोठेच थांबावयाची नाही.

जीवनदर्शनाचे अनेक प्रकार आहेत. जीवनातील मंगलाचे प्रदर्शन हा त्यांपैकी एक. त्यातील ओंगळ भागाचे चित्रण हा दुसरा. ज्याला जो मार्ग साधेल, त्यावर तो पावले टाकील. फार तर मर्ढेकरांनी किंचित मंगल, किंचित

---

१. देवाची आठवण कधीही विसरू नये, म्हणून कुंतीने 'विपदः सन्तु नः शश्वत्' असा वर मागितला होता, ही गोष्ट प्रख्यात आहे.

ओंगळ भागाकडेच लक्ष दिले आहे म्हणून त्यांची 'येरां चिखलुचि' म्हणून ज्ञानेश्वरी शब्दांत बोळवण करता येईल. करावयाची इच्छा असेल, त्यांनी ती अवश्य करावी.

ह्या अमंगलाचे वर्णन त्यांनी केले आहे, म्हणून त्यांना मंगल दिसतच नाही, हा आरोप मात्र निराधार आहे. जो 'पवित्राणां पवित्रं वा मंगलानां च मंगलम्' अशा महन्मंगल परमेश्वराला ह्या जडवादी विसाव्या शतकात 'पायांखालीं आग अचेतन' लागली असताही विसरत नाही, त्याला जीवनातील मांगल्य दिसत नाही, हे म्हणणे सयुक्तिक वाटत नाही. तर्कशास्त्रालाही काही नियम आहेतच की. तर्कटच रचावयाचे असल्यास मात्र बोलणे खुंटले. युद्ध आणि फाळणी ह्या दोन मरीआयांच्या फेऱ्यामुळे झालेल्या मांगल्याच्या विधळवाटीमुळे मर्ढेकरांना संताप आलेला आहे. यंत्रयुग बोकाळले आहे. माणसाला वित्त व वनिता आणि क्वचित वारुणी ह्यापलीकडे काही दिसतच नाही. सत्ता वित्तानुषंगी, धर्माच्या नावाने खून, जाळपोळ, भ्रष्टाचार, स्वातंत्र्याच्या सोंगाखाली दरोडे, लुटालूट असे ह्या जीवनाचे चित्र मर्ढेकरांना दिसले. ह्यात कोणत्याही मांगल्याला स्थान नाही. कोणतीही नीतिमूल्ये टिकाव धरून नाहीत. माणसाला जनाचे बंधन नव्हतेच; मनाचेही उरलेले नाही. अशा काळात निष्ठावान मनेदेखील विचलित होतात. श्रद्धा कोलमडते, निष्ठा चळते. पण हे सर्व होत असताना माणसाची जी तडफड होते तीतून त्यांच्या मूळ निष्ठांचे दर्शन होते. मर्ढेकरी काव्य म्हणजे सद्यःकालीन यंत्रनिष्ठ मानवाच्या निष्ठाहीन ओंगळपणामुळे झालेला कवीचा वाङ्मयीन तडफडाट होय. विकारी परिस्थितीमुळे संतप्त झालेल्या मर्ढेकरांचे हे चित्र आहे. त्यातूनच आपल्याला त्यांच्या स्थायी निष्ठांचा मागोवा घ्यावा लागेल.

मर्ढेकरांच्या तडफडाटाने उपरोधाचा आश्रय घेतलेला दिसेल. हा उपरोध कशातून जन्माला आला आहे, ह्या गोष्टीचा शोध केल्याशिवाय मर्ढेकरांची निष्ठास्थाने कळणे कठीण आहे. म्हणूनच उपरोधाचे मानसशास्त्र काय असते, हे पाहिले पाहिजे. माणूस सुखासुखी उपरोधाचे शस्त्र वापरीत नाही. वापरू शकत नाही. जो कारण नसता उपरोधाचे ब्रह्मास्त्र चालवतो, त्या माणसाच्या मनात नक्कीच काही तरी विकृती असते. इंग्रजी वाङ्मयात स्विफ्टचे असे उदाहरण आहे. ही जातच चावणारी. दातांची शिवशिव गेली, म्हणजे झाले. कोणाला

आणि केव्हा चावावयाचे, ह्याला विधीही आणि निषेधही नाही. स्विफ्टला शेवटी वेड लागले. हा झाला निष्प्रयोजन उपरोध.

दुसऱ्या प्रकारचा उपरोध म्हणजे सप्रयोजन उपरोध. निष्ठाहीन माणसाला हे शस्त्र पेलवत नाही. एखाद्या गोष्टीची विदारक चेष्टा करावयाची असल्यास तद्विरोधी गोष्टींवर आत्यंतिक प्रेम असावे लागते. ह्या अर्थानेच कुचेष्टेच्या गर्भात जयजयकार असतोच असतो. असत्याच्या रेवडीत सत्याचे प्रेम, अधर्माच्या कुचेष्टेत धर्माविर श्रद्धा, दुर्गुणांच्या द्वेषात सद्गुणांविषयी प्रीती अनुस्यूत असते, ती ह्याच अर्थाने. उपरोधामुळे मनुष्य सवझूटवादी ठरत नाही; तर उपरोध हा त्याला अभिप्रेत असलेल्या निष्ठांचा जिवंत पुरावा असतो. ह्या उपरोधांतूनच त्यांत अध्याहृत असलेल्या निष्ठांचा शोध लवकर करता येतो. मर्ढेकरांच्या उपरोधाकडे ह्या शोधक दृष्टीने पाहिले असता काय दिसते ?

हे पाहावयाच्या अगोदर मर्ढेकरांच्या व्यक्तित्वाची थोडी छाननी केलेली बरी. त्यांच्या व्यक्तित्वाला वेगवेगळे पैलू आहेत. त्यांत तत्त्वज्ञ, कवी आणि माकड ह्यांचा एक मनोज्ञ संगम आढळतो. वाचकाला त्या तिघांचे विश्लेषण करता येत नाही, आणि म्हणूनच त्यांच्याविषयी पुष्कळसे गैरसमज पसरले आहेत.

○ ○ ○

ह्या तीन प्रवृत्ती वेगवेगळ्या मात्र नाहीत. ह्या तिन्ही प्रवृत्तींचेही एक सुंदर रसायन तयार झाले. मानसशास्त्रात गेस्टाल्ट म्हणून कोएल्हेरने मांडलेली एक उपपत्ती आहे. तीप्रमाणे कोणत्याही एका प्राप्त परिस्थितीत तिचा साकल्याने विचार करून माणसाच्या सर्व शक्ती तिच्याशी झुंज घेतात. मर्ढेकरांच्या ह्या तिन्ही पैलूंचेही तसेच आहे. त्यांचा एक गेस्टाल्ट तयार झाला आहे, असे म्हटले तरीही चालेल. त्यांच्या कवितांत ह्या तिन्ही पैलूंचे एकसमयावच्छेदे करून दर्शन होते. मध्येच कवींतले माकड उडी मारते. मध्येच माकडातला तत्त्वज्ञ जागा होतो. किंबहुना मर्ढेकरी माकडाचा तोंडवळा तत्त्वज्ञाचाच आहे. कवी आणि तत्त्वज्ञ ह्या दोघांचा संबंध तर अभिन्न साहचर्याचा आहेच.

मर्ढेकरांतील माकडाने मिस्किलपणाचे रूप घेतले आहे. जुन्या संस्कृत-प्राकृत वाङ्मयातील ओळींची मोडतोड ह्या मिस्किलपणाच्या पोटीच जन्माला आली आहे. गंभीर विषयवर्णनात मध्येच चपखल पण विक्षिप्त शब्दांचा प्रयोग, हाही ह्या मिस्किलपणाचाच प्रकार होय. कदाचित 'कॉमिक रिलीफ' (नाट्यशास्त्रातील) म्हणूनसुद्धा ह्या क्लृप्तीचा उपयोग मर्ढेकरांनी केला असावा. पण त्यांचा हा विनोदही भयंकर आहे. 'सर्वे जन्तु रुटिनाः' ह्या ओळीमुळे आठवणारा मूळ श्लोक, 'शुभं करोति'चे ते भयंकर विकृत रूप, पवळीची लावणी, ह्या मर्ढेकरांतील मर्कटाच्या चेष्टितांनी जो विनोद निर्माण होतो, त्यामुळे सर्व चित्र अधिकच भेसूर होते. वीज चकाकून गेल्यानंतर काळोख अधिकच गडद होतो, तसेच काहीसे येथेही घडते. मर्ढेकरांच्या विनोदाला असले वेदनेचे अस्तर आहे. मर्ढेकरी मिस्किलपणाचा हा व्यवच्छेदक विशेष होय.

('इरेस पडलों जर बच्चमूजी' ही कविता मात्र शुद्ध मिस्किलपणाचा नमुना होय;) पण हा नमुनाही आपल्या परीने भयंकरच आहे. एकाच फटकाऱ्यात

कित्येक पुरोगामी कवीश्वरांना जायबंद करणारे त्यातील वाक्पाटव अचाट आहे. मर्ढेकरांचा हा तडाखा पाहिल्यानंतर त्यांच्यावर झालेल्या वाङ्मयीन हल्ल्यांबद्दल फारसे वाईट वाटावयाचे कारण नाही. द्यावे तसे घ्यावे, हा न्याय वाङ्मयालाही लागू आहेच की !

मर्ढेकरांच्या व्यक्तित्वाचे हे तिन्ही पैलू लक्षात ठेवून आपण त्यांच्या उपरोधाची चिकित्सा करू. जरा हे युद्धकालीन लष्करी हुकुमशरचे चित्र पाहा :

कोरडी ठेवावी । दारू सर्व काळ
ओठावर माळ । हुकुमांची ॥
पायाची वहाण । पायांत ठेवावी
चित्तीं असूं द्यावी । मद्यभ्रांती ॥
अज्ञानी जनांस । ज्ञान पाजूं नये
मरूनि उरावें । धडरूपें ॥

हा मर्ढेकरांच्या मते वंदनीय वीरपुरुष का आहे ? हे मर्ढेकरातील माकडाने लष्करी अधिकाऱ्याचे काढलेले व्यंगचित्र होय. ह्या व्यंगचित्रातून त्यांना जो आदर्श अभिप्रेत आहे त्याचे दर्शन होते. त्या आदर्शाला सवझूटवादाचा वासदेखील येत नाही. हा अभिप्रेत आदर्श मर्ढेकरातील तत्त्वज्ञाची देणगी आहे. ह्या तत्त्वज्ञानेच कविसुलभ व्यंजनेची आश्रय घेऊन लष्करी अधिकाऱ्यांची ही शोभा केली आहे. ह्या कवितेतील मर्कटचेष्टितांनी हसू मात्र येत नाही. ह्या अर्थानेच तत्त्वज्ञास अभिप्रेत असलेली विदारणा आणि ही मर्कटचेष्टा परस्परास पूरक आहेत.

'जे न जन्मले वा मेले' ह्या अभंगात गावगन्ना उमाप माजलेल्या नेत्यांच्या पाठीवर ओढलेल्या आसुडांचे फटकारे ऐकू येतात. 'जे का रंजले गांजले' ह्या तुकारामी साच्यात ओतलेल्या पुतळ्याचे हे मर्ढेकरी पार्श्वदर्शन होय. ह्या दर्शनावरही व्यंगचित्राची छटा आहेच आहे. हा व्यंगचित्रात्मक भाग माकडाने निर्माण केलेला आहे, हे सांगावयास नकोच. ह्या कवितेतून ध्वनित होणारा आदर्श मात्र वैफल्यवादी नाही. ह्या टिकाणी 'जे आहे' त्याच्या वर्णनातून 'जे असावयास पाहिजे' त्याचे दर्शन होते. आणि हे व्यंजनाजात दर्शन मंगलच आहे. जातीय दंग्याच्या पार्श्वभूमीवर चितारलेली 'कां हो माजवितां दुही' ही

कविता. तीतील उद्वेग आणि संताप आणि निष्टाहीन सवझूटवाद ह्यांचा परस्पर-संबंध शोधून काढण्यासाठी संशोधनच करावे लागेल.

कुठें गया कुठें मक्का । हत्याकांड येथें फुका
भुके कंगालिस्तान कां । झिंदाबाद ! ॥

ह्या ओळींतील मर्ढेकरांतील माकडाने दिलेली घोषणा आणि वैफल्यवाद ह्यांचा संबंध काय ? राग आणि प्रेम ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. मर्ढेकरांना आलेल्या रागातून जर त्यांच्या प्रेमस्थानांचा वा निष्टास्थानाचा शोध घेतला, तर तो मांगल्यहीन ठरत नाही. ज्याचे मंगल गोष्टींवर प्रेम असते, तो वैफल्यवादी असूच शकत नाही. आणि जेथे सर्वच विफल आहे, तेथे राग आणि उपरोध ह्यांचे कारणच उरत नाही. जर मंगलही झूट आणि ओंगळही झूट, हेच खरे आहे, तर कुणी कुणावर आणि कशासाठी चरफडायचे ? मायेशिवाय रड नाही न् जाळाशिवाय कढ नाही, अशी एक गावटी म्हण आहे. तीत अनुस्यूत असलेले मानसशास्त्रीय सत्य जोपर्यंत झूट ठरत नाही, निदान तोपर्यंत तरी मर्ढेकरांना सवझूटवादी म्हणता येणार नाही.

ह्या यंत्रयुगात सारीच घाई, आणि ह्या घाईच्याच पोटी जन्माला आलेले माणसाचे साचेबद्ध यंत्रनियंत्रित जीवन. त्यावरही मर्ढेकरांचा रोष आहे. 'सकाळीं उठोनी । चहा कॉफी घ्यावी ' ही कविता ह्याच रोषातून उगम पावली आहे. तिच्या शेवटच्या ओळीतील दाहक उपरोध ह्याच रोषाचा वाङ्मयीन आविष्कार आहे.

कुणाच्या पायाचा । कांहीं असो गुण ।
आपुली आपण । बिडी प्यावी ॥
जेथें निघे धूर । तेथें आहे अग्नि
आम्ही जमदग्नी । प्रेतरूपी ॥

हे मर्ढेकरांच्या आदर्श पुरुषोत्तमाचे चित्र आहे, असे तर कोणास म्हणावयाचे नाही ? कवितासृष्टीतील हे व्यंगचित्र आहे. व्यंगचित्रात आपण एखाद्या अवयवाचा आकार वाढवून चित्रित व्यक्तीच्या स्वभावातील दोषविशेषांचे प्रदर्शन करतो. ह्या प्रदर्शनात त्या दोषविशेषांविषयी नापसंती आपण व्यक्त करतो. ह्याचा अर्थ चित्रित व्यक्तीतील इतर गुण आपल्याला माहीत नसतात किंवा आपण

त्यांना किंमत देत नाही, असे नाही. मग ह्या शब्दाकार व्यंगचित्रेामुळे त्यातील अनुल्लेखित गुणांवर कवीचा विश्वास नाही, हे म्हणण्याचा आपल्याला काय अधिकार आहे ? ह्या व्यंगचित्रांत मर्ढेकरांना आलेल्या रागाची प्रचीती आपल्याला येते. जेथे एवढा राग आहे, तेथे प्रेम नाही, असे कसे म्हणता येईल ?

आपल्या निर्जीव जीवनातील किरट्या महत्त्वाकांक्षा आणि मानवाचे तदनुषंगिक खुजे प्रयत्न, ह्यांची धिंड मर्ढेकरांनी 'गणपत वाणी' ह्या कवितेत काढली आहे. ही गणपत वाण्याची विटंबना नाही, तर त्याच्या थिट्या आणि तरीही अपूर्त आकांक्षांची विटंबना आहे. त्याच्या सौंदर्यहीन जीवनाची विटंबना आहे. स्वतःच्या स्वप्नावर बिडीचा वा मिणमिण जळणाऱ्या पणतीचा धूर सांडीत हा वीर तुकयाची गाथा वाचीत विटकररंगी सतरंजीवर उशास पोते घेऊन झोपावयाचा. श्रीतुकयाची गाथा आणि त्याची 'ह्या जागेवर बांधिन माडी' ही थिटी आकांक्षा ह्यांतील विरोधात मर्ढेकरांना काहीच का अभिप्रेत नाही ? आणि जे अभिप्रेत आहे, त्यातील वैफल्य मर्ढेकरांना तत्त्वतः आवडते, किंबहुना ते त्यांचे जीवनाचे तत्त्वज्ञान आहे, असा आरोप करण्यासाठी ह्या कवितेत काय पुरावा आहे ? ह्या कवितेतील माकडाचा भाग वेगळा काढून दाखविता येणार नाही.

आज मानव मुंगीचे जीवन जगत आहे. त्या जीवनाचे वर्णनही मर्ढेकरांनी केलेले आहे. त्याच्या भेकड वृत्तीची, भ्रष्ट भावनांची, कुजक्या शंकाव्याप्त मनाची उत्साहहीनतेची त्यांनी सोलून सालडी काढली आहेत आणि शेवटी एक निष्कर्ष काढला आहे :

अशा येथल्या संसारांत
जगण्याचाही चुकला पाढा;
आणि शेवटीं परिस्थितीचा
गळ्याखालतीं उतरे काढा.

हा ह्या परिस्थितीचा मर्ढेकरप्रणीत निष्कर्ष होय. मर्कटशास्त्रीही मुंगीजगाच्या ह्या केविलवाण्या जीवनावर खूप दिसतात. त्यांनीं जेहेत्ते ह्या मुंगीजगाला आपल्या प्रकृतिधर्माला अनुसरून आशीर्वाद देऊन ठेवला आहे :

—सर्वे जन्तु रुटिनाः । सर्वे जन्तु निराशायाः
सर्वे छिद्राणि पंचन्तु । मा कश्चित् दुःख लॉग् भरेत् !

मर्ढेकरांतील कवीला मुंगीजगावद्दल जे सांगण्याकरिता सव्वाचार पाने लेखणी घासावी लागली आहे, ते सर्व मर्कटाने दोन ओळींत सांगून टाकले आहे; म्हणूनच मर्ढेकरांतील माकडावद्दल आदर वाटतो. असो. 'मी एक मुंगी' ह्या कवितेत वर्णन केलेली परिस्थिती मर्ढेकरांना आज जगात आढळते. ती तशीच राहणार आहे म्हणून मानवाने काहीही करू नये, असे कोठे चुकून तरी एखाद्या ओळीत सूचित झाले आहे काय ? मग मर्ढेकरांना वैफल्यवादी म्हणून हिणविण्यात काय अर्थ आहे ?

आज मानव अर्धपोटी राहत आहे ह्याची जाणीव मर्ढेकरांना आहे. 'लष्करें पोटावर चालतात' हा सिद्धांत त्यांना नवीन नाही.

आज्ञा होतां वीर
हातीं घेई शीर
कुणाचें ? कशाला ?
—भाकरी पोटाला !

ह्या ओळींतील उपरोध ह्या गोष्टीची भरपूर साक्ष देईल. रस्त्यावरील भिकारी त्यांच्या नजरेतून सुटलेले नाहीत. त्यांचे दैन्य, त्यांना दाखविली जाणारी सहानुभूती ह्यांचे हुबेहूब चित्र त्यांनी काढले आहे.

वडवीत टिर्‍या । अर्धपोट किंवा
ओंगळ देखावा । दाखवीत ॥
भिक्षा मागे रोज । एवढासा पोर,
आई ती लाचार । पाटीमागें ॥

ह्या चित्रातील कारुण्य त्यांच्या अंतःकरणातील सहानुभूतीची साक्ष देईल पण ह्या सहानुभूतीमुळे त्यांची दृष्टी एकाक्ष झालेली नाही. त्यांना ह्या विदारक दृश्यावरोबरच इतर माणसांतील व्यक्तिगत सहानुभूतीही दिसते. माणसाचा अधःपात झाला आहे. पण सगळीकडेच मांगल्याच्या नावाने कोरडा ठणठणाट नाही. अगदी शेटसावकार झाले, तरी त्यांनाही काही जनाची, काही मनाची असतेच असते. म्हणूनच—

शेट सावकार । मीहि शरमिंदा
मानव्य-मिलिंदा । पैसा देतों ॥

पण ही परिस्थिती चांगली नाही. एकाच्या व्यक्तिगत दयाप्रेरित दानावर दुसऱ्याला जगण्याची पाळी येणे समाजास लांछनास्पद आहे. समाजाच्या हलाखीचे हे प्रात्यक्षिक आहे, ही गोष्ट मर्ढेकर विसरलेले नाहीत.

होऊनियां नंगे । पोटा घांस घ्यावा
आम्हींही तो द्यावा । हलाखी ही

अशी दुर्दैवी परिस्थिती आहे. आमचे इकडे लक्ष नाही. आमची घमेंड काय ? तर—

सत्याचें सुपीक । विश्वांतून वेंचूं,
प्रयोगांत खेचूं । परमाणू ॥
अधिकार ऐसा । मिळविला आम्हीं,

—ही. ह्या अधिकाराचा सदुपयोग म्हणजे सत्तासंपादन. आणि ही सत्ता कशासाठी ? तर ' मानव्याची होळी । भाजाया ती ॥ ' असा हा नंग्यांचा कारभार आहे. एका भुकेपोटी निर्माण झालेली ही अनर्थपरंपरा होय. म्हणून चरफडून मर्ढेकरांनी देवाचीही खडसावून खरड काढली आहे :

देवा, ऐशी भूक । कासया दिलीस,
झालों कासावीस । मीही नंगा ॥
नंग्यांचाच आतां । येथें कारभार
कोंडी आरपार । फोडाया ही

ह्या सर्व प्रकरणाचा मर्ढेकरी सारांश बघण्यासारखा आहे.

टिर्च्या अर्धपोट । जोंवरि आहेत,
ओंगळ समस्त । आम्ही नंगे ! ॥

हा तो सारांश होय. ह्याला वैफल्याचा वास कोठे येतो ? ह्यात मानवाच्या सामाजिक जबाबदारीची जाणीव नाही ? का मानवाच्या भौतिक पिंडाविषयी अनास्था आहे ? का ह्याचा सूर ' जैशी स्थिति आहे तैशापरि राहे ' हा आहे ? ह्यात कोणते वैफल्य आहे ? जरा विचार केला, तर ' विवेअर ऑफ पिटी ' सारखे लोकविलक्षण पण तर्कपूत तत्त्वज्ञान ह्या कवितेत सांगितलेले आढळेल. तीत मानवाच्या ऐहिक हक्काविषयी संपूर्ण जागरूकता प्रत्ययास येईल.

' बिवेअर ऑफ् पिटी ' चे असेच पडसाद ' आणखी काही कवितां ' तील कविता क्रमांक १५ मधील

घांस भरविला बाईंनी तिज
रजा पगारी दिधली वरती;
नभांतुनी पण सकाळ–संध्या
मुखास काळें फासुनि फिरती

ह्या ओळीतही ऐकू येतील. दुवेतलेल्या मोलकरणीची ही कर्मकहाणी आहे. बाई चार महिन्यांची नासावली होती. गर्भ गळाला. रक्तपाट वाहिले. ' किती पटकुरीं सांध्य ढगांसम तांबुस–काळीं भिजली भंवती '—सगळे टीक झाले, प्राप्त परिस्थितीत जेवढी सुखरूप सुटका होणे शक्य होते, तेवढी सुखरूप सुटका झाली. पण पोट काही पाठीमागचे सुटत नाही ! एका नैमित्तिक पोटाचा व्याप संपला म्हणून नित्याची पोटाची वखवख काही थांबत नाही. म्हणूनच

प्रभात पांडुर पहिल्या प्रहरीं
थरथर कांपत दुसऱ्या दिवशीं;
भिकारडी ती अबला आली
थरथर कांपत दुसऱ्या दिवशीं;
अन् डोळ्यांमधिं घेउनि चांद
वदली : " बाई, आठ दिसांनीं
कामावरती येईन खास
तंवर न ठेवा दुजि पर कोनी

एका अभविष्यत मातेच्या विनंतीतल्या ह्या कारुण्याची जात काय पौरुषहीन आहे ? विनंतीला बाईंनी मान दिला. गोळाभर अन्न घातले आणि वर पगारी रजा दिली. पण ही स्थिती मानवसमाजास भूषणास्पद नाही आणि म्हणूनच सकाळ-संध्या तोंडास काळे फासून नभात फिरत आहेत. निर्मल मनाला ह्या कवितेतील सुप्त वैश्वानराची आच जाणवेल. तीत अध्याहृत असणाऱ्या प्रलयकालीन संहारक रुद्राच्या डमरूचा ध्वनी ऐकू येईल. हा रुद्र-डमरू डुमडुमत नाही किंवा शंख फुंकीत नाही हे खरे आहे. पण काळ नेहमीच काही आपल्या

आगमनाची पडघम टोकून दवंडी पिटीत नाही. अभविष्यत मातेच्या ह्या केविलवाण्या वर्णनातील अध्याहृत सामर्थ्याची स्फोटक शक्ती मनोगम्य आहे. शब्दांचे कोश आणि मल्लिनाथी टीका ह्यांच्या साहाय्याने तिचा पाड लागणे कठीण. ' अ स्टायलिस्ट् इज् नोन् बाय् व्हॉट् ही ओमिट्स् ' हे जर खरे असेल, तर ह्या कवितांची जात वेगळी आहे, हे जेवढे खरे आहे, तेवढेच भीमदेवी डरकाळीपेक्षा ह्या कवितेचे प्रक्षोभक सामर्थ्य अधिक आहे, हेही खरे आहे. असो.

होतें आभाळ पेंगत, । सूर्यगोल रेंगाळला;
जैसा इच्छेच्या गल्लींत । श्वान आशेचा भुकेला.
कुणी ओरडलें कोटें । ' बाई, भिकाऱ्याला घाला '
जैसा सत्याच्या निशेंत । ब्रह्मचारी करी चाळा.
सूर्य धावला अंधारीं, । जाग आली आभाळाला;
कुणी कुटल्याशा दारीं । उष्टया महाग अन्नाला !

ह्या कवितेतील उपमांनी निर्मिलेली पार्श्वभूमी आणि तीवरील अखेरच्या ओळीने सूचित होणारे चित्र ह्यांची स्फोटक शक्ती रसिकांच्या प्रत्ययाला येईल. जे रसिक नाहीत किंवा जे रसिक असूनही मर्ढेकरांवर मात्र हेत्वारोपाचे हत्यार चालविण्यात धन्यता मानतात, त्यांचे काय ? ' तान्प्रति नैष यत्नः ' हेच त्यांना रोकडें उत्तर.

गिरणीच्या वर्णनाचा उल्लेख एक शब्दचित्र म्हणून मागे केलाच आहे. त्या कवितेच्या अंतिम दोन ओळींतील उपरोध मर्ढेकरांच्या यंत्राविरुद्ध असलेल्या रागातून जन्माला आला आहे. यंत्राचे असे धिंडवडे मर्ढेकरांनी जागोजाग काढले आहेत. पण तेच मर्ढेकर ह्याच यंत्रागारातील कोळसेवाल्याचे चित्र काढीत असताना उपरोधाचा उपयोग करीत नाहीत. कोळसेवाल्याच्या चित्रातील भव्यता त्यांना दिसते आणि म्हणूनच एका विशिष्ट भव्य ढबीने ते कोळसेवाल्याचे वर्णन करतात. मर्ढेकरांच्या अवजड भाषेलाही ह्या चित्रात पंख फुटलेले दिसतील. त्यांनी शब्दांच्या भाववाहक शक्तीचा कमाल उपयोग ह्या कवितेत केला आहे. शब्द-भव्यता आणि अर्थभव्यता ह्यांचा हा गंगायमुनासंगम रसिकाला वेड लावील.

दृष्कट दंडस्नायू जैसे
लोखंडाचे वळले नाग;
कभिन्न काळ्या मांड्या, जैसा—
पोलादाचा चिरला साग

यंत्रयुगांतिल नवनृत्याचा
स्थाणुभाव हा प्रगटे येथें;
मनोज्ञ मुद्रा शिल्पित एक
संगमरवरी मांसामध्यें.

नव्या मनूतील गिरिधर-पुतळ्याच्या ह्या वर्णनात भव्यतेची अभिव्यक्ती झालेली नाही काय ? मर्ढेकरांचा यंत्रद्वेष म्हणजे यंत्रजीवी माणसाचा द्वेष नव्हे, ह्याचा ह्यापलीकडे आणखी कोणता पुरावा हवा ? ह्या यंत्रजीवी माणसाच्या सामर्थ्याची जाणीव त्यांना आहे. आणि म्हणूनच ह्या चित्रात त्याच्या भव्यतेचे वर्णन त्यांनी भव्य शब्दांत केले आहे. ज्याला यंत्रजीवी माणसाच्या ह्या भव्यतेची प्रचीती येते, त्याचा त्याच्या सामर्थ्यावर विश्वास नाही, हे म्हणणे तर्कसंगत तरी आहे काय ? यंत्रजीवी माणसाविषयीच्या सहानुभूतीच्या पोटीच ' भोंगाकुत्री 'वाली कविता जन्मास आली आहे. अश्रू न ढाळता चरखी गाळणाऱ्या श्रमजीवी लोकांबद्दल मर्ढेकरांना अनादर नाही. किंबहुना, त्यांच्या दुर्दशेमुळेच त्यांची ईश्वरावरची निष्टासुद्धा मधूनमधून ढासळलेली दिसते, ' राव, सांगतां देव कुणाला, शहाजोग जो शहामृगासम ' ह्या कवितेचा उगम

तलम पारदर्शी वसनीं । हेरपोट्या दे ताणुनी, ।
आंधळा लक्तराभरणीं । चांचपडे ।

ह्या परिस्थितीत सापडेल. रागाची ही कमाल मर्यादा आहे. अतिसंताप आल्याशिवाय माणसे जन्मभर उराशी बाळगलेल्या निष्टांना अशा तऱ्हेने चूड लावीत नाहीत. मर्ढेकरांना आलेल्या ह्या रागावरून त्यांच्या जीवननिष्टांचा शोध घेण्याचा प्रयत्न केल्यास त्यात वैफल्याचा फार थोडा भाग सापडेल.

मर्ढेकरांनी स्त्रीपुरुषसंबंधाची कुचेष्टा केली असेल (आधी ती कुचेष्टा नाही, तो सत्यदर्शनाचाच एक प्रकार आहे.), कारण त्यांना स्त्रीत्वाची हलाखी आणि माणुसकीचे विडंबन मान्य नाही. ते स्त्रीतील मातृत्वाची किंमत ओळखतात आणि म्हणूनच त्यांना उद्याच्या माउलीच्या पायाचे तीर्थ घ्यावयाची इच्छा आहे. मर्ढेकरांचे हे मातृपूजन नवीन नाही. ' शिशिरागमां 'तही त्यांनी एका वेगळ्या संदर्भात आईचा आदरपूर्वक उल्लेख केलेला आहे :

भेट शेवटली तशी प्रथम तीच । झोपडीला परतवी माय-खेंच
माय असते, बाईल जरी नाहीं । प्रेमवंता तशि प्रेमवंचिताही

... ...

नाही हें नशिबीं !—नसोच मिटती जागेपणीं पापण्या
आई ! येत म्हणून मस्तक तुझ्या अंकावरी टेवण्या.

हे व्यक्तिगत उल्लेख आहेत, असे म्हणून त्यांची बोळवण करता येणार नाही. किती प्रेमवंचितांना प्रेमभंगानंतर आईची अशी आठवण होते ? ' स्त्रीजात तेवढी बेहराम ' ही ह्या प्रसंगीची नैसर्गिक प्रतिक्रिया. प्रेमभंगानंतर ही प्रतिक्रिया न होता मर्ढेकरांना आईची आठवण होते, हा त्यांच्या मनातील मातृपूजकाचाच आविष्कार होय. ' उत्पत्ति ' ह्या प्रक्रियेबद्दल निरतिशय आदर असल्याशिवाय उद्याच्या माउलीच्या पायाचे तीर्थ ही कल्पना मनात येणेदेखील असंभव आहे. आणि ज्याला उद्याच्या माउलीच्या पायाचे तीर्थ घ्यावयाची इच्छा होते, त्याचा ' उद्या ' वर विश्वास नाही, हे म्हणणे तर्कशुद्ध वाटत नाही. मग पिस्टन, रिंग ह्यांच्या अनुषंगात दिलेल्या संज्ञाहीन संभोगाच्या उपमेचे काय ? त्याचे विवरण मागे केलेलेच आहे. विशेष म्हणजे ह्या उपमेत स्त्रीत्वांची विटंबना नाही, तर स्त्रीकडे भोग्या ह्या एकमेव दृष्टीने पाहणाऱ्या मानवाची विटंबना आहे. संभोगातील भावनाशून्य शारीरक्षुधानिवारक क्रियेचा उपहास आहे. ' स्त्री ही अनंतकालची माता आहे ही टाळीबाज वाक्ये प्रत्यही व्यासपीठावर फुटाण्यासारखी उडत असतात. पण आचार्य विनोबा आणि त्यांच्या योग्यतेचे लोक सोडले, तर बाकीच्या ओल्या पिंपात मरणाऱ्या उंदरांची म्हणजे विषयैकलक्षी द्विपदोत्तमांची स्त्रीकडे पाहण्याची दृष्टी थोडी कोती असते, हे संपूर्णपणे नाकबूल करण्यात अर्थ नाही. नागपूर-मुंबईसारख्या विद्या, संस्कृती इत्यादीच्या माहेरघरी उत्सव-विशेष-प्रसंगी दिसून आलेली राष्ट्राच्या विद्याविभूषित आधारस्तंभांची सगळीकडे गाजलेली ती बालचेष्टिते म्हणजे त्यांनी मातृत्वाला केलेले मुजरे आहेत, हेच ज्यांना म्हणावयाचे असेल, त्यांना मात्र उत्तर देता येणार नाही. मर्ढेकरांना आजचे हे नागवे सत्य स्पष्टपणे दिसते आणि म्हणूनच त्यांनी पोटतिडिकीने बीभत्सतेच्या शिगेवर आदळणाऱ्या उपमांचा उपयोग करून ह्या प्रवृत्तीचे धिंडवडे काढले आहेत. ज्यांच्या माना आसक्तीविण पडतात अशा विषयैकजीवी माणसांबद्दल त्यांना अतिशय तिरस्कार आहे. अशा जीवांची सहेतुक विटंबना त्यांनी

' पिंपांत मेले ओल्या उंदिर ' ह्या कवितेत केली असावी, असे वाटते. (ह्या कवितेतील मर्ढेकरांचे खरे अभिप्रेत त्यांचे त्यांसच माहीत !) त्यांच्या काव्यांत इतरत्रही त्यांच्या ह्या उद्वेगाचे पडसाद ऐकू येतात. ' पवळी 'वरील कवितेत पवळीच्या जीवनावद्दल अनुकंपा नाही, असे नाही. तरीही तिच्या जीवनक्रमाच्या अनुषंगाने ध्वनित होणाऱ्या ' संज्ञाहीन ' संभोगासंबंधी उद्वेग तीत भरपूर भरलेला आहे. ' शिळीं स्तनाग्रें ', ' निळ्या माडिचा निराळा विडा ' ह्या शब्दप्रयोगांना ह्या उद्वेगाची धार आहे; आणि म्हणूनच ते शब्दप्रयोग वोचतात.

संज्ञाहीन संभोगाची अशी क्रूर विदारणा मर्ढेकरांनी केली आहे, ह्याचा अर्थ स्त्रीप्रेमावर त्यांचा विश्वास नाही, असा नाही. ह्या प्रेमातील गोडवा त्यांना कळतो, शृंगाराचे त्यांना वावडे नाही.

वांगी झाली काळी-निळी,
कांटा बोचे काढतांना;
आज होतील का खुशी
माणसं ग जेवतांना !

ह्यातील संयत घरंदाज शृंगार त्याची साक्ष देईल. स्त्रीविषयक प्रेमाची मोडी लिपी त्यांना वाचता येते. त्याचे सुख, त्यातील दुःख ह्या दोहोंचा अनुभव त्यांना आहे. ' शिशिरागम ' कालात त्यांच्यासमोर

उत्फुल्ल हृत्पुष्प ! आशादलांचा खुले रंग ! भोळी चढे टवटवी !
तत्केसरांच्या सुवासी परागां कुणा केस–भांगांतुनी पेरणें ?

असा प्रश्न उभा राहिला होता. ह्या प्रश्नाला योग्य ते ' उत्तर 'ही त्यांनी शोधून काढले होते. अशा प्रश्नांना ' जीवनाच्या पहांटे ' ' जीवनानुभव खोल ' नसताना मिळालेली ' उत्तरे ' साधारणपणे बरोबर नसतात. मर्ढेकरांचेही गणित चुकलेले दिसते.

झाला अंक समाप्त एक ! बदले ही भूमिका वेष हा,
मी रस्त्यांतिल गे भिकार कवि, तूं प्रासादशृंगी रहा !

ह्या ओळीत त्या चुकलेल्या उत्तराचा पुरावा सापडेल. पण ह्यामुळे त्यांच्या मनात कडवटपणा निर्माण झालेला दिसत नाही. त्यानंतरही त्यांनी प्रेमकविता लिहिल्या आहेत. आणि त्यांतील गोडवाही अविस्मरणीय आहे. ' अदृष्टरूपा 'च्या शोधार्थ

त्यांनी 'सूर्य माथ्यावरी' येईपर्यंत वाटचाल केली होती. आजही ती चालू आहेच. म्हणूनच ते जवळ आल्यासारखे वाटले की मर्ढेकर फार हळुवारपणे त्याचे वर्णन करतात.

'दंवांत आलिस भल्या पहांटीं' ह्या कवितेत हा हळुवारपणा ओतप्रोत भरलेला आहे. ती 'शुक्राच्या तोऱ्यांत' आली. 'जवळुनि अपुल्या तरल पावलांमधली शोभा पेरित' गेली. ती कशी अडली, कशी जराशी पुढे सरली, कशी जराशीच हसली, तिने मागे वळून कसे पाहिले, हे सगळे सगळे त्यांना आठवते. आपले व तिचे जन्मांतरीचे काही भावस्थिर संबंध असल्याचा भास त्यांना होतो. पण पक्की ओळख पटत नाही. म्हणूनच ते म्हणतात :

अनोळख्यानें ओळख कैशी
गतजन्मींची द्यावी सांग;
कोमल ओल्या आठवणींची
एथल्याच जर बुजली रांग !

ही ओळख पटली नाही म्हणूनच

भटकत फिरलों भणंग आणिक
मिळेल तेथे पाणी प्यालों;
जुळेल तेथें खूण जुळविली
तरी होतों हा तसाच उरलों.

हे म्हणावयाची पाळी त्यांच्यावर येते. पुन्हा एकदा ती आली. आली ती मुळी झाडावरल्या थेंबांच्या सरीसारखी, 'सहज नाचऱ्या डोळ्यांमधली माधुरी' शिंपीत आली. ह्यापुढे काय झाले ते मर्ढेकरांनाच सांगू द्या :

आणि कालची तहान मेली,
गळ्यांत कोरड दुसरी आज;
व्यर्थ नव्हे का ओंजळ जेथें
शरीर सारें म्हणतें पाज !
ओट वाळला कालचाच तरि
आज निराळी लाही त्यावर;

शब्दांचे कुणि करोत चमचे,
'आ' वनलें हें सारें अंतर !

ज्या माणसाचा प्रेमावर विश्वास नाही त्याला इतके भावोत्कट काव्य लिहिता येईल का ? ह्या कविता लिहिणाराचा आत्मा तर प्रेमरसात पार चिंब भिजून निघालेला दिसतो. ह्या प्रेमात ओंगळपणाचा लवलेशही नाही. येथेही ज्यांना ओंगळाचा वास येईल ते करंटे. मर्ढेकरांना स्त्रीप्रेमाची ही वाजूदेखील अगदीच अज्ञात नाही. आता ते उठल्यासुटल्या 'तूं आणि मी' ची रागेश्री आळवीत नाहीत, हे खरे. पण ते त्यांच्या प्रकृतिधर्माचे भागधेय होय. अशा प्रेमाचे आणि वैफल्याचे मृत्युघडाष्टक असते म्हणतात. अशाच त्यांच्या आणखीही दोनचार कविता आहेत. जिज्ञासूंनी त्या मुळातूनच वाचाव्या.

आज मानव सहानुभूतिशून्य जिणे जगत आहे. तो स्वयंकेंद्र दृष्टीने जगाकडे पाहतो. ह्या दृश्याने आलेला उद्वेग 'नाहीं कोणी का कुणाचा' ह्या कवितेत व्यक्त झाला आहे. एक पिढी दुसऱ्या पिढीला बेंबीच्याद्वारा नाळाने जोडलेली असते, हे जर शास्त्रीय सत्य आहे, तर कोणी कुणाचा नाही, ह्या भाषेत काय अर्थ आहे ?—असा प्रश्न ते विचारतात. ज्याला ह्या सहानुभूतीची जाणीव आहे, त्याला जीवन अर्थहीन वाटते, हे खरे दिसत नाही. अर्थात एकंदर विश्वचक्रात ह्या हाडाच्या महालात राहणाऱ्या हरीच्या लालाचे स्थान कोणते, हा प्रश्न शिल्लकच राहतो. आणि त्याची एकंदर विश्वाशी तुलना केल्यानंतर दिसून येणारी क्षुद्रता त्यांना

वास्तुशास्त्र कां विलोरी,
योजिसी येथेंचि मुरारी ।
घडसी वस्तीला भाडिकरी,
विलोरीच ॥

हा प्रश्न विचारावयास लावते.

आज मानव तर 'आढ्योऽभिजनवानस्मि कोऽन्योस्ति सदृशो मया' आणि 'ईश्वरोऽहमहं भोगी सिद्धोऽहं वलवान्सुखी ॥' ह्या दर्पात विश्वाचा एकमात्र नियंता आणि शास्ता असल्याचा आव आणीत आहे. ही मानवाची खोटी ऐट मर्ढेकरांना मान्य नाही. ह्या विश्वचक्रात पृथ्वीला एक

ग्रहाचे स्थान आहे. तीवरील लक्षावधी जीव-जीवाणूंपैकी मानव एक आहे. ह्याचा विसर पडून त्याने स्वतःला ह्या ब्रह्मांडचक्राचे तंबू समजून सर्व विश्व आपल्या-भोवती फिरविण्याचा अट्टाहास करावा, ही गोष्ट त्यांना पटत नाही. विश्वाच्या ह्या मानवकेंद्र कल्पनेला (होमोसेंट्रिक कॉन्सेप्ट्ला) त्यांचा विरोध आहे. आज मानव बुद्धी आणि विज्ञान ह्यांच्या जोरावर एवढ्या गमजा करीत आहे. पण बुद्धी आणि विज्ञान ह्या दोन गोष्टींनी सर्व प्रश्न सुटत नाहीत, हे मर्ढेकरांना कळते, आणि म्हणूनच त्यांनी :

आहे बुद्धीशीं इमान । जाणे विज्ञानची ज्ञान ।
परि कोठें तरी आन । ताण पडे ॥

अशी कबुली दिली आहे. विज्ञानामुळे अणूसंबंधी एक प्रायोगिक सत्य आम्हाला कळले आहे. पण त्यातूनच हिरोशिमाचा नरमेध जन्माला आला आहे. भांडवल व तदनुषंगी नष्टचर्य ह्यांचे सम्यग्ज्ञान आम्हांला आहे आणि तरीही ' कामगारा-हाती कर्वतिच ' दिसते. ह्या ज्ञानाच्या मर्यादा आहेत आणि म्हणूनच ते

येथ शब्द नाहीं विज्ञाना । हें अवघें मानव्याविना
नरमेध वाटे नरांना । धन्य जेथें ॥

असा निष्कर्ष काढतात. ह्या विज्ञानात मानव्याला (मानवासंबंधी सहानुभूती) स्थान नाही आणि म्हणूनच मानव नरमेधात धन्यता मानतो. ब्रह्मांडातील गूढे उकलण्यासाठी ज्ञानाचे साधन पुरेसे नाही, किंबहुना ते निरुपयोगी आहे, असे मर्ढेकरांना वाटत असावे. ह्या जाणिवेतूनच

अंधाऱ्या जगाची । हीच रीतभात
काजळाची वात । काळोखाला ॥

हा अभंग लिहिला गेला आहे. तथाकथित ज्ञानाची वात जाळून ह्या विश्वाच्या अंधारात प्रवास करणे अशक्य आहे. ज्ञानेश्वराच्या भाषेत सांगावयाचे म्हणजे ' विज्ञान ' (प्रापंचिक ज्ञान) अंतिम सुखाचे साधन नाही, हाच ह्या ओळींचा अर्थ आहे. बरे, ह्या ज्ञानाचा वा विज्ञानाचा वकूब पाहावयास जावे, तर त्या दृष्टीनेही नन्नाचा पाढा. ' ज्ञानाचें कुंपण स्मशानांत.' माणूस अगदी ' विज्ञान-महंत ' झाला म्हणून काही ' जन्ममृत्यूची खंत ' टळत नाही. ज्ञानाचे अंजनं डोळ्यांत घालून इकडे तिकडे पाहावे, तर जागोजाग ' अंधत्वाचे कांटेच '

बोचतात. विश्वसूत्राचे पीळ उलगडावयास ज्ञानाची मदत तर होत नाहीच, उलट त्याचे मानवाच्या संविद्भोवती कुंपण मात्र तयार होते. ज्ञानाच्या बळावर आकाशात दुर्बिणी लावा, परमाणूंच्या राशीच्या राशी फोडा, नाही तर आणखी काही न भूतो न भविष्यति, असे उत्पात करा, त्यामुळे काही मानवाचे प्रश्न सुटणार नाहीत. इतके असूनही ह्याच साधनाच्या जोरावर माणसाचा दिमाख आहे तो आहेच.

आहे रक्तात उजाळा । सूक्ष्मदर्शी चश्मा डोळां
नाहीं बुद्धीचा पांगळा । मानव मी ॥

ही मानवाची घमेंड. बरे, ह्या ज्ञानविज्ञानामुळे स्वार्थाला तरी काट बसावा; तर तेही नाही. मग ह्या बालवॉशिंग्टनच्या हातातील कुऱ्हाडीचा फलितार्थ काय ? तर

स्वार्थ बोले ओटीं ओटीं । सत्ता बैसे पैशापाटीं,
घेरा गबाळांच्या गांटीं । अर्धपोट ॥

हा. ह्या ज्ञानांजनाने माणसाची किंमत तरी वाढावी, तर तिकडूनही निराशा. ' जीव पैशाला पासरी । अणुयुगीं ॥ ' बरे, परमेश्वराची आशा धरावी, तर तो ब्रह्मांडात काळोखात कोठे तरी खसून बसलेला. माणसाचे अंतरही प्रकाशमय नाही. त्यात ' काळोखाची वाफ ' दाटलेली. ही मानवाची आजची स्थिती आहे. सान्त मानव अनंताच्या ' परिमळाला ' मुकलेला आहे. ह्याचा परिणाम काय ?

एकला असून । मनीं दोन झालों,
आतां मात्र भ्यालों । मला मीच.

हा तो भेसूर परिणाम होय. असा हा द्विधाविभक्त मानव आशेच्या वातीने आशांचेच तूप जाळीत बसला आहे. जीवनाच्या तमाशात त्याची भूमिका सोंगाड्याची. शेवटी यमाजी भास्कर पडदा खाली सोडतील, तोवर चालू असलेला हास्यरसाचा विदूषकी जल्लोश म्हणजे जीवन. जीवनाच्या ह्या विदूषकी बाजूचा उल्लेख एका निराळ्या संदर्भात ' शिशिरागमां ' तही आहे.

ज्यांना जीवनात ही ज्ञानविज्ञानाची लक्तरे लाधलीच नाहीत, ते काही तरी बरे. त्यांचे—

देह साफल्य पावले । पृथ्वीवरी त्यांचें भलें
आलें काम त्यांनीं केलें । आणि गेले ॥
गळे अश्रूंवीण चरखी । तीच अज्ञानाची छबी,
झाले ते खत आणि बीं । तुझ्या मळां ॥

ज्ञानवंतांचा खाक्या इतका साधा व सोपा कसा असेल ? ते ज्ञानवंत. त्यांना पश्चात्ताप नाही. परदुःखाविषयी हळहळ नाही. त्यांनी ज्ञानाचे वालुकाकण वेचीत आयुष्य काढावे. ह्याचा परिपाक जो व्हावयाचा, तोच होतो. शेवटी हे ज्ञानवंत 'बुद्धिरूपी कोरडे पाषाण' होऊन बसतात. अशा ह्या महाभागांची एकमेव आराध्यदेवता बुद्धी ही विश्वाच्या सूत्रबद्ध निरगाठी उकलण्याचा प्रयत्न करीत आहे. मर्त्यांश-अमर्त्यांशांची ही रस्सीखेच युगानुयुगे चालूच आहे. ह्या ओढाताणीत 'बांझपोटी' बुद्धी निकामी ठरत आहे, ठरली आहे. ह्या महामायेच्या कर्तबगारीची मर्यादा एवढीच.

ह्याच श्रीमती बुद्धीची चुलत बहीण म्हणजे स्मृती. हिचा तिसराच पंथ. हिच्यामुळे गेल्या गोष्टींविषयी हळहळ निर्माण होते आणि ह्या हळहळीतून गत सुखांची अनंत प्रतिबिंबे माणसाला मोह पाडतात. ज्यांना ही प्रतिबिंबे दिसत नाहीत, ज्यांना अतीत कालातील सुखांविषयी हळहळ नाही, त्यांना सगळीकडेच स्वर्ग दिसतो ! 'अजागलत्याची होडी' त्यांना सगळीकडेच निर्भय असते. ज्यांच्या पुढच्यामागच्या आठवणी ताज्या असतात, त्यांच्या कपाळी प्रतिबिंबातील अनंत कोडी ठरलेली. स्मृतीचा साखळदंड जीवनातील आनंदाला जखडून टाकतो आणि मग मात्र ज्ञान आणि स्मृती ह्यांच्या आवर्तात सापडलेला मनुष्य प्रतिबिंबातील लवचिक सृष्टीभोवती पिंगा घालीत बसतो. अतीताभोवती पिंगा घालीत बसण्याच्या ह्या प्रवृत्तीचे संस्कृत नाव म्हणजे पलायनवाद. पलायनवाद हेदेखील क्षुद्र भीतीचेच अपत्य आहे. जीवनातील ह्या भीतीचा मर्ढेकरांना तिटकारा आहे आणि म्हणूनच कधी नाही, तो ह्या पलायनवादाविरुद्ध मात्र उद्‌बोधनाच्या अवसानात त्यांनी जोरदार आवाज उठविला आहे :

घडल्या गोष्टी विसरुनि जा अन्
नडल्या आशा चुलींत फेका
जिवंतता जर असेल रोमीं
मरण तिच्यांतिल थोडें हुडका.

... ...

निदान आतां घडल्या गोष्टी—
नडल्या आशा चुलींत फेका;
कानांवरती हात ठेवले
नाडीचा तरि बंद न ठेका.

ह्या कवितेत पलायनवादाविरुद्ध शरसंधान केलेले आहे. तीतील द्विरुक्ती निव्वळ काव्यांतर्गत संगीतासाठी नाहीच नाही. कवीला अट्टाहास करून काही तरी येथे सांगावयाचे आहे. असो. असा हा स्मृतीचा परिवार आहे.

तो पलायनवाद, ती भीती, तो अहंकार, ती निष्ठाशून्यता—हे सगळे मानवाच्या लाडक्या बुद्धि-स्मृतींचे लेंढार होय. मानवाला त्याने साफ गुरफटून टाकले आहे. तरीही ह्याच स्मृती आणि बुद्धी ह्या दोघांच्या जोरावर घमेंडखोर माणूस इतका माजला आहे, की तो आपल्या स्वतःच्या पलीकडे पाहूच शकत नाही. ह्याचा उबग आल्यामुळे मर्ढेकर म्हणतात :

'जेथें जातों तेथें । मी माझा सांगाती
डोळ्यांच्याच भिंती । झाल्या ऐशा ॥

एके काळी उत्पत्ति-स्थिति लयात्मक विश्वाचा नियंता म्हणून परमेश्वराला मानवाच्या मनात स्थान होते. आज मानव ते स्थान स्वतः काबीज करू पाहत आहे. त्यालाच मर्ढेकरांनी मर्त्यांश-अमर्त्यांशांची रस्सीखेच हे समर्पक नाव दिले आहे. ह्या रस्सीखेचीविरुद्धही अगदी पोटतिडिकीने चरफडून मर्ढेकरांनी लेखणी उचलली आहे :

देवासाठी दगड पूजिला
मानवतेची अतां आरती;
संस्कृत झाला शब्द म्हणुनि का
देव्हाऱ्यावर नवीन कांति !
दगड गाडला, गाडा हाडें
शेंदुर गेला, रक्त जाऊं द्या;
अज्ञानाच्या गळफांसांतच
जरा जगा अन् जरा जगूं द्या

नळींतलें जग नळींत जगतें
उगाच रुसवा रसायनाचा
उगाच दावा मानवतेचा
आणिक डंका सामर्थ्याचा !

ह्या कवितेत त्यांनी मानवाच्या ह्या अहंगंडाविरुद्धच शस्त्र उचलले आहे. शल्यनीतीचा अवलंब करून त्यांना मानवाचा तेजोभंग करावयाचा नाही किंवा मानवांच्या परस्परसहानुभूतीची विदारणा करावयाची नाही. मर्ढेकरी नैराश्य हे तत्त्वज्ञाचे नैराश्य आहे.

मर्ढेकरांच्या व्यक्तित्वाच्या तीन पैलूंचा उल्लेख मागे केला होता आणि त्यांपैकी माकडाचा योग्य तो परामर्शही योग्य स्थळी घेतला आहेच. येथे थोडा वेळ थांबून त्यांच्यातील कवी आणि तत्त्वज्ञ ह्या दोघांचे चेहरेमोहरे थोडे निरखून पाहावयास हवेत.

कवी मर्ढेकरांचा विचार वेगळाच करावयास हवा. कारण त्यांच्यातील तत्त्वज्ञामुळे बहुतांश लोकांना त्यांच्यातील कवीचा विसर पडला आहे. शुद्ध कवीचे दर्शन घडविणाऱ्या पंधरावीस कविता त्यांनी लिहिलेल्या आहेत. त्यांनी आणखी काहीही लिहिले नसते, तरीही कवी म्हणून त्यांना योग्य तो मान मिळवून देण्यास त्या पुरेशा आहेत. 'कलेसाठी कला', 'काव्यानंदासाठी काव्य' इत्यादी कसोट्यांवर त्या घासून पाहिल्या असतादेखील त्यांतील काव्य शंभरनंबरी असल्याचे दिसून येईल; त्यांच्या प्रेमकविता ह्याच जातीच्या आहेत. अशा कवितांपैकी काहींचा उल्लेख मागे प्रसंगानुरोधाने आलाच आहे. ह्या ठिकाणी अशा जातीच्या कवितेची वानगी म्हणून एकीचा विस्तारपूर्वक परामर्ष घेऊन मग पुढे जाऊ.

'अभ्रांच्या ये कुंद अफूनें' ह्या कवितेत वैशाखातील उन्हाळ्याचे वर्णन आहे. वैशाखातील अभ्रे, वसंतात झाडांना फुटणारी पालवी आणि त्यांची निस्तब्धता ह्या सर्वांचे वर्णन मर्ढेकरांनी पहिल्याच दोन ओळींत करून टाकले आहे. ह्या ओळींमुळे वैशाखातील क्लांत पण पुढे लवकरच येणाऱ्या सरींच्या आशेवर जगणाऱ्या वनश्रीचे चित्र आपल्या डोळ्यांसमोर उभे राहते. आषाढात पडलाच तर पाऊस पडावयाचा. (हे वर्णन कोकणभागाचे नाही. काळ्या मातीचा उल्लेख ह्याची साक्ष देईल. आषाढातील 'वप्रक्रीडा–परिणतगज-

प्रेक्षणीय ' मेघावरोवरच कालिदासाच्या यक्षाने आपल्या प्रेयसीला निरोप पाठविला होता, ह्यावरूनही भारताच्या मध्यभागातील काही प्रदेशांत आषाढात फार पाऊस पडत नसावा, असा कयास करावयास जागा आहे. ऋतुवार केलेल्या महिन्यांच्या विभागणीत ज्येष्ठ-आषाढ ग्रीष्मऋतूच्या नावावर पडले आहेत. ही गोष्टदेखील वरील कयासाला दुजोरा देते.) म्हणून आषाढातील पाऊस म्हणजेच गाजराची पुंगी. ती वाजली तर वाजावयाची. वैशाखाच्या वनश्रीच्या पाटोपाट फांद्या ह्या पुंगीच्या सुराकडे कान लावून आहेत. वनश्रीच्या पाटोपाट आपले लक्ष पाखरांकडे जाते. कालिदासाने ' फणी मयूरस्य तले निषीदति ' म्हणून ह्या माधवी उन्हामुळे होणाऱ्या प्राण्यांच्या हालांचे वर्णन केले होते. मर्ढेकरांनी जवळजवळ तसेच वर्णन केले आहे :

मिटून बसलीं पंख पांखरे,
पर्युत्सुक नच पीसहि फुलतें;

पक्ष्यांनंतर ढोरांची पाळी. त्यांपैकी बिचारी गाय, तीही एके जागीच बसलेली आहे. म्हणूनच तिच्या चालीच्या तालावर नाद करण्याचे भाग्य तिच्या गळ्यातील घंटेला नाही. आणि ह्यामुळेच ती घंटाही झुरत आहे. गाय माशा उडविण्यासाठी मान हलवील तेव्हा, किंवा रवंथ करताना, निसर्गतः तिच्या मानेचे चलनवलन होईल, तेव्हाच किणकिण करण्याची संधी मिळेल. तेवढाच ह्या घंटेचा नाद. तिने का झुरू नये ? आधीच उन्हाळ्याचा मारा; त्यात ही गाय गरोदर आहे; त्यामुळे आधीच सुस्तावलेली ती अधिकच सुस्तावली आहे. हे सर्व

मूक गरोदर गाईची अन्
गळ्यांतली पण घंटा झुरते

ह्या लहानशा दोन ओळींत व्यक्त झाले आहे. ह्या चरणातील ' घंटा झुरते ' ह्या शब्दप्रयोगाची प्रसरणशक्ती एवढी दांडगी आहे. तिथूनच रस्त्यावर नजर गेली की त्यावर उडणारी काळी धूळ दृष्टीस पडते. पाण्याचा ओलावा अजीबात नाही. माणसे, जनावरे, वाहने ह्यांची ये-जा चालू आहे. त्यामुळे झालेल्या रस्त्याच्या दैनेचे वर्णन पुढील दोन ओळींत आहे. रस्त्यावर उभे राहून वर पाहिलेच, तर घारी दिसावयाच्या—त्याही पाण्याच्या शोधात असाव्यात. आणि म्हणून पाण्याच्या आशेने ओल्या उष्टेखळीजवळ आलेल्या घारीची कोरडी चोच अन्न

जवळ असूनसुद्धा थोडी थबकते. किंवा तोंडात भक्ष्य असून तहानेने चोचील कोरड पडल्यामुळे वारीची चोच थबकली आहे, हेही कवीला सुचवावयाचे असेल. काही असले तरी अन्न जवळ असूनसुद्धा तहानेने व्याकूळ झालेली वार ते खात नाही, एवढेच कवीला सांगावयाचे आहे, हे नक्की. मध्येच आगगाडीचा आवाज ऐकू येतो, त्याचे वर्णन ह्यापुढील दोन ओळींत आढळते. उन्हाळ्याचा परिणाम निव्वळ सचेतनांवरच झालेला नाही; अचेतनांवरही तो तसाच झाल्यासारखा दिसतो, हे सूचित करण्यासाठीच गाडीच्या तुटलेल्या श्वासाचा उल्लेख येथे केला असावा. किंवा गाडीच्या आवाजापलीकडे आणखी काहीही येथे अभिप्रेत नसण्याचा बराच संभव आहे. सचेतन-अचेतनांची अवस्था ही, तर धरणीचे तर विचारावयासच नको. तिच्या उरात मधाचा ऊन उसासा अडकून पडला आहे. (मघा नक्षत्रात गंधवतीतून निघणारे गंध तर येथे अभिप्रेत नाहीत ?) अशी ही कुंद हवा आहे. आता पाऊस पडेल तेव्हा पडो, पण ह्या वैशाखात जग पुढील पिकांच्या मृगजलाचा (आली तर पिके नाही तर माती !) विचार करावयास लागते. लोकांना ह्या मृगजलाचा कैफ चढतो आणि ते कामास लागतात, हेच कवीला शेवटच्या कडव्यात ध्वनित करावयाचे आहे.

येथे तत्त्वज्ञान नाही, उपरोध नाही, समाज नाही, काही नाही, एक नैसर्गिक दृश्य पाहून कवीला जे दिसले, त्याचे वर्णन येथे केलेले आहे. ह्यात कोणताही काव्यबाह्य हेतू नाही. अशा कविता मर्ढेकरांनी लिहिल्या असतील, ही जाणीव तरी किती लोकांना आहे, हाही प्रश्नच आहे. अशाच भावरम्य काव्याचा नमुना म्हणून ' अभ्ररम्य पश्मिनी मोकळ्या तुझिया केसांतुन ' ' शुभ्र-तिमिर-मोहक-वसना ' इत्यादी कविता वाचून पाहाव्यात. ' आला आषाढ श्रावण ' (सत्यकथा, जुलै १९५३) ही कविता तर वाचकांस विशुद्ध काव्यानंदाचा निश्चित लाभ करून देईल. दुर्दैवाने मर्ढेकरांनी ह्या जातीच्या कविता फार थोड्या लिहिल्या आहेत. पण त्या थोड्या कवितांतच आपल्या लेखणीच्या सौंदर्यदर्शी शक्तीचा पुरेपूर आविष्कार त्यांनी केला आहे. ' शिशिरागमा 'तही त्यांच्या ह्या शक्तीची चुणूक साक्षेपी वाचकांस दिसून येईल.

त्यांच्या इतर काव्याची पार्श्वभूमी सामाजिक आहे. त्यांतील काहींवर उपरोधाची अभ्रे आली आहेत. काहींवर कारुण्याचा गडद रंग चढला आहे. काहींत नैराश्याच्या छटा दिसतात. वर्ण्य विषयाला सामाजिक चौकट असल्यामुळे तत्त्वज्ञ

मर्ढेकरांच्या पडद्याआड दडलेल्या कवी मर्ढेकरांचा चेहरा जितका स्पष्टपणे दिसावयास हवा, तितक्या स्पष्टपणे दिसत नाही. टीकाकारांनी तर तो साफ पुसून टाकण्यासाठी भरपूर उपद्व्याप केले आहेत.

ह्याचा अर्थ ह्या कविता म्हणजे वृत्तबद्ध गद्य आहे, असा नाही. त्या कवितांतही काव्य आहे, रस आहे, सगळे काही आहे. गणपत वाणी, मुंगी जग, ह्या कवितांत काव्य नाही, असे कोण म्हणेल ? त्यांच्या तत्त्वस्पर्शी कवितांतदेखील असेच रसपूर्ण काव्य आहे. पण त्या वाचित असताना त्यांच्यातील काव्याकडे फार थोड्या लोकांचे लक्ष वेधते. सगळ्यांची भरमार त्यांतील तत्त्वज्ञानावरच असते. हे मर्ढेकरांचे तिढे भागधेय होय.

ह्या कवितांत मर्ढेकरांनी फक्त सत्यदर्शन करविले आहे. ह्या सामाजिक पार्श्वभूमीवर चितारलेल्या सत्यदर्शक चित्रांवर थोडा निराशेचा रंग चढल्यासारखा दिसतो. अर्थात ह्याचा दोष मर्ढेकरांकडे नाही. सगळा समाज जर गणपत वाण्यांनी भरलेला आहे, तर त्यांनी चाणक्य, समुद्रगुप्त, वाल्मीकी आणि भास्कराचार्य ह्यांची चित्रे कोठून रंगवावी ? जेथे मुंग्यांचेच जग आहे, तेथे तुम्ही कवितांत गरुडांची चित्रे का रंगवली नाहीत, हा प्रश्न वाष्कळ होय. बरे, ह्या मुंगीजगाच्या सर्वसाधारण नियमाला असलेले अपवाद मर्ढेकरांच्या कविसंविद्‌ला अज्ञात नाहीत. त्यांचीही दखल तिने घेतली आहे. मुंग्यांच्या जगातही 'पार्थिवतेच्या पराकोटिचे लोण अपार्थिवाला' नेणारी माणसे होऊन जातात, ह्याची जाणीव मर्ढेकरांना आहे. 'मुंगी' कवितेतील गांधीजी, येशू ख्रिस्त, कृष्ण, कालिदास अन् टैकोब्रा ह्यांचे उल्लेख ह्याच जाणिवेचे निदर्शक आहेत. पण अपवादाने नियमच सिद्ध होतो. मग ह्या नियम होऊन बसलेल्या जनस्थितीचे चित्रण केले, म्हणून कवीने असा काय अपराध केला आहे की, आम्ही त्याच्यावर हेत्वारोप करून त्याचा धुव्वा उडवायचा प्रयत्न करावा ? आजकाल 'लोक' ह्या शब्दाला भलताच भाव आहे. सगळीकडे ह्या शब्दाची लुडबुड आहेच. लोक-साहित्य, लोकवाङ्मय, लोकभाषा, लोकव्याकरण, लोकसंगीत लोकदगड आणि लोकधोंडे. हाच भाव जरा आणखी वधारे व्हावा, म्हणून ह्याच लोकांच्या अंतर्मनाचे वस्तुस्थितिदर्शक चित्र रंगवले, तर हा गिल्ला का ? स्वातंत्र्यसंपादनाचे महत्कर्म ज्यांनी केले, त्यांचा ह्या चित्राने अधिक्षेप होतो, असा एक आरोप आहे. भारताच्या बाबतीत स्वातंत्र्यसंपादन ह्या शब्दापेक्षा

स्वातंत्र्यप्राप्ती हा शब्द अधिकं अन्वर्थक, इतिहाससिद्ध आहे, असे पुष्कळसे ज्ञाते म्हणतात, एवढे येथे लक्षात ठेवले म्हणजे पुरे. ते ज्ञातेच मुळी अज्ञ आहेत, हा पर्याय शिल्लक राहतोच. येथून मात्र 'मनेसीं मुरी-डिली वाचा.'

आणि कवींने हेच रंगविले पाहिजे, तेच वर्गिले पाहिजे, हे सांगणारे टिक्कोजी टीकाकार कोण ? कवीवर बंधने असतात; पण ती काल–समाज–संस्कारांची— टीकाकारांची नव्हत. सद्यःस्थितीत ह्याच त्रयीने मर्ढेकर निर्माण केलेला आहे. मर्ढेकर जर वैफल्यवादी असतील, तर ज्या सामाजिक चौकटीत मर्ढेकर निर्माण झाले आहेत ती चौकट, नव्हे तो समाजच, वैफल्यवादी ठरेल. वैफल्यवादाचा हा आरोप भूरिश्रव्याची भयंकर गदा आहे. ती कधी वापरणाऱ्याच्या स्वतःच्या टाळक्यात बसेल, ह्याचा नेम नाही. आणि समजा, ह्या चित्रांचा वाच्यार्थ वैफल्यवादी असला, तरी त्यावरून ही कविता काही वैफल्यवादी ठरत नाही. अभिधेपेक्षा जास्त महत्त्व काव्यात व्यंजनेला आहे आणि त्या व्यंजनेचा सूर निदान 'कांहीं कवितां'त तरी बंडखोरीचा आहे. वैफल्य हा मर्ढेकरांचा स्थायीभाव नाही, हे सिद्ध करण्यास तो पुरेसा आहे.

मर्ढेकरांतील ह्या कवीनेच गणपत वाणी, फलाटदादा, गर्भवती, जीवारण्य, मुंगीजग इत्यादी उत्कृष्ट शब्दचित्रे आपणांस दिली आहेत. त्यांच्यातील कवीनेच, 'ह्या गंगेमधिं गगन वितळलें', 'बोंड कपाशीचें फुटे', 'दवांत आलिस भल्या पहाटीं' इत्यादीं भावरम्य मधुर कविता आपल्याला दिल्या आहेत, ह्या कवितांची जात जरा वेगळी आहे. पण काव्याच्या महानसात एखाद्याने नवे प्रयोग केले, तर निदान तेच ते चघळून कंटाळलेल्या जिभेला रुचिपालटाचा आनंद मिळेल. म्हणून तरी निदान आपण मर्ढेकरांचे आभार मानले पाहिजेत. ज्यांना हा आनंद नको असेल, त्यांनी मर्ढेकरी काव्याला हात लावू नये, हेच बरे.

मर्ढेकरांतील तत्त्वज्ञ मराठी संतांच्या पठडीतील आहे. दैवी शक्ती म्हणा, पारभौतिक शक्ती म्हणा, हिच्यावर मर्ढेकरांचा विश्वास आहे. ह्या शक्तीशी संवादी जीवन मानवाने जगावे, असे त्यांना वाटते. मनूची अवलाद जगच्चाल-काचे स्थान घेऊ शकत नाही, असा त्यांचा दावा आहे. देवानेच दान म्हणून तिला दिलेली—आणि म्हणूनच ईश्वरनिर्मित ब्रह्मांडाच्या एका क्षुद्र भागाचाही

भाग असलेली—बुद्धी विश्वाचा यक्षप्रश्न सोडवू शकत नाही, असे त्यांना वाटते. हीच त्यांच्या नैराश्याची व्याप्ती आहे. हीच त्यांच्या नैराश्याची मर्यादा आहे.

असतातून सत् कसे निर्माण झाले ? ते कोणी निर्माण केले ? ह्या निर्मित विश्वाचे नियंत्रक नियम कोणी बांधून दिले ? ह्या जगड्व्याळ सृष्टीचा हेतू काय ? आपण कोण व कोठून आलो ? जगात शाश्वत काय व अशाश्वत काय ? पृथ्वी कधी जन्मली ? मन केव्हा निर्माण झाले ? इत्यादी महाप्रश्न आणि ते सोडविण्यास उद्युक्त झालेली मानवबुद्धी ह्यांतील तारतम्य मनात ठसल्यावर, मानवाच्या बुद्धीची क्षुद्रता प्रत्ययास येऊन जे नैराश्य निर्माण होते, तेच तत्त्वज्ञाचे नैराश्य. ह्यापलीकडे ह्या नैराश्याचे पाऊल पडत नाही. हे सर्व प्रश्न महाप्रश्न आहेत, म्हणून मानवाने ते सोडविण्याचा प्रयत्नच करू नये, असे कोणीही सांगत नाही. निदान मर्ढेकरांना तरी नक्की असे काहीही सांगावयाचे नाही. ज्या 'दळभद्र्यांच्या पायांखाली अचेतन आग लागली' आहे, अशांनी या आगीतच जळत असणाऱ्या आपल्या बुद्धीच्या मर्यादा ओळखाव्या, एवढेच त्यांचे म्हणणे आहे. 'अडीच पायांनी अस्मानातून तरणाऱ्या विमानाची' खोटी ऐट त्यांनी मिरवू नये, एवढेच त्यांचे सांगणे आहे. वैफल्यवादात अभिप्रेत असलेले सर्व जीवनासंबंधीचे नैराश्य त्यांच्या कवितांत दिसत नाही. मानवाने प्राप्त परिस्थितीत खितपत पडावे, हे त्यांना म्हणावयाचे नाही. बुद्धीच्यावरोवर थोडी सहानुभूती असू द्या. जरा जगा, जरा जगू द्या, हा त्यांचा संदेश आहे. नाही तर 'घडल्या गोष्टी विसरुनि जा अन् नडल्या आशा चुलींत फेका' ह्या कवितेचा अर्थच लागणार नाही, आणि आजकालचे पुढारी, दहा-दहाची पोकळ श्वास सोडीत येणारी लोकल गाठणाऱ्या मुंग्या, शुभ्र खांदीबंद ढेरपोटे, इत्यादींवर सोडलेल्या उपरोधाच्या ब्रह्मास्त्राची संगती लावता येणार नाही. मर्ढेकरी नैराश्यात मानवाच्या ऐहिक उन्नतीला विरोध अभिप्रेत नाही. सुखाच्या शोधाची कुचेष्टा नाही, किंवा त्याच्या मन्मथानुषंगी प्रीतीची विदारणाही नाही. तत्त्वज्ञालाच जाणवणारी मानवाची क्षुद्रता त्यांच्या प्रत्ययास आल्यानंतरदेखील त्यांची दमछाक झालेली नाही. अजूनही हा मर्त्य अमर्त्यांशाशी झुंज घेतोच आहे. ह्या सांत मानवाची ओढ अजूनही अज्ञात अनंताकडे आहे. ही 'वाह्यात वावडी' पोकळीच्या पिंजऱ्याच्या गजांशी जाऊन अडमडण्याचा प्रयत्न अजूनही करीत आहेच.

कातणीच्या जेविं पोटीं लक्ष अंडीं पोसती
पोकळीच्या आंत तेवीं लाख वाती तेवती.
टाळुनीयां त्यांस जाण्या आकसे ही वावडी
सोड दोरी देववाप्पा, वाळलीं हीं आतडीं !

ह्यांत व्यक्त झालेल्या ज्ञाताज्ञाताच्या काचणीला मर्ढेकर कंटाळलेले नाहीत. ह्यात कोठेही नैराश्य नाही. ही झुंज चालू असताना मर्ढेकर आपल्या मर्यादा मात्र विसरलेले नाहीत. ते स्पष्टपणे कबूल करतात :

जाणतों मी पोकळीच्या पिंजऱ्यालाही गज
खास कोटें ना कुटें ते ! आणि मीही मर्त्यज,

हेच ते तत्त्वज्ञाचे नैराश्य. ह्याचा परिपाक मात्र अकर्मण्यता हा नाही. वरील ओळीत व्यक्त झालेल्या जाणिवेनंतरही धडपड आहे आणि महत्त्वाकांक्षाही आहे.

फक्त दोरी सोड तूं रे, जाउं दे ही वावडी
खात गोते, पिंजऱ्याच्या त्या गजांशीं तेवढी !

ह्यांत फक्त एकच गोष्ट नाही आणि ती म्हणजे अहंपणाच्या उद्दामाची दलदल. त्या दलदलीच्या अभावामुळेच मर्ढेकरांवर चिखलफेक झाली आहे. आपल्या गाजरपारखी समाजात ह्या उद्दाम दलदलीलाच आत्मविश्वास समजतात; आणि मग तिच्या अभावाला आत्मविश्वासाच्या अभावाचे रूप देण्यात येते. रसिकांनी ह्या दोन गोष्टींतील फरक ओळखला पाहिजे. नामसादृश्याने गुणसादृश्य निर्माण होत नाही. 'धत्तूर हा कनक नाम सदा धरीतो । होईल काय रसिक कनकापरी तो ? ॥ '

उपर्युक्त अहंपणाच्या उद्दामामुळेच माणूस फक्त ज्ञानाची मशाल पाजळून ह्या महापोकळीचा थांग घेऊ इच्छित आहे. असा प्रयत्न करणारे स्वतःही सुखात नाहीत, दुसऱ्यांनाही सुख देत नाहीत. ह्यातूनच जगातील बहुतांश आपत्ती जन्माला आल्या आहेत. ह्या आपत्तीत माणसाचे मनोविकार आपापल्या परींनी भरच घालीत आहेत.

'मस्तली इच्छेची काया । ईर्ष्या अहंता असूया—
बोंचती, जैशा कीं सुया । इंजेक्शनीं ॥

हा प्रकार चालू आहे. मग 'काळ्यावरती जरा पांढरें' करण्याचे साधन काय ? हा पोकळीचा थांग मानवाला कसा आणि केव्हा लागेल ? ईशकृपा झाली तरच हे शक्य आहे. पण ही ईशकृपादेखील काही अंशी वेदनागर्भ प्रक्रिया आहे. 'कृपेची सळई', 'गळयाला नख', 'पोळणारे डोळे' ह्या शब्द-प्रयोगांत ईशकृपेमुळे होणाऱ्या अत्यानंदाला असलेल्या वेदनेच्या अस्तराचे धागे दिसतात. ती ईशकृपा होईल तेव्हा होवो, आज तरी मानवाने विज्ञानाची कास धरली आहे, यंत्रे निर्माण केली आहेत, जीवन यंत्रबद्ध करून टाकले आहे आणि 'सर्वे जंतु रुटिनाः' हा शापही बोडख्यावर ओढून घेतला आहे. तिकडे ह्या यंत्रमय कढईत लोकक्षयकृत काल आपले सूदकर्मांतील प्रावीण्य दाखवीत आहेच. त्याने खरपूस तळलेल्या महामांसाच्या कचोऱ्या हिरोशिमा, नागासाकी इत्यादी ठिकाणी भरपूर पाहावयास मिळतील. ह्या कढईतील तेल अजूनही चांगलेच खदखदते आहे. असा हा संसार चालू आहे.

हे सर्व तत्त्वज्ञान पूर्वी संतांनी सांगितलेलेच तत्त्वज्ञान आहे. त्यांच्या काळी यंत्रे नव्हती. आज संत नाहीत. पण जर कदाकाळी संतांना यंत्रयुगावर भाष्य करावयाची संधी मिळती, तर त्यांच्या लेखणीवाणीतून जे विचार बाहेर पडते, ते मर्ढेकरांनी येथे मांडले आहेत. ह्या सर्व तत्त्वज्ञानाचा गोषवारा मर्ढेकरांच्या 'ॐ नमः सावल्ये' ह्या कवितेत वाचावयास मिळेल. तो मुळातूनच वाचलेला बरा.

जावें विसरुनी स्वतःस । लागावा तुझा तुझाचि ध्यास ।
अज्ञानाच्या आसपास । ज्ञान व्हावें ॥
निघाव्या सारवूनी कडा— । जाणिवेच्या आणि थोडा तडा
यावा भरूनियां वापडा । भावनेचा.
होतां छिन्नविच्छिन्न अंतरीं । काय बाळगावे तुकडे तरी
जेथें सर्वस्वानेंच फितूरी । केली असे ॥
जैसें थोबाड रंगुनी लाल । होतां अवघडे शिशु-बोल ।
शब्दावीण तैसा ताल । दुःख धरी ॥
दुःख सांवरावें डोळ्यांत । रात्र भाजावी राखेंत
जेथें रस्ताच नाहीं तेथें वाट । आडमार्ग ॥

पाप परमेश्वराची साल । तीच माझें वल्कल, तीच शाल
तुझ्या इच्छेचाचि जाणावा परवल । पावलांनीं ॥
होमावीण द्यावी आहुति । हीच अगतिकाची सद्गति ।
जेथें उक्तीच नाहीं, द्विरुक्ती । तेथ कैची ॥
उरीं वाळगलें मीपण । व्हावें तेंचि आतां इंधन
जें जळतां जळतांचि जावें दिपून । सांवलीनें ॥

मुलगी मोठी भाग्यवान दिसते. कधी नाही ते खुद्द बापानेच हिचे नामकरण केले आहे. मर्ढेकरांना तत्त्वज्ञान म्हणून जे काही सांगावयाचे आहे, ते सर्व त्यांनी ह्या कवितेत सांगून टाकले आहे.

मर्ढेकरांचे सर्व काव्य वाचून झाल्यावर एक प्रश्न मात्र मनासमोर उभा राहतो. तो महत्त्वाचा आहे. मर्ढेकरांचा 'अहम्' विरुद्ध रोष आहे. विश्वचक्रात मानवाचे स्थान अगदीच क्षुल्लक आहे, ह्या गोष्टीची प्रचीती त्यांना आलेली आहे आणि तरीही त्यांचा व्यंजनागर्भ सूर मात्र बंडखोरीचा आहे. पलायनवादी माणसाचा त्यांना तिरस्कार आहे. त्यांनी कानोसा घेतला की 'मरणारांचे जगणें खंविर' ही घोषणा त्यांना ऐकू येते.

मोलाची पण मलूल भक्ती
जशि कुंतीच्या लिहिली भाळीं,
खिळे पाडुनी तिचे जरा ह्या
कढईच्या दे कुट्ट कपाळीं—
ठोकुनि पक्के, काळे, बळकट.

ही त्यांची 'दुःखाच्या कढई' संबंधी देवाला प्रार्थना आहे आणि हाच कवी 'काळोखांतून काळोखीं । जाण्याहि ये' हेही म्हणतो. त्यांच्या काव्यांतील ह्या दोन छटांची संगती कशी लावावयाची, हा तो प्रश्न होय.

प्रत्येक माणसाच्या मनाला असे वेगवेगळे पैलू असतात, तसेच ते मर्ढेकरांच्या मनालाही आहेत. त्यांच्यातला तत्त्वज्ञ पारभौतिक शक्तीवर म्हणजेच परमेश्वरावर (ॐ नम : सावल्ये) विश्वास ठेवतो, पण त्यांच्यातला व्यवहारात जगणारा माणूस ह्या पारभौतिक शक्तीच्या बोडक्यावर सर्व सामाजिक दुःखांचे खापर फोडून स्वस्थ बसावयास तयार नाही. ही दैनंदिन दुःखे दूर करण्याची

जबाबदारी समाजाची आहे. ' टिऱ्या अर्धपोट जोंवरि आहेत । ओंगळ समस्त । आम्ही नंगे । ' ह्या ओळींची व्यंजना हीच आहे.

आपल्याकडे ही दुहेरी विचारसरणी नित्याचीच आहे. ' तुका म्हणे नाशिवंत हे सकळ ' असे म्हणणारे संत, ' मागणें लइ नाहीं, लइ नाहीं । पोटापुरतें देई । मागणें लइ नाहीं, लइ नाहीं । ' म्हणतातच. ' दारा धन सुत पोरें ही तो नागवणीसम चोरें । म्हणणाऱ्यांनाच इतरांचीही काळजी होतीच; म्हणूनच तर बारी, वारकरी संप्रदाय, कीर्तन इत्यादिकांचा व्याप. नाही तर भक्तिपूत निस्त्रैगुण्यात सदा विहार करणाऱ्या ह्या संतांना लोकोद्धाराची ही लांडी भानगड कुणी सांगितली होती ? ज्या पूज्यपाद आचार्यांनी ' सर्वा खल्वियं माया ' हे तत्त्वज्ञान सांगण्यासाठीच प्रस्थानत्रयीवर भाष्ये लिहिली, त्यांनीच जन्मभर यात्रा, वाद, प्रचार करून ' उत्खात्य धर्मविमुखान् सुगतान् ' (धर्मविमुख बौद्धांना उपटून काढून) भारतातून गच्चांडी दिली. त्यांच्या एखाद्या अतिचिकित्सक शिष्योत्तमाने जर त्यांना विचारले असते, " भो भट्टपादाः सुगतोऽपिमायाः, वेदांतोऽपिमायाः;— मग ही तुमची फुकाची मायावृत्त धडपड का ? " तर त्या आजन्म कर्मयोगी संन्याशाने काय उत्तर दिले असते ?

खरे पाहता आपल्या सनातन पठडीप्रमाणे ह्या उत्तराची अपेक्षाही नाही. खऱ्या संन्यासाची परिणती कर्मयोगात, महानैराश्याची परिणती आशामय जीवनात, आणि परमेशावलंबी आत्मजीवनाची परिणती स्वावलंबी समाजजीवनात होणे हेच क्रमप्राप्त आहे. नाही तर ' मना त्वांचि रे पूर्वसंचीत केलें, तयासारिखें भोगणे प्राप्त झालें ' आणि ' यत्न तो देव जाणावा ' ह्या दोन दृष्टिकोणांची संगती कशी लावता येईल ? ' माणसाची देव चालवी अहंता ' ही जाणीव ज्याला होते, त्यालाच ' बळियाच्या आम्ही झालों बळिवंता ' ही जाणीवदेखील होते. पहिल्या अहमच्या त्यागातून दुसऱ्या अहमचे बल निर्माण होत असते. ह्यात विसंगती नाही. आणि म्हणूनच त्यांची संगती लावीत बसावयाचे कारण नाही.

ह्याच अर्थाने मर्ढेकरी नैराश्य आणि बंडखोरी ह्यांचे परस्पर संबंध शोधीत बसावयाचे कारण नाही. त्यांच्या नैराश्यातच त्यांची बंडखोरी अभिप्रेत आहे. त्यांच्या भयाणतेच्या बुरुजावरून येणाऱ्या अनामिक शीळेतच रोजच्या व्यवहाराला लागणारे धैर्य गर्भित आहे. ' भव्य भीतीतच ' ' मरणारांचे जगणे खंबिर ' हा आदेश आहे.


मर्ढेकरांच्या अनुबंधात संत आणि श्रीमत् शंकराचार्य ह्यांचा उल्लेख कल्या-मुळे कार्हींना पाविऱ्यविडंबनाचा वास येईल. तसा वास यावयाचे वस्तुतः काहीच कारण नाही. संतांच्या प्रेरणा वेगळ्या होत्या. मर्ढेकरांच्या वेगळ्या आहेत. पण ह्या दोन्ही प्रेरणांनी अजिबात भिन्न परिस्थितीत घडविलेल्या प्रतिक्रियात्मक प्रक्रियेची जात एकच आहे. एवढ्याचपुरते मर्ढेकर आणि उपर्युक्त संत आणि आचार्य ह्यांच्यातील साम्य मर्यादित आहे. ह्या साम्यापुरताच त्या नररूपधारी नारायणांचा उल्लेख, त्यांच्याविषयी संपूर्ण आदर बाळगून, येथे केला आहे. प्रमादाने त्यांचा अधिक्षेप झाला असलाच, तर ते कृपेचे सागर सर्व अपराध पोटात घालतील. राहता राहिले त्यांचे स्वयंनियुक्त भगत. त्यांच्याकडे दुर्लक्ष करणेच श्रेयस्कर.

मर्ढेकरांना महाकवी ठरविणे, हा ह्या लेखाचा उद्देश नाही. त्यांच्या काव्याचे गुणदोषदर्शक परीक्षण एवढाच ह्या लेखाचा उद्देश होता आणि तीच ह्याची मर्यादा होय. येथे उल्लेख केलेल्या मर्ढेकरी काव्यांतील गुणांचा प्रयत्न ज्या वाचकांना येईल, ते मर्ढेकरांना योग्य तो मान देतील आणि त्यांच्या काव्यांतील आनंद अनुभवतील. ज्यांना त्या गुणांची प्रचीती येणार नाही, ते त्यांच्यावर उलटसुलट टीका करतील. तो त्यांचा जन्मसिद्ध हक्क आहे. सगळ्या रसाक्त गोष्टी सर्व रसिकांना आवडल्याच पाहिजेत, असा काही निसर्गाचा दंडक नाही. म्हणूनच तर फुलवेड्या भुंग्यांना सोनचाफ्याची फुले आवडत नाहीत. आणि ती आवडत नाहीत, म्हणूनच मग एखादा प्रतिभारत वेडापीर एखाद्या रसपूर्ण श्लोकातच आपली हळहळ व्यक्त करतो.

रसिकांच्या ह्या दैवायत्त वृत्तीत व्यक्त होणाऱ्या 'बलीयसी ईश्वरेच्छे'च्या क्रूर चेष्टितांचा प्रसाद मर्ढेकरांच्याही वाट्याला आला असावा. म्हणून तर त्यांनी 'कांहीं कवितांच्या' प्रस्तावनेतील विक्षिप्त पण अभिजात उर्मटपणाला साजेल, अशा कवितेने आपल्या त्या कवितासंग्रहाचा उपसंहार केला नाही.

आलों क्षणिंचा विसावा म्हणून;
टेकले पाय :
तों तूंच हटकलेंस 'कोण' म्हणून
आणि मनांतले शिणलेले हेतू
शेण झाले !

○○○


२८२६
२३०५०
निबंध